# इराण- इस्रायलच्या युद्धात अमेरिकेची उडी!


अकोला । सोमवार
दि. २३ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ११३
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




(पान ७ वर..)

# इराणचा भडका: इस्रायलच्या १० शहरांवर क्षेपणास्त्रांचा वर्षाव

## फोर्डो, नॅटांझसह तीन अणुतळांवर अमेरिकेचे हवाई हल्ले!

वॉशिंग्टन: दि. २२ वृत्तसंस्था

**इराण आणि इस्रायलमधील युद्धात आता अमेरिकाही सामील झाली आहे. अमेरिकेने इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या तीन अणुस्थळांवर हवाई हल्ला केला आहे. हा हल्ला पूर्णपणे यशस्वी झाल्याचे सांगण्यात आले आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये ही माहिती दिली आहे.**



अमेरिकेने अत्याधुनिक बी-२ स्पिरिट स्टेल्थ बॉम्बर्सचा वापर केला

भारतीय वेळेनुसार रविवारी सकाळी अमेरिकेने इराणमधील तीन अणुस्थळांना लक्ष्य केले. अमेरिकेच्या बी २ बॉम्बर्सनी फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान येथील अणु तळांना लक्ष्य केले. या कारवाईसाठी अमेरिकेने अत्याधुनिक बी-२ स्पिरिट स्टेल्थ बॉम्बर्सचा वापर केला, जे अमेरिकन हवाई दलाच्या सर्वात प्रगत धोरणात्मक प्लॅटफॉर्ममध्ये गणले जातात. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी या हल्ल्यांना 'अत्यंत यशस्वी ऑपरेशन' म्हटले आणि दावा केला की इराणच्या अणुकार्यक्रमाचा सर्वात महत्त्वाचा भाग मानला जाणारा फोर्डो सेंटर आता पूर्णपणे नष्ट झाला आहे. ट्रम्प म्हणाले, 'फोर्डो आता उद्ध्वस्त झाला आहे.' अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या निवेदनात, सर्व अमेरिकन विमाने आता इराणच्या हवाई हद्दीतून बाहेर पडली आहेत आणि सुरक्षितपणे घरी परतत आहेत. बहुतेक बॉम्ब फोर्डो नावाच्या जागेवर टाकण्यात आले होते. असे म्हटले आहे. त्यांनी अमेरिकन (पान २ वर)



### मोदींचा इराणचे राष्ट्राध्यक्ष यांना फोन

**नवी दिल्ली :** जगभराचे लक्ष लागून राहिलेल्या इस्रायल-इराण संघर्षाने आता अतिशय धोकादायक वळण घेतले आहे. याच दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पजशिकयान यांच्याशी फोनवर चर्चा केली असून, अमेरिकेच्या हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर शांततेचा संदेश दिला आहे. पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर माहिती देताना सांगितले की, मी इराणचे (पान २ वर)

### इस्रायलच्या १० शहरांवर हल्ला!

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर, इराणने प्रत्युत्तर म्हणून इस्रायलच्या १० शहरांवर हल्ला केला केला असल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यामध्ये राजधानी तेल अवीव आणि हैफा सारख्या शहरांचा समावेश होता. या हल्ल्यांमुळे आजूबाजूच्या भागात गोंधळ उडाला असल्याचे सांगण्यात येत आहे. इस्रायलच्या राज्य प्रसारक कानच्या मते, इराणच्या ताज्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इस्रायलमधील १० ठिकाणे लक्ष्यित होती. या हवाई हल्ल्यांदरम्यान चेतावणीचे सायरन वाजू लागले, ज्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. दरम्यान, इराणने हल्ला तीव्र केल्यानंतर, इस्रायली विमानतळ प्राधिकरणाने इस्रायलचे हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद केले आहे. आयएएने हवाई क्षेत्र बंद करण्याची घोषणा करत म्हटले आहे की, सुरक्षेच्या परिस्थितीमुळे देशाचे हवाई क्षेत्र सर्व उड्डाणांसाठी बंद करण्यात आले आहे. इस्रायलच्या प्रमुख विमान कंपन्या, एल अल इस्रायल एअरलाइन्स आणि अर्किया एअरलाइन्स यांनी देखील पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व बचाव आणि (पान २ वर)
















# पान 1 वरून...

## इराणचा भडका: इस्त्रायलच्या....

सैन्याचे कौतुक केले आणि म्हटले की, आमच्या महान योद्ध्यांचे अभिनंदन! जगातील इतर कोणतेही सैन्य हे करू शकत नाही. यासोबतच त्यांनी म्हटले की आता शांततेची वेळ आली आहे. जेव्हा अमेरिकेने इराणच्या तीन अणुस्थळांवर हल्ला केला तेव्हा ते थेट इराणशी युद्धात उतरले. इस्त्रायलला मदत म्हणून या हालचालीकडे पाहिले जात आहे, जे इराणचा अणुकार्यक्रम संपवू इच्छित आहे. हा निर्णय विशेष आहे कारण डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात असे आश्वासन दिले होते की ते मध्य पूर्वेतील युद्धात पुन्हा अमेरिकेला ओढणार नाहीत. हल्ल्याच्या ४८ तास आधी ट्रम्प यांनी म्हटले होते, की अमेरिका इराण आणि इस्त्रायलमध्ये राजनैतिक तोडगा निघू शकतो का हे पाहण्यासाठी दोन आठवडे वाट पाहिल. जर चर्चेची शक्यता असेल तर मी दोन आठवड्यात पुढे काय करायचे ते ठरवेन. पण आता ट्रम्प यांनी थेट हल्ला करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये गुप्त चर्चा सुरू होत्या. वृत्तानुसार, ट्रम्प यांनी इस्त्रायलला शांततापूर्ण तोडगा निघावा म्हणून इस्त्रायलला इराणवरील हल्ला थोडा पुढे ढकलण्यास सांगितले होते, परंतु आता असे दिसते की चर्चेचा मार्ग बंद झाला आहे आणि थेट लष्करी मार्ग स्वीकारण्यात आला आहे. इराणच्या माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने इस्लामिक रिपब्लिकच्या इस्फहान, नतान्झ आणि फोर्डो अणुस्थळांवर हल्ला केला आहे, असे म्हटले आहे. या संदर्भात व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणी अणुस्थळांवर हल्ल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांच्याशी फोनवर बोलले आणि इराणला शक्य तितक्या लवकर वाढणारे युद्ध थांबवण्याची धमकीही दिली अन्यथा ते पुन्हा हल्ला करतील, असे म्हटले आहे. एका इंग्रजी वृत्तसंस्थेने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फोनवरून वृत्तसंस्थेला सांगितले की, इराणने ताबडतोब थांबावे अन्यथा त्यांना पुन्हा हल्ल्याला सामोरे जावे लागेल मात्र, इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीने असा दावा केला आहे की,अमेरिकेच्या हल्ल्यापूर्वी युरेनियमचे साठे रिकामे करण्यात आले होते. दरम्यान, यापूर्वी इराणने असा दावा केला होता की, त्यांनी मार्च महिन्यातच अणुशस्त्रे बनवण्याचे साहित्य योग्य ठिकाणी ठेवले होते, कारण त्यांना आधीच भीती होती की इस्त्रायल त्यांच्यावर कधीही हल्ला करू शकेल.

**इराणचा अणुकार्यक्रम थांबणार नाही!**

रविवारी अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर इराणच्या अणुऊर्जा संघटनेने देशातील प्रमुख अणुस्थळांवर कोणत्याही प्रकारच्या रेडिएशन गळतीचा धोका नाकारला आहे. इराणच्या सरकारी माध्यमांच्या वृत्तांचा हवाला देत ही माहिती समोर आली आहे. इराणच्या अणुऊर्जा संघटनेने जनतेला आश्वासन दिले आहे की सुरक्षा तपासणीत कोणत्याही प्रकारचे रेडिएशन आढळले नाही. यासोबतच, संघटनेने हे देखील स्पष्ट केले आहे की देशाचा अणुकार्यक्रम, ज्याला त्यांनी 'राष्ट्रीय उद्योग' म्हटले आहे, या हल्ल्यांनंतरही थांबणार नाही. इराणच्या अणुऊर्जा संघटनेने हे हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे तसेच एजन्सीने त्यांच्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. इराणने आंतरराष्ट्रीय समुदायाला या हल्ल्यांचा निषेध करण्याचे आणि शांततापूर्ण अणुविकासाच्या अधिकारात इराणला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

**युरोपसह, मध्यपुर्वेतील देशांमध्येही चिंतेचे वातावरण**

या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेतील युद्धग्रस्त परिस्थिती आणखी गंभीर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, या हल्ल्यानंतर रशिया आणि चीन या इतर महासत्तांनी मात्र या हल्ल्याचा निषेध केला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची हे मॉस्कोला जाऊन थेट रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा करणार आहेत.

**रशियाचा विरोध:** रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याला ''अविवेकी'' आणि ''आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन'' असे म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे की, या हल्ल्यामुळे प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. या हल्ल्याने धोकादायक तणाव सुरू झाला आहे आणि तो वाढू शकतो.

**चीनची भूमिका:** चीनने देखील अमेरिकेच्या या हल्ल्याचा कडक विरोध दर्शविला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, हा हल्ला संयुक्त राष्ट्रांच्या नियमांचे उल्लंघन आहे आणि यामुळे मध्यपूर्वेतील तणाव वाढला आहे. चीनने सर्व पक्षांना शांततेचा मार्ग स्वीकारून चर्चा करायला सांगितले आहे.

**सौदी अरेबिया:** इराणवरील अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे आम्ही अत्यंत चिंतेत आहोत, असे सौदी परराष्ट्र मंत्रालयाने (ट्विटर) वर नमूद केले. आंतरराष्ट्रीय समुदायाने संयम बाळगणे, तणाव कमी करणे आणि राजकीय तोडगा शोधण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

**कतार :** कतारने इराणमधील अणुऊर्जा केंद्रांवरील अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांनंतर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली. ''सर्व पक्षांनी संयम बाळगावा आणि पुढील चढाई टाळावी,'' असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

**ओमान :** अमेरिकेच्या हल्ल्याचा तीव्र निषेध करत ओमानने म्हटले आहे की, हा प्रकार गंभीर तणाव वाढवणारा असून आम्ही अमेरिकेच्या इराणवरील थेट हवाई हल्ल्यांचा तीव्र निषेध करतो.

**इराक :** ही लष्करी चढाई मध्य पूर्वेतील शांतता आणि स्थैर्यास गंभीर धोका पोहोचवणारी आहे, असे सरकारी प्रवक्ते बसीम अलवाडी यांनी म्हटले आहे.

**फ्रान्स:** तणाव वाढू नये म्हणून सर्वांनी संयम बाळगावा, असे फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री म्हणाले. ही समस्या केवळ चर्चा आणि कराराच्या माध्यमातूनच सोडवता येईल, असेही ते म्हणाले.

**जर्मनी:** चॅन्सलर फ्रेडरिक मर्ज यांनी इराणला अणुचर्चेत परतण्याचे आवाहन केले. युरोपियन आणि अमेरिकन भागीदारांसोबत आम्ही सतत संपर्कात राहू, असे त्यांचे प्रवक्ते म्हणाले.

**इटली :** आता तरी तणाव कमी व्हावा आणि इराणने चर्चेत सहभागी व्हावे, अशी आम्हाला आशा आहे, असे परराष्ट्र मंत्री ताजानी यांनी सांगितले.

## मोदींचा इराणचे राष्ट्राध्यक्ष यांना फोन

राष्ट्राध्यक्ष मसूद पजशिकयान यांच्याशी चर्चा केली. आम्ही संपूर्ण प्रादेशिक परिस्थितीवर सविस्तर चर्चा केली आणि वाढत्या तणावाबाबत आमची चिंता व्यक्त केली. मोदींनी स्पष्टपणे कळवले की, मी शांतता आणि स्थिरतेसाठी राजनैतिक संवाद आणि चर्चा यांनाच प्राधान्य देण्याची विनंती केली आहे. कोणत्याही मुद्द्याचे समाधान युद्ध किंवा संघर्षाद्वारे नव्हे, तर संवादाद्वारेच शक्य आहे.

## इस्त्रायलच्या १० शहरांवर हल्ला!

नियमित उड्डाणे स्थगित केली आहेत. दरम्यान, इजिप्त आणि जॉर्डनसह लँड क्रॉसिंग खुले राहतील, ज्यामुळे नागरिक आणि पर्यटकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होतील. इस्त्रायलच्या राष्ट्रीय आपत्कालीन सेवेतील मॅगेन डेव्हिड ॲडोम यांनी अनेक भागात नुकसान आणि जखमी झाल्याची माहिती दिली आहे. मात्र, मृतांची नेमकी संख्या अद्याप निश्चित झालेली नाही. त्याच वेळी, इराणी हल्ल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून, आयडीएफने पश्चिम इराणमधील अनेक लष्करी तळांवर हल्ला केला आहे. आयडीएफने सांगितले की आज सकाळी इस्त्रायली हवाई दलाने इराणी सशस्त्र दलाच्या सैनिकांवर हल्ला केला आणि इस्त्रायली हद्दीकडे क्षेपणास्त्रे डागणाऱ्या लॉंचर्सना ताबडतोब निष्क्रिय केले. आयडीएफ होम फ्रंट कमांडला असा संशय आहे की इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ल्यादरम्यान इस्त्रायली हवाई संरक्षण इंटरसेप्टर बिघाड झाला आणि हैफामध्ये कोसळला, ज्यामुळे उत्तरेकडील शहरात सायरन वाजले नाहीत. हैफामधील सेल ब्रॉडकास्ट सिस्टमद्वारे आगाऊ इशारा देण्यात आला होता, परंतु कोणतेही बॅलिस्टिक क्षेपणास्त्र शहराकडे जात नसल्याने सायरन वाजले नाहीत. आयडीएफने सांगितले की इराणने दोन फेऱ्यांमध्ये किमान २७ क्षेपणास्त्रे डागली.



पुणे: संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा रविवारी पुणे येथून पंढरपूर कडे रवाना झाला दुपारी दिवे घाटात टिपलेले पालखी सोहळ्याचे छायाचित्र. (ड्रोन सौजन्य :मोहन पाटील अकोला)

## गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ

**नाशिक, दि.२२** वृत्तसंस्था



शहर परिसरासह धरण क्षेत्रात सातत्याने पाऊस सुरु असल्याने धरणातून विसर्ग सुरु होता. शनिवारी (ता. २१) रिमझिम पावसाने हजेरी लावली. नाशिकमध्ये दिवसभरात ५.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.शहरासह जिल्ह्यात मॉन्सूनने दमदार हजेरी लावली आहे. शुक्रवारी (ता. २०) दिवसभरात १३.५ मिलिमीटर पावसाची नोंद घेतली होती. शनिवारी दिवसभर ढगाळ वातावरण कायम होते. दुपारनंतर रिमझिम पावसाला सुरवात झाली होती. सायंकाळपर्यंत ५.९ मिलिमीटर पावसाची नोंद घेतली होती. रात्री उशिरापर्यंत पावसाच्या हलक्या सरी बरसत होत्या.दरम्यान पावसाच्या हजेरीने पाऱ्यामध्ये घसरण झालेली आहे. किमान तापमान २२.७ अंश सेल्सीअस तर कमाल तापमान २७.६ अंशाची नोंद घेतली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार सोमवारी (ता.२३) नाशिक घाट माथ्यासाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. सोमवारपासून पुढील तीन दिवस हा अलर्ट लागू असणार आहे. शनिवारी (ता.२१) सायंकाळी उशिरापर्यंत धरणातून विसर्ग सुरु होता. दारणातून ४ हजार ७४२ क्यूसेस, गंगापूर धरणातून ३ हजार ९४४, होळकर पुलाजवळून ३ हजार ५९० क्यूसेस, नांदुरमध्यमेश्वरुन ११ हजार ०७९ क्यूसेस पाण्याचा विसर्ग सुरु होता.

## गोदामात सुरू होता जुगाराचा अड्डा!

### रामदासपेठ पोलिसांची कारवाई,१७ जुगारी अटकेत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २२:** अकोला शहरातील रामदास पेठ पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मासूम शाह दर्ग्याजवळील एका गोदामात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १७ जुगारींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चार दुचाकी, १० मोबाईल फोन आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. विश्वसनीय सूत्रांकडून रामदास पेठ पोलिस ठाण्याचे निरीक्षक शिरीष खंडारे यांना मासूमशाह दर्ग्याजवळील एका बंद गोदामात अवैध जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करून खंडारे यांनी तात्काळ पथक तयार केले व त्यांच्या सहकाऱ्यांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यात गोदामात बेकायदेशीरपणे जुगार खेळत असलेल्या १७ जणांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून चार मोटारसायकली, १० मोबाईल फोन, तसेच जुगार खेळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि रोकड जप्त केली आहे. या सर्वांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रामदास पेठ पोलिस स्टेशनमार्फत सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, पोलीस प्रशासनाच्या या तत्परतेचे कौतुक होत आहे. तसेच, अशा अवैध धंद्यांवर नियमित कारवाई व्हावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## भुसावळच्या सानवी सोनवणे हिचा सातव्या आंतरराष्ट्रीय रोलर रिले स्केटिंग स्पर्धेत डंका

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. २३:** सानवी आनंद सोनवणे हिने सातव्या आंतरराष्ट्रीय रोलर रिले स्केटिंग स्पर्धेत आपल्या अद्वितीय कौशल्याने आणि मेहनतीने दोन सुवर्ण आणि तीन रौप्य पदकं जिंकून भारताचे नाव जगभरात उज्वल केले आहे. या स्पर्धेचे आयोजन रोलर रिले फेडरेशन ऑफ इंडिया आणि थायलंड यांच्या संयुक्त विद्यमाने थायलंडमध्ये १८ ते २० जून २०२५ दरम्यान केले होते, ज्यामध्ये भारतासह ६ देशांच्या खेळाडूंनी सहभाग घेतला. सानवी, जी भुसावळच्या आंबेडकर नगरमध्ये राहते आणि पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता ६ मध्ये शिकते, हिने तिच्या वयोगटातील थायलंडच्या प्रतिस्पर्ध्यांना आपल्या उत्कृष्ट कामगिरीने मागे टाकत या यशाची गाथा लिहिली. सानवीच्या यशामागे तिची मेहनत आणि तिचे कोच पीयूष दाभाडे, दीपक सोनार सर आणि तिच्या आई-वडील यांचा फार मोठा हात आहे. तिचे आई ज्योती सोनवणे आणि वडील डॉ. आनंद सोनवणे हे दोघेही उच्च शिक्षित असून, त्यांनी सानवीला तिच्या क्रीडा करिअरमध्ये प्रोत्साहन दिले आहे. सानवी हि भुसावळ चे माजी नगरसेवक श्री लक्ष्मण सोयंके यांची नातं आहे. सानवीच्या यशामुळे भुसावळ शहराचा आणि भारताचा मान वाढला आहे, आणि तिच्या कामगिरीने अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा दिली आहे. तिच्या यशाने हे सिद्ध केले आहे की, योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमामुळे कोणतीही गोष्ट साधता येऊ शकते. सानवीच्या या यशामुळे तिच्या कुटुंबासोबतच संपूर्ण भुसावळ शहरात आनंद आणि गर्वाची भावना आहे, आणि तिच्या भविष्यातील यशासाठी सर्वांनी तिच्या पाठीशी राहावे, अशी अपेक्षा आहे.

गेल्या वर्षी सुद्धा राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर सानवी ने ०१ सुवर्ण आणि ०२ रौप्य पदक घेउन देशाचे नाव मोठे केले होते त्या बदल महाराष्ट्र चे क्रीडा मंत्री श्री दत्तात्रे बारणे, केंद्रीय राज्यमंत्री (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण) श्री रामदास आठवले, तसेच केंद्रीय राज्यमंत्री (सहकार आणि नागरी विमान वाहतूक) श्री मुरलीधर मोहोळ ह्यनी तिला कौतुक पत्र देऊं तिची पाठ थोपटली होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कायदेशीर नोटीस

**पुणे : दि. २२** वृत्तसंस्था



राज्यात राज्य मंडळाच्या शाळांमध्ये मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना पहिलीपासून हिंदी भाषा अप्रत्यक्षरित्या सक्तीची करण्यावरून राज्यात वादंग सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राची आणि मराठी माणसांची फसवणूक करणे, हिंदी सक्तीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा हवाला देऊन खोटे बोलणे आणि राज्यपालांनी दिलेल्या संविधानिक शपथेचा भंग करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रीया आवले, ॲड. अरहंत धोत्रे आणि ॲड. रोहित टिळेकर यांनी फडणवीस यांना नोटिस बजावली आहे. तामिळनाडू सरकारने त्रिभाषा धोरणाला विरोध करणारी याचिका केली, सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकारचे ऐकून घेतले नाही. तमिळनाडू सरकारने हिंदी सक्तीला विरोध केला, तमिळनाडू सरकारची सर्वोच्च न्यायालयने फेटाळली असे ध्वनित करणारे वक्तव्य करणे हा खोटारडेपणा आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची माफी मागावी असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. कारण, तामिळनाडू सरकारने त्रिभाषा धोरणाला विरोध करणारी याचिका म्हणून केलेली नसून, तमिळनाडू सरकार त्रिभाषा धोरण राबवत नसल्याने त्यांना केंद्र सरकारच्या इतर योजनांचा निधी, आर्थिक मदत मिळत नाहीये असा त्या याचिकेचा विषय आहे, अशी माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे देण्यात आली. इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याचा घेतलेला निर्णय चुकीचा असल्याने त्याबद्दल मुख्यमंत्री, शासनाने स्पष्टपणे आणि शब्द-चलाखी न करता तो निर्णय मागे घेतला असे जाहीर करणे आवश्यक आहे. 'अनिवार्य' शब्द काढला असे सांगून इतर जाचक अटींच्या माध्यमातून हिंदीला तिसरी भाषा म्हणून महाराष्ट्रात पहिलीपासून शिकवावेच लागेल, अशी सक्ती करण्याच्या जागा तयार करणे हे चांगल्या राज्य प्रशासनाचे लक्षण नाही. मुख्यमंत्र्यांनी खोटेनाटे न पसरवता राज्यातील मराठी शाळा अस्तित्वात राहतील, यासाठी प्रयत्न करावेत.

## अकोला गार्डन क्लबने राबविली झाडांची संगोपन आणि संवर्धन मोहीम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २२:** दरवर्षी पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण विविध संस्थां द्वारे व व्यक्ती द्वारे राबविल्या जाते. मात्र पुढे वृक्षारोपण झालेल्या या वृक्षांची निगा मात्र राखली जात नाही. नेमकी हीच बाब हेरून अकोला गार्डन क्लब ने यावर्षीपासून वृक्ष संवर्धन व वृक्ष संगोपन मोहीम हाती घेतली आहे.

अकोला गार्डन क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय शर्मा यांच्या नेतृत्वात ही मोहीम मागील दोन आठवड्यापासून राबविली जात आहे. दर रविवारी अकोला गार्डन क्लबचे सदस्य व सभासद या मोहिमेत सहभागी होत असतात. या रविवारी ही मोहीम अशोक वाटिका चौकापासून तुकाराम हॉस्पिटल चौकापर्यंत राबविण्यात आली.

या दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या जवळपास ३०० पेक्षा जास्तझाडांची व्यवस्थित कटाई, त्यांच्या फांद्यांची कटाई, काही ठिकाणी झाडांना आधार, झाडांना खत, व फवारणी सुद्धा या मोहिमेअंतर्गत कारण्यात आली. झाडाची योग्य ती वाढ व्हावी व अकोला शहर हिरवेगार व्हावे या उद्देशाने ही मोहीम यापुढेही राबविली जाणार आहे असं अकोला गार्डन क्लबचे माजी अध्यक्ष अजय सेंगरयांनी सांगितलं. वृक्षारोपण झाल्यानंतर झाडांची जर योग्य निगा राखली व त्याचं संवर्धन आणि संगोपन व्यवस्थित केल्या गेल तर ते झाड आपल्याला कायमस्वरूपी ऑक्सिजन देत असतं आणि अकोला शहरातील वाढत्या तापमानाची दखल घेत ही चळवळ राबविणे गरजेचे आहे. ही चळवळ गार्डन क्लब ची जरी असली तरीही शहरातील निसर्गप्रेमी व वृक्षप्रेमी नागरिक यात सहभागी होऊ शकतात असं आवाहन अकोला गार्डन क्लब चे उपाध्यक्ष शरद कोकाटे यांनी केल आहे. या मोहिमेकरिता सामाजिक कार्यकर्ते निशिकांत बडगे व वृक्षप्रेमी शरद कोकाटे यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे पदाधिकारी व सदस्य ही मोहीम राबवित आहेत. याकरिता अकोला गार्डन क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा, माजी अध्यक्ष अजय सेंगर, सचिव श्याम गोटफोडे, यांच्यासह जयप्रकाश पाटील, कोकिळ पाटील ,विजय ढवळे, अनुराधा ढवळे, दिनेश पारेख, , सौरभ पोफळी, संतोष अग्रवाल, नरेश अग्रवाल,गजानन मालोकार, संजय हेडा, आलोक खंडेलवाल, ब्रिजमोहन चितलांगे, डॉक्टर चौखंडे, वैशाली पाटील, इंद्राणी देशमुख, मोहकार ,भूषण ताजने व नीरज आवंडेकर उपस्थित होते. तर खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे यांची विशेष उपस्थिती लाभली.

## खेंडकर विद्यालयामध्ये जागतिक योग दिन साजरा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २२:**आज ११ वा जागतिक योगदिन प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येत आहे.अकोल्यात देखील मोठ्या उत्साहात आज योगदिन साजरा करण्यात आला . अकोल्यातील बायपास स्थित विष्णुपंत खेंडकर विद्यालय व स्वर्गीय यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळेमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. आजच्या या योग दिनामध्ये वर्ग दहावीचे विद्यार्थी व शाळेच्या शिक्षकांनी सहभाग नोंदविला. आज योगदिनी शवासन ,पद्मासन, ताडासन , शीर्षासनसह अनेक योग शाळेच्या भव्य प्रांगणात सादर करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर व मुख्याध्यापक अल्केश खेंडकर यांच्या मार्गदर्शनात आणि उपस्थीतीमधे योग दिन साजरा करण्यात आला. या योग दिन कार्यक्रमात शिक्षक प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे यांनी विद्यार्थ्यांना योग शिक्षणावर मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक सुरेश सुरत्ने, प्रशांत काळे, उषा जगदाळे, आशा हिवरकर, कांचन वानखडे, अंजु मुंढे, वर्षा मते शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### फेक न्यूज पसरवणाऱ्यांना आता ७ वर्षांचा कारावास, १० लाखांचा दंड

**नवी दिल्ली :** सोशल मीडियाद्वारे फेक न्यूज पसरवण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. कर्नाटक सरकार अशा फेक न्यूजला आळा घालण्यासाठी कायदा आणत आहे. त्याबाबत कर्नाटक सरकारचे मंत्री प्रियांक खरगे म्हणाले की, चुकीच्या माहितीच्या बाबतीत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यामुळे, त्यावर उपाययोजना करण्यासाठी आपण काही महत्त्वाची पावले उचलणे आवश्यक आहे. खोट्या माहितीला आळा घालण्यासाठी कर्नाटक सरकारने आणलेल्या विधेयकावर कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे म्हणाले की, भारत जगात चुकीच्या माहितीची राजधानी आहे. ते म्हणाले की, जागतिक आर्थिक मंचानुसार, चुकीच्या माहितीच्या बाबतीत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. आज देशातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीचे हेच मूळ कारण आहे. ते म्हणाले की, लष्करप्रमुखांनी अलीकडेच म्हटले आहे की, लष्कराचा ५०% वेळ चुकीच्या माहितीचा सामना करण्यात जातो. प्रियंक खरगे म्हणाले की, निवडणूक आयुक्तांनी आधीच म्हटले आहे की, ३एम म्हणजे पैसा, ताकद आणि चुकीची माहिती लोकशाहीसाठी धोका आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींनीही स्वतः म्हटले आहे की, चुकीची माहिती लोकशाहीसाठी धोका आहे आणि आता भारताचे माजी सरन्यायाधीशांनीही म्हटले आहे की, फेक न्यूजमुळे भारताची लोकशाही धोक्यात आहे.

### टॅरिफविरुद्ध एकटवले पाच देश

**मुंबई :** रशियाचे राजदूत डेनिस अलिपोव्ह यांनी ब्रिक्स सदस्य देशांमध्ये परस्पर चलनांमध्ये व्यापाराला आपला मजबूत पाठिंबा असल्याचे पुन्हा सांगितले आणि प्रमुख आव्हानांवर संयुक्त उपायांवर चर्चा करण्यासाठी या गटाला एक गंभीर व्यासपीठ म्हटले आहे. इराण आणि इस्रायलमधील युद्धात अमेरिकेने उडी घेतली असतानाच आणखी एका नवीन युद्धाची तयारी सुरू झाली आहे. या युद्धात पाच देश अमेरिकेविरुद्ध आहेत. या पाच देशांनी या नवीन युद्धाची संपूर्ण रूपरेषा देखील तयार केली आहे आणि ती उघडपणे जाहीर केली आहे. देशांच्या गटाने अमेरिकेच्या टॅरिफविरुद्ध उघडपणे घोषणा केली आहे. आता ते अशा युद्धाची तयारी करत आहेत जे यापूर्वी कधीही पाहिले गेले नाही. येत्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेवर राज्य करू शकणारे हे पाच देश आहेत. जगातील सर्वात मोठ्या गटांपैकी एक असलेल्या ब्रिक्सचे प्रमुख नेते शिखर परिषदेसाठी रिओ डी जानेरो येथे पोहोचण्यापूर्वी काही आठवड्यांपूर्वी, गटाच्या प्रमुख सदस्य देशांच्या राजदूतांनी संकेत दिले की ट्रम्प प्रशासनाच्या टॅरिफवरील आक्रमक धोरणाच्या पार्श्वभूमीवर ते व्यापारासाठी राष्ट्रीय चलनाचा अधिक वापर करण्यावर लक्ष केंद्रित करू शकतात. ही परिषद भारतातील ब्राझील दूतावास आणि जागतिक घडामोडींवर लक्ष केंद्रित करणारी एक आघाडीची संशोधन संस्था सेंटर फॉर ग्लोबल इंडिया इनसाइट्स () यांनी संयुक्तपणे आयोजित केली होती. ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) शिखर परिषद ६ आणि ७ जुलै रोजी रिओ दि जानेरो येथे होणार आहे.

### मुंबईत अज्ञात व्यक्तीचे वास्तव्य; १४ दिवसांनंतर अटक



**मुंबई :** भारतातील सर्वात प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या आयआयटी बॉम्बेमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. आयआयटी बॉम्बे कॅम्पसमध्ये एक अज्ञात व्यक्ती १४ दिवसांपासून बेकायदेशीरपणे राहत होता. या प्रकरणामुळे आयआयटी मुंबईच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.कर्नाटकातील मंगळुरू येथील २२ वर्षीय संशयित बिलाल अहमद फयाज अहमद तेली याला १७ जून रोजी कॅम्पस सिक्युरिटीने अटक केली आणि नंतर पवई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. कडक सुरक्षा व्यवस्था असतानाही त्याने संस्थेच्या कॅम्पसमध्ये कशी घुसखोरी केली आणि तो रात्री कुठे राहिला, याचा तपास सुरू आहे. या प्रकरणाकडे संभाव्य धोका म्हणून पाहिले जात असून, सुरक्षा व्यवस्तेकडूननेक प्रकारचे संशय व्यक्त केले जात आहेत. आरोपी कॅम्पसमध्ये कसा घुसला, कुणासाठी घुसला, कोणावर लक्ष ठेवून होता का? तो हेरगिरीच्या कारवायांमध्ये सहभागी होता का? याबाबत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# अमेरिकेला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागणार : इराणचा इशारा

## इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराक्ची यांनी केला निषेध

**तेहरान, दि.२२ वृत्तसंस्था**

इस्रायल-इराणमधील संघर्ष वाढला आहे. इस्रायल आणि इराणमध्ये हवाई हल्ले सुरु आहेत. मात्र, या दोन्ही देशांच्या संघर्षात अमेरिका सहभागी झाली असून अमेरिकेने इराणवर मोठे हवाई हल्ले केले आहेत. अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यात इराणमधील ३ अणुकेंद्र नष्ट झाल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. या संदर्भातील माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल माध्यमावर दिली आहे.
अमेरिकेने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत. तसेच इराणवर हवाई हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय इतिहास बदलेल, असं बिन्यामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. दरम्यान, अमेरिकेने हल्ला केल्यानंतर आता इराणची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. अमेरिकेला गंभीर परिणामांना सामोरं जावं लागणार असल्याचा इशारा इराणने दिला आहे.
अमेरिकेने इराणच्या अणु केंद्रावर हवाई हल्ले केल्याबद्दल इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराक्ची यांनी अमेरिकेचा निषेध केला आहे. तसेच हे आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांचे चार्टर आणि एनपीटी कराराचं गंभीर उल्लंघन असल्याचं मंत्री सय्यद अब्बास अराक्ची यांनी म्हटलं आहे. इराणच्या शांततापूर्ण अणु कार्यक्रमावरील हल्ले अपमानकारक असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अमेरिकेने हल्ला केल्यानंतर इराणचा गंभीर इशारा



इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराक्ची यांनी एक्सवर (ट्विट) पोस्ट करत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य असलेल्या अमेरिकेवर शांततापूर्ण अणु प्रकल्पांना लक्ष्य करून गुन्हेगारी वर्तन केल्याचा आरोप सय्यद अब्बास अराक्ची यांनी केला आहे. सय्यद अब्बास अराक्ची यांनी म्हटलं की, ''आज सकाळच्या घटना अत्यंत भयानक आहेत आणि त्यांचे कायमचे परिणाम होतील. संयुक्त राष्ट्रांच्या प्रत्येक सदस्याने या अत्यंत धोकादायक, बेकायदेशीर आणि गुन्हेगारी वर्तनाबद्दल सावध असलं पाहिजे'', असं इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर इराणने स्वसंरक्षणाचा अधिकार वापरण्यासाठी सर्व पर्याय राखून ठेवले असल्याचं म्हटलं आहे.
अमेरिकेने इराणवर हवाई हल्ले केल्यानंतर अमेरिकन आणि इस्रायली अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या कारवाईत अमेरिकन स्टेल्थ बॉम्बर्स आणि जीबीयू-५७ बंकर बस्टर बॉम्ब वापरण्यात आले. जे मजबूत भूमिगत टार्गेट करण्यास सक्षम आहेत.

## बिहारमध्ये सामाजिक सुरक्षा योजनेच्या पेन्शनमध्ये वाढ

**पाटणा, दि.२२ वृत्तसंस्था**

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीचे वेध लागलेले असताना राज्यातील नीतिशकुमार सरकारने विधवा, ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांच्या पेन्शनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.
यानुसार आता चारशे रुपयांऐवजी दरमहा ११०० रुपये पेन्शन मिळणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री नीतिशकुमार यांनी एक्सवर पोस्ट करत निर्णयाची माहिती दिली आहे. नवीन वाढ येत्या जुलै महिन्यांपासून लागू होणार आहे.
मुख्यमंत्री नीतिशकुमार यांनी राज्यातील ज्येष्ठांच्या पेन्शनमध्ये वाढ करताना आनंद होत असल्याचे नमूद केले आहे. नीतिशकुमार यांनी म्हटले, ''राज्यात सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेनुसार राज्यातील सर्व ज्येष्ठ, दिव्यांग आणि विधवा



महिलांना आता चारशे रुपयांऐवजी ११०० रुपये पेन्शन मिळणार आहे.सर्व लाभार्थ्यांना जुलै महिन्यांपासून वाढीव पेन्शन मिळणार आहे. यानुसार लाभार्थ्यांच्या खात्यात ही रक्कम दरमहा दहा तारखेला जमा होईल. सरकारच्या निर्णयामुळे एक कोटी ९ लाख ६९ हजार २५५ लाभार्थ्यांना लाभ मिळेल.''मुख्यमंत्री नीतिशकुमार यांनी ज्येष्ठ नागरिक राज्यातील महत्त्वाचा घटक असून त्यांना सन्मानाने जीवन व्यतित करण्याचे सरकारचे प्राधान्य असून राज्य सरकार यादृष्टीने सातत्याने प्रयत्न करेल, असेही म्हटले आहे.



ओडिशातील रायगडा जिल्ह्यातील काशीपूर ब्लॉकमधील बैगानगुडा गावात एका महिलेने दुसऱ्या जातीतील पुरुषाशी लग्न केल्यानंतर तिच्या कुटुंबातील ४० सदस्यांना शुद्धीकरण विधीसाठी मुंडण करण्यास भाग पाडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आंतरजातीय विवाहामुळे कुटुंबाला समाजातून बहिष्कृत करण्यात आले आणि समाजात परत स्वीकारण्यासाठी त्यांना हा विधी पूर्ण करावा लागला. याशिवाय दंड म्हणून प्राण्याचा बळी देण्यात आला.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयएची मोठी कारवाई, दोन जणांना अटक

**नवी दिल्ली, दि.२२ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता, तर अनेक पर्यटक जखमी झाले होते. या घटनेनंतर संपूर्ण देशभरात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ ठिकाणी दहशतवादी तळांवर हल्ला करत जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं.
त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाली आणि तणाव काहीसा निवाळला. पहलगाम दहशतवादी



हल्ल्याची एनआयएच्या माध्यमातून चौकशी करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले होते. त्यानंतर एनआयएने पहलगाम दहशतवादी हल्ल्याची चौकशी सुरु केली होती. तेव्हापासून एनआयए या प्रकरणाचा तपास करत आहे. आता या प्रकरणात एनआयएने मोठी कारवाई केली आहे.पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या दोघांना एनआयएने अटक केली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या दोघांनी दहशतवाद्यांना आश्रय देत रसद पुरवल्याचा आरोप करण्यात आला आहे. परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर अशी या दोघांची ओळख पटली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयएने कारवाई करत दहशतवाद्यांना आश्रय दिल्याच्या आरोपाप्रकरणी दोन जणांना अटक केल्याचं एका निवेदनात एनआयएने म्हटल्याचं वृत्तात म्हटलं आहे.
पहलगामच्या बटकोट येथील परवेझ अहमद जोथर आणि पहलगाममधील हिल पार्क येथील बशीर अहमद जोथर या दोघांनी हल्ल्यात सहभागी असलेल्या तीन सशस्त्र दहशतवाद्यांची ओळख उघड केली आहे.

## परदेशातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर हार्वर्डला दिलासा

**बोस्टन, दि.२२ वृत्तसंस्था**

अमेरिकेत हॉर्वर्ड विद्यापीठ आणि ट्रम्प प्रशासनामध्ये सुरू असलेल्या विवादाच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती न्यायालयाने विद्यापीठाला मोठा दिलासा दिला आहे. परदेशातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास विद्यापीठावर बंदी घालण्याचे प्रशासनाचे प्रयत्न संघीय न्यायाधीशाने रोखले आहेत. अमेरिकेचे जिल्हा न्यायाधीश अलिसन बरोज यांनी दिलेला हा निकाल म्हणजे विद्यापीठाचा मोठा विजय असल्याचे मानले जात आहे. ''जोपर्यंत कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे, तोपर्यंत परदेशी विद्यार्थी हॉर्वर्डमध्ये शिक्षण सुरू ठेवू शकतील,'' असा निकाल न्यायाधीशांनी दिला आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या अनेक निर्णयांविरोधात विद्यापीठ न्यायालयात गेले आहे.त्यामुळे हा निर्णय त्यांच्यासाठी मोठा दिलासादायक ठरणार आहे. परदेशी विद्यार्थ्यांनी देशात प्रवेश देण्यासाठी आणि त्यांच्या व्हिसासाठी कागदपत्रे मंजूर करण्यासाठी विद्यापीठाचा परवाना येथील गृह सुरक्षा विभागाने रद्द केल्यानंतर 'हॉर्वर्ड'ने मे महिन्यात त्यांच्यावर खटला दाखल केला होता.

## ज्यांच्याकडून उत्तर हवे तेच पुरावे नष्ट करतात

### राहुल यांची निवडणूक आयोगावर टीका

**नवी दिल्ली, दि.२२ वृत्तसंस्था**

'फिक्स' केलेली निवडणूक लोकशाहीसाठी विष असल्याची टीका करीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला लक्ष्य केले आहे.
'मतदार याद्या मशिनने वाचण्यालायक स्वरूपात देणार नाही . सीसीटीव्ही फुटेज कायदा बदलून दडवून ठेवले. मतदानाचे फोटो-व्हिडिओ आता एक वर्ष नव्हे तर ४५ दिवसांमध्येच नष्ट करून टाकणार, ज्यांच्याकडून उत्तर हवे होते तेच पुरावे नष्ट करीत आहेत.
यात मॅच फिक्सिंग स्पष्टपणे दिसून येते. फिक्स केलेली निवडणूक लोकशाहीसाठी विष आहे,'



अशी टीका राहुल यांनी 'एक्स' या प्लॅटफॉर्मवरून केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी करण्यात आली असून या मॅच फिक्सिंगमध्ये निवडणूक आयोग गुंतला असल्याचा आरोप राहुल यांनी याआधीच केला होता. त्यांच्या या आरोपांमुळे मोठा वाद झाला होता. राहुल यांच्या आरोपांचे आणि प्रश्नांचे निराकरण करण्याऐवजी आयोगाने निवडणुकांशी संबंधित व्हिडिओ फुटेज आणि छायाचित्रे जतन करण्याचा कालावधी कमी करून तो दीड महिन्यांवर आणला आहे.
'सर्व माल चिनी आहे,' अशी खोचक टीका करीत आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारताच्या उद्योग क्षेत्रात सतत होणारी घसरण आणि तरुणांमधील वाढत्या बेरोजगारीवर कटाक्ष टाकला.
'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून कारखानदारीला चालना मिळेल, अशी ग्वाही दिल्यानंतरही उत्पादन क्षेत्राने नीचांक गाठला आहे. तरुणांमधील बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे आणि चीनमधून होणारी आयात दुपटीहून जास्त का झाली? पंतप्रधान मोदी घोषणा देण्यात तरबेज आहेत.

## 'क्लस्टर बॉंब'ची पुन्हा दहशत; इराणकडून वापरामुळे जग चिंतेत



**तेहरान , दि.२२ वृत्तसंस्था**

इस्राईलविरोधातील संघर्षात इराणने प्रथमच क्लस्टर बॉंबचा वापर केला आहे. अल्पावधीत मोठी जीवितहानी घडवून आणण्यासाठी या शस्त्राचा वापर केला जातो. इस्राईलच्या लष्कराने या हल्ल्याला दुजोरा दिल्याने आंतरराष्ट्रीय समुदायाची चिंता वाढली आहे.
भविष्यात इराणकडून आणखी अशाच प्रकारच्या संहारक शस्त्रांचा वापर केला जाऊ शकतो अशी भीती व्यक्त होते आहे. इस्राईलच्या मध्यवर्ती भागाला लक्ष्य करून या बॉंबद्वारे हल्ला करण्यात आला होता.
क्लस्टर बॉंबचा हवेत स्फोट झाल्यानंतर त्यातून आणखी शेकडो स्फोटके बाहेर पडतात आणि ती मोठ्या भूप्रदेशात विध्वंस घडवून आणतात. एकाच वेळी फुटणाऱ्या बॉंबपेक्षा हे शस्त्र अधिक घातक मानले जाते. विशेष म्हणजे ही स्फोटके स्वयंचलित नसतात. जमिनीवर पडल्यानंतर त्यांचा अल्पावधीत स्फोट होतो.
यानंतरही काही स्फोटके तशीच न फुटलेल्या अवस्थेत पडून राहतात त्यामुळे त्यांचा नंतर स्फोट होऊन त्यात नागरिक जखमी होण्याचा धोका असतो. लोकसंख्येची अधिक घनता असलेला भूप्रदेश, घरे आणि पायाभूत सुविधांचा या बॉंबमुळे विध्वंस होतो.
रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेने हा बॉंब झेलेन्स्की यांना दिला होता, त्यावरूनही बराच वादंग झाला होता. युक्रेननेही रशियाकडून क्लस्टर बॉंबचा वापर झाल्याचा आरोप केला होता.

# अमेरिकेने इराणच्या अणु तळांवर हल्ला केलेली क्षेपणास्त्रे किती घातक?

**तेहरान, दि.२२ वृत्तसंस्था**

इराण-इस्त्रायल युद्धात अमेरिकेने उडी घेत इराणच्या अणु स्थळांवर क्षेपणास्त्र हल्ला केला. अमेरिकेच्या या हल्ल्यामुळे इराणमध्ये एकच खळबळ उडाली आहे जग गाढ झोपेत असताना अमेरिकेने इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला आहे. रविवारी सकाळी, अमेरिकेच्या हवाई दलाने इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या तीन प्रमुख अणुस्थळांना लक्ष्य केले. या हल्ल्यात अत्याधुनिक बी-२ स्टेल्थ बॉम्बर्स आणि जीबीयू-५७ बंकर बस्टर बॉम्बचा वापर करण्यात आला, ज्यांचे वजन सुमारे ३०,००० पौंड होते. या हल्ल्यानंतर अमेरिकेच्या या अत्याधुनिक बी-२ स्टेल्थ बॉम्बर्स आणी जीबीयू-५७ ही क्षेपणास्त्रे नेमकी काय आहे, याबाबत उत्सुकता वाढू लागली आहे.
हे बॉम्ब इतके शक्तिशाली आहेत की ते जमिनीखाली लपलेल्या लपलेल्या अण्वस्त्रांच्या जागांनाही पूर्णपणे नष्ट करू शकतात. इराणवरील हल्ल्यात बी-२ स्पिरिट स्टेल्थ बॉम्बर्स आणि एफ-२२ रॅप्टर लढाऊ विमानांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही दोन्ही विमाने त्यांच्या विशेष रडार-



चुकवण्याच्या तंत्रासाठी ओळखली जातात, या तंत्रामुळे शत्रूच्या हवाई संरक्षण प्रणाली त्यांचा मागोवा घेऊ शकत नाहीत.
इराणच्या भूमिगत अणुस्थळांना लक्ष्य करण्यासाठी बी-२ बॉम्बर्सचा वापर करण्यात आला. माहितीनुसार, प्रत्येक बी-२ विमानात दोन शक्तिशाली 'बंकर बस्टर' बॉम्ब होते, ज्याच्या मदतीने इराणचे जमिनीच्या आत काही फ

### बी२ बॉम्बर, एफ-२२ रॅप्टर

ुटांवर सुरक्षित असलेले अणु तळही पूर्णपणे नष्ट करण्यात आले.अमेरिकेने इराणच्या अणुस्थळांवर हल्ला करण्यासाठी म्हणजेच जॉइंट डायरेक्ट अटॅक म्युनिशनचा वापर केला. हे स्मार्ट बॉम्ब आहेत, जे जीपीएसच्या मदतीने अगदी अचूकपणे लक्ष्य करतात. याआधी अमेरिकेने (एअर लॉन्च्ड क्रूझ मिसाईल्स) पाठवले होते, ज्यांचे काम इराणच्या रडार आणि कम्युनिकेशन सिस्टमला आगाऊ नष्ट करणे होते. यामुळे इराणची सुरक्षा व्यवस्था कमकुवत झाली आणि त्यांना हल्ल्याची माहितीही मिळाली नाही.इराणचे ड्रोन आणि क्षेपणास्त्र डेपो नष्ट करण्यासाठी अमेरिकेने त्यांच्या स्पेशल ऑपरेशन्स कमांडद्वारे सर्जिकल स्ट्राईक केला. या विशेष ऑपरेशन्समध्ये अमेरिकेने '-९ रीपर ड्रोन' वापरले, जे 'हेलफायर' क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहेत. हे ड्रोन उंचावरून उडतात, शत्रूला न कळवता अचूकतेने लक्ष्य करतात आणि अगदी लहान लपण्याचे ठिकाण देखील पूर्णपणे नष्ट करण्यास सक्षम आहेत.अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर आता इराणचे विधान समोर आले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...
# जागतिक युद्धाची नांदी

इस्रायल आणि इराणमधील युद्ध मर्यादित राहिले असते तर त्याचे परिणाम कमी होऊ शकले असते परंतु आता जगातील महाशक्ती अमेरिकेने त्यामध्ये उडी घेतल्याने जागतिक राजकीय तज्ज्ञांच्या मते ही तिसऱ्या जागतिक युद्धाची नांदी ठरु शकते. आता हे युद्ध मोठ्या प्रादेशिक युद्धात रूपांतरित झाले आणि इतर देशदेखील त्यात सहभागी झाले तर जागतिक अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होऊ शकते. बाजारपेठा अद्याप हा धोका पूर्णपणे समजून घेऊ शकल्या नाहीत. रविवारी अमेरिकेने इराणवर क्षेपणास्त्र हल्ले चढविले त्यामुळे इराण चांगलाच चवताळला आहे. इराणने अमेरिकेला प्रत्युत्तर न देता इस्त्रायलच्या शहरांवर हल्ले केले त्यामुळे वातावरण आणखीनच चिघळले आहे. संयुक्त राष्ट्र आणि अनेक देशांनी इस्रायल आणि इराणला शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. राजनैतिक आणि चर्चेद्वारे हा तणाव कमी करण्याचे प्रयत्न केले जात आहेत; परंतु जर युद्ध वाढले, तर जगाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. इस्रायल आणि इराणमधील युद्धाच्या भीतीने संपूर्ण जग चिंतेत पडले असतानाच आता त्यात अमेरिकाही सहभागी झाल्यामुळे ही चिंता आणखीनच गडद झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ, महागाई, व्यापारात व्यत्यय आणि शेअर बाजारातील अस्थिरता यासारखे परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेला भविष्यात हादरवू शकतात. जर असे झाले तर भारतासारखे देशही यापासून दूर राहणार नाहीत. आता इराण आणि इस्रायलमधील युद्ध तीव्र झाले आहे आणि हल्ल्यांची व्याप्ती वाढली आहे, तेव्हा लोक इस्रायलचे खरे ध्येय काय आहे असा प्रश्न विचारत आहेत. इराणची अणुऊर्जा नष्ट करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे का? इस्रायलचे सर्वात जास्त काळ पंतप्रधान राहिलेल्या बेंजामिन नेतान्याहू यांचे त्यांच्या राजकीय कारकिर्दीत नेहमीच एक वैयक्तिक ध्येय राहिले आहे. गेल्या काही वर्षांत, अमेरिका आणि अगदी नेतान्याहू यांच्या स्वतःच्या सेनापतींनीही त्यांना इराणच्या अणु सुविधांवर हल्ला करण्याचा आदेश देण्यापासून एकापेक्षा जास्त वेळा रोखले आहे; परंतु ते कुणाचेही ऐकत नाहीत. इराण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची हत्या करणार असल्याची अफवा पसरवून अमेरिकेला या युद्धात ओढण्यात नेत्यानाहू यांना यश येत असल्याचे दिसते. रविवारी अमेरिकेने इराणवर हल्ला चढविताच नेत्यानाहू यांनी ट्रम्प यांचे आभार मानीत त्यांना धन्यवाद दिले आहेत. इस्रायलचे उद्दिष्ट इराणच्या अणुकार्यक्रमावर हल्ला करणे हे आहे. त्यानुसार त्याने हल्ला केला आहे. इस्रायलच्या या कृतीचा जगातील अनेक देशांनी आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीने निषेध केला आहे. नेतान्याहू यांनी इराणमध्ये सत्ता बदलासाठी वैयक्तिकरित्या आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. फोर्डो हा इराणचा सर्वात सुरक्षित अणु तळ मानला जातो. नेतान्याहू यांनी इस्रायलच्या लष्करी कारवाईचे वर्णन त्या घटकांवर हल्ला म्हणून केले आहे. इराण अणुबॉम्ब बनविण्याच्या जवळ होता, या नेतान्याहूच्या दाव्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. इराणने वारंवार सांगितले, की त्यांनी कधीही अणुबॉम्ब बनविण्याचा निर्णय घेतला नाही. अमेरिका स्वतःच्या गुप्तचर यंत्रणेऐवजी नेत्यानाहू यांच्यावर विश्वास ठेवत आहे. नेत्यानाहू आणि ट्रम्प या दोघांचीही भूमिका युद्धखोरीची आहे. एकाधिकारशाहीकडे झुकलेले हे दोन नेते सत्तेसाठी कुठल्याही थराला जाऊ शकतात, याचा जगाने अनुभव घेतला आहे. इस्रायली हल्ल्यांच्या पहिल्या काही दिवसांत, इराणच्या नातानझ, इस्फहान आणि फोर्डो येथील अणुस्थळांना लक्ष्य करण्यात आले. सुरुवातीला इस्रायलने लष्करी तळ आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण पॅडना लक्ष्य केले. आता ते इराणच्या आर्थिक केंद्रांवर आणि तेल प्रकल्पांवरही बॉम्बस्फोट करीत आहे. इराणदेखील प्रत्युत्तर देत आहे. इराणनेही इस्त्रायलच्या अपेक्षेहून अधिक काळ चांगला प्रतिकार केला असून, मोसाद या इस्त्रायली गुप्तचर संस्थेचे मुख्यालय उद्ध्वस्त केले. इस्त्रायलची डोम ही यंत्रणा कुचकामी आहेत, हे इराणच्या हल्ल्यात सिद्ध झाले; पण निर्णायक धक्का देण्यासाठी इराणच्या प्रचंड अणुकार्यक्रमामुळे इस्रायलला फोर्डोचे गंभीर नुकसान करावे लागेल. हा इराणचा दुसरा सर्वात मोठा अणुतळ तळ आहे. इस्त्रायल इराणची सर्वच अण्वस्त्रे आणि अणुबॉंब नष्ट करू शकेल, की नाही, याबाबत साशंकता आहे. नेतान्याहू यांचे विचार त्यांच्या गुप्तचर प्रमुखांपेक्षा वेगळे आहेत. अमेरिका, इराण आणि इस्त्रायलच्या हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी इराणच्या राष्ट्राध्यक्षांना फोन करुन शांततेचे आवाहन केले आहे. इराणचे चाबहार बंदर भारत विकसित करीत आहे. व्यूहात्मकदृष्ट्या भारताला इस्त्रायलपेक्षा इराण महत्त्वाचा आहे. आखातातील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची, पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची आणि शेअर बाजारांमध्ये घसरण होण्याची शक्यता वाढली आहे. तेलाच्या किमतीत वाढ, महागाई आणि शेअर बाजारात अशांतता अशा समस्यांना तोंड द्यावे लागेल. जर हा तणाव पूर्ण युद्धात बदलला, तर त्याचा परिणाम केवळ मध्य पूर्वेलाच नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. अमेरिकेची या युद्धातील एन्ट्री बरेच काही सांगून जाते.

## हल्ला





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

प्रगतीसाठी गरज नाही
अशा जीवघेण्या युद्धाची
मात्र जगभर नांदी आहे
रोज आण्विक संघर्षाची

अमेरिकेने केला अचानक
इराणवर बॉम्ब हल्ला
महाशक्तीने ही घेतली उडी
तो जगभरात झाला कल्ला

कोणता देश कोणासोबत
खरं काहीच कळत नाही
काल नोबेलची करून बात
पाकिस्तान आज सोबत नाही

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



दुःखाचे बनवू
टाळ नी मृदुंग ।
सुखाचे अभंग
नित्य गावू ॥

हाती द्यावे काम
हक्काचे मोल ।
कर्म अनमोल
गरजूंना ॥

मोह आणि माया
आहे मृगजळ ।
अवीट निरळ
समाधान ॥

आचरण जसे
तसा तो दिसतो ।
जगती मिळतो
तसा मान ॥



## प्रासंगिक

नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

# संगीतोपचार काळाची गरज

जागतिक संगीत दिन २०२५ ची थीम ''सुसंवाद माध्यमातून उपचार'' ही आहे. ही थीम भावनिक उपचार प्रदान करण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी आणि सामाजिक ऐक्य वाढवण्याच्या संगीताच्या क्षमतेवर जोर देते. जागतिक संगीत दिन साजरा करण्याची कल्पना प्रथम १९८१ साली फ्रान्समध्ये मांडली गेली. तत्कालीन सांस्कृतिक मंत्री मौरिस फ्ल्यूरेट यांनी यासाठी पुढाकार घेतला आणि जॅक लंग यांच्या सहकार्याने २१ जून १९८२ रोजी फ्रान्समध्ये पहिल्यांदा 'फेटे द ला म्युझिक' हा कार्यक्रम झाला. ही संकल्पना इतकी लोकप्रिय ठरली की अल्पावधीतच ती संपूर्ण युरोप आणि नंतर जगभर पसरली. जीवन जगत असलेला असा एक ही व्यक्ति नसेल ज्याला संगीत आवडत नसेल. शास्त्रीय संगीत खर तर देवाने जगाला दिलेली अनमोल भेट आहे. आजच्या एकूण धावपाळीच्या युगात अनेक लोक आपले मानसिक स्वाथ्य हरवून बसले आहेत. संगीत म्हणजे केवळ मनोरंजन समजणे म्हणजे अडाणीपणाचे ठरेल. संगीत ही कला तर आहेच सोबतच संगीत हे ध्यान आणि अध्यात्मही आहे. आज डिप्रेशनप्रमाणेच कौटुंबिक ताणतणाव, व्यवसायजन्य परिस्थितीचा ताण, निद्रानाश, सततची चिंता, या मनाच्या अवस्थाही वाढल्या आहेत. त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी विविध आध्यात्मिक मार्गांचाही शोध घेण्याचा प्रयत्न काही लोक करतानाचे चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा सदुपयोग मानसिक स्वास्थ्यासाठी होतो. संगीतोपचार ही अभिनव संकल्पना उदयाला आली. संगीतात असणाऱ्या अनोख्या संमोहन शक्तीमुळे सध्या रोगांवर पूरक उपचार म्हणून संगीतोपचार लोकप्रिय होत आहे. प्राचीन संगीत ग्रंथांमध्ये असलेल्या प्रत्येक रागाचा स्वत:चा असा मूड आहे. काही राग करुण आहेत, तर काही शांत. अनेक राग शृंगार रसप्रधान आढळतात. संगीतशास्त्रानेच या रागांचे वर्गीकरण करुण, शांत, शृंगार, हास्य, वीर, रौद्र, बीभत्स, गंभीर आणि भयानक अशा नऊ रसांमध्ये म्हणजे भावांमध्ये केले आहे. या शास्त्रीय वर्गीकरणाचा उपयोग करत विविध रागांचा उपयोग मनाच्या विविध अवस्थांमध्ये करून घेता येईल. संगीतोपचार पद्धत ही संकल्पना फार जुनी आहे. त्याचा गंधर्व वेद चिकित्सा असा उल्लेख सामवेदातही आहे. कुठलाही राग थेरोपेटिक एजंट म्हणून काम करतो. संगीतातील ताल, श्ती, विविध राग यांचा वेळेनुसार आणि रुग्णाच्या मानसिक स्थितीनुसार उपयोग केला, तर मानसिक आजार बरे होतात आणि मन प्रसन्न राहते.



संगीतोपचार द्वारे खालील रोगावर आधारित रागावरील गीत प्रभावीपने उपचार केली जातात. **१) पचन समस्या :-** जर तुम्हाला काही खाल्ल्यानंतर अस्वस्थ वाटत असेल, तर ते अपचनामुळे देखील असू शकते. पचन समस्या सामान्य असू शकतात, परंतु नेहमीच नाहीत. पाचन तंत्राशी संबंधित सर्वात सामान्य समस्या म्हणजे अतिसार, बद्धकोष्ठता, चिडचिड, पोटात गोळा येणे, ओटीपोटात पेटके, गॅस आणि मळमळ. पचन संबंधित समस्यांविरुद्ध लढण्यासाठी आपण बरेच घरगुती उपचारांचा अवलंब करता. पाचक प्रणाली निरोगी ठेवण्यासाठी संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो. **२) अध्यात्मिक उन्नती व संतुलन साधणारा :-** भारतीय संस्कृती, परंपरेत अन्य गोष्टींप्रमाणेच आध्यत्मिक साधनेला अनन्य साधारण महत्त्व आहे. आत्म्याचा परमात्म्याशी संवाद होण्यासाठी आध्यात्मिक साधना केली जाते. आध्यात्मिक साधनेमुळे नकारात्मकता दूर होते. मनावर नियंत्रण मिळणे साठी संगीतोपचार संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो.

**३) स्किन आणि एलर्जिस:-** ही आजकाल प्रत्येकासाठीच एक मोठी समस्या बनली आहे. कधी चुकीच्या आहारशैलीमुळे तर कधी कोणत्या चुकीच्या क्रीम, कॉस्मेटिक्समुळे त्वचेवर रॅशेज, मुरुम, खाज अशा समस्या उद्भवू लागतात. या समस्या बहुतांश वेळा शरीर व चेह-यावर डाग देखील सोडून जातात. स्किन ॲलर्जी फुड ॲलर्जीपेक्षा खूप वेगळी आणि वेदनादायक असते. स्किन ॲलर्जीमध्ये शरीरावर लालसर चट्टे किंवा पुरळ येऊ लागतात. तुम्हाला कोणती सौम्य स्किन ॲलर्जी असेल तर संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो.

**४) आम्लपित्त, दाह, उष्णता आणि ॲसिडिटी :-** उष्म्याची तीव्रता वाढली की शरीरामध्ये आम्लाचे प्रमाण वाढू लागते, याला आपण ढोबळमानाने पित्त वाढणे म्हणतो. त्यामुळे शरीराचे सुरळीत असलेले कार्य विस्कळीत होते, झोपेवर परिणाम होतो, भूक मंदावते. ही आम्लता वाढू नये यासाठी काही प्राथमिक काळजी घेणे गरजेचे आहे. असा व्यक्ति जगात नसेल ज्याला या आजाराने ग्रासले नसेल या आजारावर आपण अनेक घरगुती उपचार करतो. संगीतोपचार पद्धतीत संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो. **५) निद्रानाश:-** जगातील सुमारे ३५ टक्के व्यक्ती निद्रानाशाने ग्रस्त आहेत. निद्रानाश ही मनुष्यास होणारी एक व्याधी आहे. यात झोपेचे प्रमाण अत्यल्प किंवा जवळ-जवळ नसते. हा एक मनाशी संबंधित आजार आहे. हा सहसा लवकर लक्षात येत नाही व त्याने गंभीर रूप धारण केल्याशिवाय जाणवत नाही. मनुष्यास आधुनिक जीवनशैलीमुळे हा रोग जडतो. मानवाला जीवन जगण्यास आवश्यक अशा अन्न, पाणी तसेच शुद्ध हवा याचेबरोबरच झोपही तितकीच आवश्यक असते. झोप व मेंदू याचा अतिशय निकटचा संबंध असतो. अनेक लोकांना झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो. **६) मानसिक ताण:-** आज माणुस मानसिक ताणतणावात फसत चालला आहे. आज माणूस मनशांती हरवतोय. शारीरिक व्याधीही त्याच्या स्वागताला हजर होत आहेत. कोणत्याही प्रकारचे सुख उपभोगण्यासाठी चिंतामुक्त असणे आवश्यक असते. मानसिक तनावातून बाहेर निघण्यासाठी संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो. **७) हृदयविकार:-** हृदय शरिराच्या वेगवेगळ्या भागांना रक्त पुरवठा करते. हृदयाला प्राणवायूयूक्त रक्तपुरवठा करणाऱ्या शुध्द रक्तवाहिन्यांना हृदयधमन्या (कोरोनरी आर्टरी )असे म्हणतात. जर अशा धमन्यांमध्ये अडथळे येऊ लागले तर हृदयाला रक्त मिळत नाही व ते मरते. ह्यालाच हृदयविकार म्हणतात. हृदयविकारात धोक्याची पातळी हृदयाच्या स्नायुंना किती दुखापत झाली आहे यावर अवलंबून असते. मृत स्नायुंमूळे हृदयाला होणाऱ्या रक्त पुरवठ्याचा वेग कमी होतो (कंजेस्टीव हार्ट फेल्यूअर) होतो व त्यामुळे पाऊलांना घाम फुटून श्वसनास त्रास होतो. हृदय विकारावर उपाय करण्यासाठी संगीतोपचार पद्धतितील गीत आपण ऐकले तर बराच फरक पड़तो. या वर आधारित गीत वैष्णवी वाघ आणित संचित साखळीकर सादर करणार आहे.''खर तर आपण आज संगीतोपचार विसरत चाललो आहोत संगीतं श्रवणामृतं ! असे म्हटले जाते. अनेक मनाच्या आजारात संगीत हे संजीवनीचे कार्य करित असते. संगीताचे जीवनातील महत्व आज लोकांनी ओळखायला हवे तसेच जीवन जगतांना प्रत्येकाने संगीत शिकायला हवे!'', असे आवाहन मन्मथ म्युझिक एकेडमीचे संगीत शिक्षक तथा संगीत तज्ञ लक्ष्मण चुकेवार यांनी केले आहे. आज प्रत्येक व्यक्ति कोणत्या ना कोणत्या आजाराने किंवा व्याधीने त्रस्त आहे एल. कुठ तरी मागील काही काळात आपण संगीतोपचार विसरत चाललो असल्याचे चित्र दिसून येत आहे. संगीत आणि आजारावर उपचार अर्थात संगीतोपचार काळाची गरज आहे. संगीताची गोडी प्रत्येकाच्या मनात निर्माण व्हावी एवढीच अपेक्षा!



## कृषिजगात

धनंजय काकडे
९८९०३६८०५८

# आर्थिक स्वातंत्र्य अन् कर्जमाफीच्या नावावर नौटंकी!



शेतकरी संघटनेची कर्जमुक्ती म्हणजे शेतकऱ्यांनी स्वत:साठी पुकारलेले आंदोलने, व राजकीय पक्षांनी पुकारलेले कर्जमाफी आंदोलन म्हणजे पुढील निवडणुकीसाठी राजकीय व्यवस्थेची तयारी करणे. हा जर फरक शेतकऱ्यांना व जनतेला कळत नसेल तर आर्थिक स्वातंत्र्य कसे मिळणार ? प्रश्न असा आहे ,आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे काय ? तर शेतकऱ्यांना विरोधी कायद्याच्या चाकोरीत अडकवून ठेवून, चुकीच्या आर्थिक धोरणाच्या माध्यमातून जखडून ठेवलेला शेतकरी तसेच शेतमाल व्यवस्था आहे. केंद्र शासनाच्या चुकीच्या व्यवस्थेतून मुक्त करणे, म्हणजेच शेतमालाची आयात - निर्यात ही देश पातळीवर नव्हे तर ही जागतिक पातळीवर, बाहेरील देशात शेतीतील कच्च्या मालाची मुक्त व्यापार पेठ, देवाण-घेवाण करणे गरजेचे आहे. यालाच आपण खुली अर्थव्यवस्था म्हणतो. तुम्हाला ही गोष्ट अडचणीची वाटेल, परंतु जेव्हा महाराष्ट्रात कापूस फेडरेशन सुरू होते. शेतकऱ्यांना कापूस बाहेर पाठवण्यासाठी राज्य बंदी होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आंदोलने करून ती राज्य बंदी, झोन बंदी उठवून संपूर्ण भारतात कापूस पाठवण्यासाठी महाराष्ट्र व केंद्र सरकारवर दळपण आणले होते व कापूस फेडरेशन ही व्यवस्था शेतकरी आंदोलनामुळे मुक्त झाली. तसेच बहिरम (ता.चांदूरबाजार. जिल्हा.अमरावती) येथे त्याकाळी शेतकऱ्यांनी उठाव करून झोन बंदी तोडली. व कापूस बैलगाड्या मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश , गुजरात, मध्ये पाठविल्यात म्हणजेच कापूस उत्पादक शेतकरी हा नुसते एका राज्यापुरता बंदिस्त केला होता. मग जागतिक पातळीवर जर निर्यात झाली तर शेतमालाचे भाव जगात जे आहे ते शेतकऱ्याला मिळतील ना ? पण त्यासाठी फार मोठा संघर्ष व आमदार- खासदारांचा भरणा राज्यात व केंद्रात शेतकऱ्याच्या बाजूने बोलणारा लागेल ना ? आज तर जनता उद्योगपतीचे सरकार चालवीत आहे.ही गोष्ट फक्त रस्त्यावर उतरून आंदोलनातून शक्य होणार नाही ,तर तुम्हाला ती हाऊस मध्ये तुमचे प्रभावी आमदार- खासदार असल्याशिवाय अन् रेटून धरल्याधिवाय होणार नाही, ती व्यवस्था बदलणार नाही. त्यांचे राजकीय पक्ष हे गाव लीडर व राजकीय दलालाच्या मार्फत उपद्रव करतात. म्हणजेच तुम्हाला शेतमाल जागतिक बाजारपेठेत नेण्यासाठी संघर्ष करावा लागेल,कर्जमाफी म्हणजे सतत शेतकऱ्यावर लादलेली गुलामी आहे. शेतीमालाला भाव कमी द्यायचा आणि बँकेमार्फत पैसा पुरवठा करून शेतकऱ्यांना उपकार केल्याचे दाखवायचे हेच वर्षानुवर्षे चालत आले आहे. जोपर्यंत शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही तोपर्यंत कोणतेही बँकेचे पिक कर्ज देणे घेणे करू नये ,कारण हे सर्व कर्जे अनैतिक आहेत.ही सर्व सुलतानशाही वापरली जात आहे. स्वातंत्र्य काळानंतर जनता कापसाला पांढरं सोनं म्हणायचे, म्हणजेच कापूस व पिवळे दागिने , सोने यांचे भाव सारखे होते. मग पांढरा सोने (कापसाचे) भाव कमी झाले व पिवळं सोन्याचे भाव जागतिक बाजारपेठेत वाढले.म्हणजेच शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठेचे भाव मिळणे व त्यातून समृद्धी तयार होणे ,यालाच खऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य म्हणतात. आणि केंद्र सरकार मधील राजकीय पक्ष काँग्रेस व बीजेपी दोन्ही पक्ष सुध्दा यासाठी तयार होणार नाही. मागे मराठा आंदोलन हे फक्त विधानसभेपुरतेच होते. आणि यासाठी काही नेते, राजकीय दलाल हे सुपाऱ्या घेऊन काम करीत असतात. निवडणुकीचे वारे वाहत असताना असे वातावरण तयार करणे, हे महाराष्ट्राला काही नवीन नाही. या अगोदर असे अनेक आंदोलने महाराष्ट्राने पाहिलेली आहे. परंतु आताचा कर्जमाफी हा मुद्दा, शेतकऱ्यांच्या आताच्या सध्याच्या अडचणीमुळे जीवनाशी व त्यांच्या जगण्याच्या भावनेशी निगडित आहे. जेव्हा - जेव्हा महाराष्ट्रात निवडणुकी येतात, तेव्हा हे असे फुगारे , फुटवे येत असतात ,आज पर्यंत एकही शेतकरी आत्महत्या वर आमदारांनी राजीनामा दिला नाही, हे सर्व सत्ताधीश लालची पोट भरू व्यवस्था स्वतःसाठी सांभाळत आहे. जनतेला जरी कर्जमाफी झाली पाहिजे ,असे नक्कीच वाटत असते, कारण तो निराधार व निराश्रीत झाला असल्यामुळे, त्याच्या बाजूने जो कोणी बोलेल त्याला त्याचा आधार वाटत असतो, व हे राजकीय बांडगुळ त्याचा असाच फायदा घेत ७५ वर्षे यांनी सत्ता भोगली ,असे असेल तरी या कर्जमाफीच्या नावातून सत्ता तयार करणे ,हा सर्वात मोठा यांचा उद्देश आहे. अशा राजकीय बांडगुळांना जरी समाजसेवी व्यवस्था म्हणत असंले तरी ती मात्र शंभर टक्के राजकीय व्यवस्था असते,म्हणूनच नौटंकी आंदोलनमुळे तरुण मुलांना पाण्याच्या टाकीवर, झाडावर चढने, नदीच्या पाण्यात अर्ध नग्न आंदोलन करणे आवडते. हे असे विचारपूर्वक आंदोलन नसतात, तर समाजाला घुमाविनाचा प्रकार आहे. अश्या प्रकारे महाराष्ट्रात ठिकठिकाणी राजकीय दलाल पेरून ठेवले आहे. जिकडे बैल हाकलला तिकडे चालला. या सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दीसणार आहे. कर्जमाफीला कोणताही शेतकऱ्याचा आणि जनतेचा विरोध नाही ,परंतु सोंग काढून तमाशा करणाऱ्याला विरोध आहे. आणि शेतकरी कर्जमाफी हा तात्पुरता मलमपट्टी पर्याय आहे.कर्जमाफी झाली तरी शेतकरी दुरुस्त होत नाही, कर्जमाफीच्या नावावर दुसरे कोणतेही सरकार स्थापन झाले तरी शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. शरद पवार सरकार हे सुद्धा चारदा मुख्यमंत्री राहिल्यानंतर ते स्वतः शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकले नाही? कारण त्यासाठी कायदे रद्द व दुरुस्त करावे लागतील. सत्तेत आल्यास आम्ही एकही शेतकरीआत्महत्या होऊ देणार नाही, हे किमान काँग्रेस ,राष्ट्रवादी ,शिवसेना, बीजेपी पक्षांनी जाहीर करावे व नंतरच मतदान घ्यावे? असे का ठामपने विश्वासाने कोणताच पक्ष जाहीर करीत नाही? आता उठाव करण्यासाठी आंदोलनासाठी यांना शेतकऱ्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग दिसत नाही. जातीचे भांडण लावून संपले, मराठा झाले , बौद्ध समाजांचे भांडणे लावून संपले, आता फक्त एकच आर्थिक दृष्टिकोनातून कर्जमाफी हेच एक गांजर ,आता जनतेत लागणारे भांडण लावने आहे. आणि या राजकीय कर्जमाफीचा फायदा सत्ताधीश व विरोधक दोघेही घेण्याच्या तयारीत आहे. तुम्हीच तर सर्व मंडळी वर्षानुवर्षे सत्तेत होती, मग नेहमी - नेहमी कर्जमाफी करण्याचे उद्देश काय? आणि जनतेला कर्जमाफीसाठी आंदोलने करण्याची गरज काय ? जनतेला बेवकूफ बनवून सत्तेत जाणे हा एवढाच या मागचा फार मोठा उद्देश आहे? कारण सतत गेल्या ४५वर्षपासून शेतकरी संघटना सतत आंदोलन करून आर्थिक डबघाईस आल्याने त्याचा फायदा हे सत्ताधीश घेत आहे .म्हणूनच कर्जमाफी हे फक्त राजकीय नौटंकी आंदोलन ठरत आहे.



## कथा

प्रा. मोहन काळे
मो. ८०२१७५३३२६




''नाही. तो त्याचा अभ्यास करतो. आम्ही आमच्या मोबाईलवर व्यस्त असतो. ''
''तुम्ही दोघे तो काय अभ्यास करतो हे पाहत नाही? त्याला विचारत नाही? तो मोबाईलवर काय पाहतो, कोणता अभ्यास करतो हे कधी तपासून पाहत नाही?'' ''विचारतो ना. तो सांगतो की या विषयाचा अभ्यास करतो. आम्ही त्यावर विश्वास ठेवतो. परंतु त्याचे चाचणीतील गुण पाहून त्याचं अभ्यासात लक्ष नाही अशी आमची खात्री झाली आहे.''''मला तुमची समस्या समजलेली आहे. अथर्व अभ्यासात मागे का पडला आहे, त्याचं अभ्यासात लक्ष का लागत नाही हे मला पुरतं कळलेलं आहे.''
''तुम्हांला कळलेलं आहे? काय कारण आहे? पटकन सांगा आम्हांला. आम्ही त्यासाठीच तुम्हांला बोलावलेलं आहे.''
''तर मग ऐका. अथर्व अभ्यासात मागे पडत आहे, त्याचं अभ्यासातील लक्ष कमी झालेलं आहे त्यात अथर्वचा काहीच दोष नाही. त्यांत दोष आहे तुमचा. तुम्ही दोघांचाही. हॅबिट फॉर्मेशन ही एक संकल्पना आहे. म्हणजे एखाद्या गोष्टीची सवय अंगी बाणवणे. जोपर्यंत तुम्ही त्याला मोबाईल घेऊन दिला नव्हता तोपर्यंत त्याच्याकडे पुस्तकांशिवाय दुसरं काही साधन नव्हतं. तो पुस्तकातून अभ्यास करायचा. त्याची त्याला सवय लागली होती. गुगलवरून काही शोधायचं असेल तर तो तुमचा मोबाईल घेऊन त्यात हवी ती माहिती शोधायचा किंवा ती माहिती तुम्ही त्याला शोधून द्यायचे. . तुमच्याकडे एकच मोबाईल असल्याने तो काय पाहतो, कोणती माहिती शोधतो हे तुम्हाला सहज कळायचं. त्यामुळे अथर्व त्याला हवी तीच माहिती शोधायचा. इतर माहिती पाहायचा नाही किंवा शोधायचा नाही. तशी त्याला सवय नव्हती. परंतु आता घरात प्रत्येकाकडे स्वतंत्र मोबाईल आहे. तुमच्या दोघांच्या बोलण्यावरून माझ्या हे लक्षात आलेलं आहे, की मोबाईल पाहण्याची जास्त सवय तुम्हां दोघांनाही लागली आहे. तुम्ही दोघांनाही मोबाईलचं व्यसन लागलेलं आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. मुलांना आपण कशा सवयी लावल्या पाहिजे हे तुम्ही विसरलात. फक्त पुस्तकं, गाईड्स आणून देऊन किंवा मोठ्या महाग शाळेत टाकून किंवा ट्यूशन लावली म्हणजे मुलाला खूप चांगले गुण मिळतील असं नसते. तुम्ही दोघेही त्याला वाचन करताना दिसत नाहीत. मग तुम्ही त्याच्याकडून अपेक्षा कशी करता? तुमची न वाचण्याची सवय अप्रत्यक्षपणे त्याने तुमच्याकडून शिकली आहे. जुईताईकडे आधी मोबाईल नव्हता. त्यामुळे त्यांचं लक्ष अथर्वकडे असायचं. तो अभ्यास करतो की नाही, करतो तर कशाचा करतो हे त्या पाहायच्या. याचा प्रत्यक्ष दबाव किंवा धाक अथर्ववर असायचा. पण आता जुईताई मोबाईलवर सिरियल, रील्स पाहतात. मुलाच्या ज्या वयात त्याच्याकडे लक्ष देणं आवश्यक आहे त्यावेळी तुम्ही रील्स पाहण्यात घालवत असाल तर मुलाला दोष देऊन काहीच फायदा नाही. तुम्ही मोबाईल पाहू नका, सामाजिक माध्यमांवर सक्रीय राहू नका असं माझं म्हणणं बिलकुल नाही. तुम्ही बाहेरच्या जगात कनेक्ट आहात ही चांगली गोष्ट आहे. पण बाहेरच्या जगाशी कनेक्ट राहून घरातल्या व्यक्तीशीच जर डिस्कनेक्ट असाल तर ती चिंता करण्याची बाब आहे. मुलगा शाळेत असताना, ट्यूशनला गेलेला असताना, बाहेर पटांगणावर खेळायला गेला असताना तुम्ही मोबाईल पाहा ना. पण तो त्याच्या खोलीत खरोखर अभ्यास करतो की मोबाईलवर गेम खेळून टाईमपास करतो किंवा मोबाइलवर जे त्याने पाहू नये तेच जर पाहत असेल तर अभ्यासात त्याचं लक्ष कसं लागेल? त्यानं वाचलेलं पाठ कसं राहील? त्याची एकाग्रता कशी टिकून राहील? त्याची मनस्थिती अभ्यासासाठी पूरक व पोषक कशी राहील? त्याचं लक्ष विचलित राहील व त्याला वाईट सवय लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी त्याला नाही तर तुम्हांला तुमची सवय बदलावी लागेल. पालक म्हणून तुमचं ते कर्तव्यच आहे. सर्वप्रथम त्याच्याजवळचा मोबाईल काढून घ्या. तो कारण विचारेल. जुईताईंचा मोबाईल बंद करून ठेवा व त्याचा मोबाईल जुईताईंना वापरायला द्या. वाटल्यास खोटे बोला की जुईताईंचा मोबाईल हरवला म्हणून. त्याला जेव्हा मोबाईलची गरज भासेल तेव्हा त्याला मोबाईल वापरायला द्या. पण तो काय पाहतो, काय शोधतो यांकडे जाणीवपूर्वक लक्ष असू द्या व तशी जाणीव त्याला झाली पाहिजे असे प्रयत्न करा. त्याच्याशी संवाद साधा. त्याच्या अभ्यासाविषयी, शाळेतील गोष्टींबद्दल बोला. संवाद कमी झाला की वाद किंवा विसंवाद त्याची जागा घेतात. मुख्य म्हणजे तुम्ही दोघे वर्तमानपत्रे,मासिके, माहितीची पुस्तके, साहित्य वाचण्याची सवय लावा. तुमची सवय पाहून ती सवय त्यालाही लागेल व त्याचं वाचनातून उडालेलं लक्ष परत वाचनाकडे येईल व त्याची एकाग्रता साधल्या जाईल. ट्रॅक सोडून बाहेर गेलेला अथर्व परत ट्रॅकवर येईल. मग तो जास्तीत जास्त गुण मिळवील आणि तेही आनंदी जीवन जगता जगता. मग बदलणार का तुम्ही तुमची सवय?'' मकरंद सर दोघांकडे एकटक पाहत म्हणाले. ''नक्कीच, सर. आम्हांला माहीतच होते की तुम्ही काही ना काही चांगला मार्ग काढणार म्हणून.'' शंतनू व जुई दोघांच्याही चेहऱ्यावर उपाय सापडल्याचा आनंद व मकरंद सरांबद्दलचा कृतज्ञतेचा भाव दिसत होता

भाग – २

लोकार्थ

# आत्मनिर्भर भारतासाठी आरआरपी इनोव्हेशन आणि ऑप्टिक्स बुल्गारियासोबत भागीदारी



भारताच्या आत्मनिर्भरता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या एका ऐतिहासिक पावलांनी वेगाने वाढणाऱ्या भारतीय इलेक्ट्रो-ऑप्टिक्स कंपनीने, प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिक्स सोल्यूशन्समधील जागतिक प्रणेते असलेल्या ऑप्टिक्स बुल्गारियासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.२० जून रोजी औपचारिकरित्या संपन्न झालेला हा सामंजस्य करार, आरआरपी एस४ई इनोव्हेशन लि.साठी एक ऐतिहासिक क्षण आहे, जो अत्याधुनिक संरक्षण उत्पादनांच्या नवीन पिढीसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण (टीओटी) साठी मार्ग मोकळा करतो, ज्यामध्ये अल्ट्रा लाइटवेट थर्मल साइट्स विस्तारित लांब पल्ल्याची देखरेख पद्धती समाविष्ट आहे.हँडहेल्ड थर्मल इमेजर्स (एचएचटीआय) ऑप्टिक्स बुल्गारियाने खोलवर कौशल्य आणले आहे. इन-हाऊस संशोधन आणि विकासाद्वारे त्यांच्या सर्व उत्पादन ऑफरमध्ये त्यांनी प्रभुत्व मिळवले असून त्यांच्या नवकल्पनांची युद्ध-चाचणी केली जाते. तसेच जागतिक स्तरावर त्यांचा आदर केला जातो. या सहकार्याने, कंपन्यांचे उद्दिष्ट अशा प्रगत थर्मल तंत्रज्ञानाचा वापर करणे आहे, जे या क्षेत्रात कधीही वापरले गेले नाही. स्पर्धात्मक किमतीत उच्च कार्यक्षमता प्रदान करतात.

३०० हून अधिक थर्मल साइट्स आधीच धोरणात्मक ठिकाणी तैनात आहेत. ऑप्टिक्सचे प्रमुख उत्पादन डायना हे इलेक्ट्रो-ऑप्टिक्समध्ये गेम-चेंजर म्हणून आ०ळखले जाते. हे नवोपक्रम आता भारतीय गरजांनुसार अनुकूलित केले जातील, जे वास्तविक युद्धक्षेत्रातील आव्हानांना व्यावहारिक, आघाडीचे उपाय प्रदान करतील.

# एलेनबेरी इंडस्ट्रीयल गॅसेसचा आयपिओ, २४ जून २०२५ रोजी खुला होणार




एलेनबेरी इंडस्ट्रियल गॅसेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी रु. २ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ३८० ते रु. ४०० असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, २४ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २६ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि पद्म कुमार अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या इक्विटी शेअर्स आणि वरुण अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे.नवीन इश्यूमधून मिळणारे २१० कोटी रुपयांचे उत्पन्न कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफ ेड/पूर्वपेमेंटसाठी वापरले जाईल; २२० टीपीडी क्षमतेच्या उलुबेरिया- प्लांटमध्ये एअर सेपरेशन युनिटची स्थापना करण्यासाठी १०४.५० कोटी रुपये; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरले जाईल.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 80



संकेतामध्ये दिलेले शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहा

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- कफ
- कस
- कान
- काय
- खुर
- गम
- चर
- जडी
- धर
- नथ
- नस
- पथ
- बार
- मर्म
- नस
- नदी
- भान
- रण
- रव
- वज
- वर
- सदा
- सती
- हाक

**तीन अक्षरी**
- आसन
- उशिर
- कणेर
- कामाग्नि
- गणेश
- घावटी
- नभाक
- नयन
- नीरज
- नीरस
- पथक
- परब
- परीस
- बासन
- याजन
- रावण
- रोकड
- लकवा
- लघाळ
- शहारा
- शैलजा
- सराफ
- सुअर
- सोहम
- संधान

**चार अक्षरी**
- अवकळा
- कास्तकार
- खवळणे
- खाकरणे
- खोकरणे
- गाणपत्य
- जमदग्नी
- तकतकी
- तळीराम
- दामटणे
- धर्मसभा
- नंदादीप
- पुरचुंडी
- प्रजनन
- मालामाल
- रसवंती
- वादग्रस्त
- वालुकायंत्र
- विनायास
- समरस
- समापत्र
- संघटन
- हवामान
- हावभाव

**पाच अक्षरी**
- अवतरण
- अवरोधक
- आनंदघन
- कर्मसंन्यास
- नखशिखांत
- मिजासखोर
- वरकरणी
- समाराधन
- संधिप्रकाश

**सहा अक्षरी**
- गाणे बजावणे
- बचबचपुरी
- भावनाप्रधान
- लेकुरवाळी
- वंदेमातरम्
- श्रीरामजानकी

**अन्य अक्षरी**
- कर्मण्ये वार्धिकारस्ते मा फलेषु कदाचन
- मान वर करणे

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 460



**—: आडवी विधाने:—**

2) लग्नात नवरदेवाकडील वऱ्हाडी मंडळीस उतरण्यासाठी दिलेली जागा
5) साखर, वेलची व केशर घालून तयार केलेला भात
9) त्रिलोकी भ्रमण करणारा एक देवर्षी
12) मूल्य, किंमत
14) राखण करणारा
16) पैसा असला की कोणतेही कार्य सहज साध्य होते या अर्थाचा एक वाक्प्रचार
18) नाजूक व सुंदर बांधा
20) आस्वाद घेणे, पेय पिणे
22) मैद्याच्या पोळीचा एक प्रकार
23) धाव (इं.)
24) विचार, अभिप्राय
26) योग्य आदरतिथ्य, व्यवस्था
28) उपकरण
30) प्रयत्न, कष्ट
31) बारीक झणझण
33) सारखे, तुल्य
35) लाकूड
36) त्याचा, तिचा (सं.)
38) गावभर भटकणारी स्त्री
39) शिवधनुष्य
40) रामायणात साधुचे सोंग घेऊन सीतेचे हरण करणारा
41) बदक (इं.)
43) जिंकलेला
44) मनास वाटणारी स्वस्थता, समाधान
45) आंब्याचा रस
46) सांखळी
47) मन मोहून टाकणारे
49) आपल्याच मनाप्रमाणे वागणारा
51) पशुंचा समुदाय, झुंड
52) विनाकारण
53) पुरूष
55) बारा महिन्यांचा कालावधी
56) लयास जाणे, मावळणे
57) रूची, द्रव
59) दुर्मीळ, अभाव
60) टीका, समीक्षण
62) निरोप, बातमी
64) चुरशीचा खेळ
67) भान सुटलेला
68) स्पष्टीकरण
69) नापसंती, निषेध
71) पायी जाण्याचा मार्ग
73) मोराचे ओरडणे
75) रात्रभर जागे राहणे
76) आपदा
77) गार, थंड, सुखद
78) मध्यप्रदेशातून वाहणारी एक नदी
79) एक वृक्षविशेष
80) नवीन, नूतन
81) बाळंतिणीची सकुशल सुटका करणारी, सुईण
82) स्मृतिचिन्ह
83) वाळूच वाळू असलेला प्रदेश

**—: उभी विधाने:—**

1) दिवाकर, सूर्य
3) नवरदेव
4) शिकलेला, अक्षर ओळख असलेला
6) खजिन्यावरचा मुख्य अधिकारी
7) खच्ची केलेला
8) अंधःकार
9) स्त्री
10) कागदाचा चतुर्थांश
11) शांत करणे
13) वांती, ओकारी
15) हातोटी, कौशल्य
17) मस्तकविहीन शरीर
19) यमाकडून मिळणारी भयंकर शिक्षा
21) वृक्षावरच पिकू लागलेले फळ
25) मनाचे समाधान करून घेणे (उर्दू)
27) प्रशंसा, प्रार्थना
28) स्वातंत्र्यवीर वि. दा. चे आडनांव
29) तपकीर
32) आडदांडपणाने केलेले कार्य
34) अहंकारी, घमेंडखोर
35) काळ्या पाठीचा हरीण
37) ईश्वर
39) महाभारतातील भीष्मांची उपाधी
40) लाकूड जळल्यावर उरणारे अवशेष
42) हाताची नाडी बघुन रोग ओळखणे
44) पुष्प, फूल
45) मन वेधून घेणारे, ओढणे
46) युक्ती, दुःखाची रग
48) सेवक
50) चिलखत
52) श्रीविठ्ठलाचे एक परमभक्त संत
55) रचना करणारा
56) पैसा, आशय
58) एक भित्रा पण चपळ प्राणी
60) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी
61) मदन
62) कायदा
63) ओशाळलेला
65) तळहाताची मागची बाजू
66) देणारा
67) चहूबाजूंनी पाण्याने वेढलेला प्रदेश
70) युद्धातील डावपेंच
71) तराजूच्या पारड्यातील विषमपणा काढून टाकण्यासाठी त्यात टाकलेला जिन्नस
72) मार्गक्रमण करणारा, प्रवासी
74) दूध, केळी मिश्रित एक पक्वान्न
75) कन्येचा पति

(उत्तर पुढील अंकी )

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** घाईघाईत चुकीचे निर्णय घेण्यापासून टाळा. अडकलेली कामे अचानक गती घेऊ शकतात. आज चैनीच्या वस्तूंवर मोठा खर्च होण्याची शक्यता आहे.

**वृषभ:** तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल. तुमच्या बहिणींसोबतच्या तुमच्या नात्यात कटुता येऊ शकते.

**मिथून :** मनाच्या अस्थिरतेमुळे तुम्ही निर्णय घेऊ शकणार नाही. तुमचा राग नियंत्रित करा. तुमच्या नात्यांमुळे अडकलेले काम गती घेईल.।

**कर्क :** अचानक आर्थिक लाभ होऊ शकतो. मोठी गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. जी फायदेशीर ठरेल. व्यवसाय नवीन उंचीवर पोहोचेल. विर-ोधक सक्रिय असतील.

**सिंह :** काम करणाऱ्या लोकांसाठी वेळ शुभ आहे. तुम्ही कौटुंबिक कार्यक्रमाची तयारी करण्यात व्यस्त असाल. तुम्हाला कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा मिळेल.

**कन्या :** अडकलेले काम पूर्ण होईल. तुम्ही एखाद्या खास व्यक्तीला भेटाल. तुम्ही तुमच्या कामात समर्पित नाही आहात. काळजीपूर्वक काम करा.

**तुळ :** तुम्ही शुभ कार्यात सहभागी व्हाल. तुमच्या मुलाच्या प्रगतीने तुम्ही आनंदी असाल. तुमच्या सहकाऱ्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** रागाचा अतिरेक असेल. तुम्ही फायदेशीर संधी शोधत आहात. व्यवसायात नवीन सौदे होतील. तुम्ही नवीन मित्र बनवाल.

**धनु :** आरोग्य सुधारेल. एकत्र बसून कौटुंबिक वाद सोडवले जातील. अनपेक्षित प्रवास होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या जीवनसाथीचा पाठिंबा मिळेल.

**मकर :** सैन्य प्रशासनाशी संबंधित लोकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. विरोधक सक्रिय राहतील, सावधगिरीने वेळ घालवा. तुम्हाला पोटाशी संबंधित आजार होतील.

**कुंभ :** आज तुम्हाला तुमच्या संपर्कांचा फायदा होईल. तुम्ही मित्रांसोबत वेळ घालवाल. तुम्हाला नवीन कपडे आणि दागिने मिळू शकतात.

**मीन :** प्रवासाची शक्यता आहे. तुम्हाला नोकरीत पदोन्नती मिळू शकते. उमेदवार यशस्वी होतील. घरगुती वादामुळे तुम्ही तणावाखाली राहाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### सायकलस्वाराचा नाल्यात पडून मृत्यू

**रिसोड :** सायकल स्वाराचे नियंत्रण सुटल्याने सायकलसह नाल्यात पडून एका ६५ वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २२ जून रोजी सकाळी नऊ वाजताच्या दरम्यान रिसोड तालुक्यातील गोवर्धन येथे घडली. इस्माईल खा हाफिज खान पठाण वय ६५ वर्षे राहणार गोभणी तालुका रिसोड असे मृतकाचे नाव असून गोभणी येथून शिरपूर कडे सदर व्यक्ती जात असल्याची माहिती मिळाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार रिसोड तालुक्यातील गोभणी येथील रहिवासी इस्माईल खा हाफिज खा पठाण हे गोभणी येथील मशिदीमध्ये इमाम म्हणून नमाज पठण करवायाचे काम करत होते. दिनांक २२ जून रोजी सकाळी ते आपल्या सायकलने गोभणी वरून शिरपूरला जाण्याकरिता निघाले असता सकाळी नऊ वाजता च्या दरम्यान गोवर्धन येथील वळणावर नाला व त्यातच मोठा उतार असल्याने त्यांचे सायकल वरचे नियंत्रण सुटले व इस्माईल खा पठाण हे सायकल सह नाल्यात पडले. गोवर्धन येथील स्थानिक नागरिकांनी त्यांना आरडा ओरड करून यादरम्यान थांबवण्याचा प्रयत्न केला मात्र ते अपयशी ठरले. नाल्यात पडताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन इस्माईल का पठाण यांना गोवर्धन येथील एका खाजगी रुग्णालयात भरती केले. मात्र रक्तस्त्राव अधिक झाल्याने व मार मोठा लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. ॲम्बुलन्स ने इस्माईल खान यांचा मृतदेह त्यांचे मूळ गाव गोभणी येथे पाठवण्यात आला व संध्याकाळी सहा वाजता त्यांचा गोभणी येथील कब्रस्तान मध्ये अंत्यविधी पार पडला.

### कर्तव्यदक्ष अधिकारी संतोष आडे यांचा 'जिजाऊ गौरव पुरस्काराने' सन्मान



**अकोला:** जिल्हा परिषद अकोला येथील समाजकल्याण विभागात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष अधिकारी संतोष आडे यांचा 'जिजाऊ गौरव पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि ग्रामीण भागातील कलावंतांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांची अडचण दूर करण्यासाठी आडे साहेबांनी घेतलेली आस्था आणि योगदान याची दखल घेऊन त्यांचा हा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार अकोल्यातील न्यु महसूल कॉलनी, खडकी बु. येथील मॉ. जिजाऊ सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांच्या प्रमुख उपस्थितीत मानपत्र, मोमेंटो आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कलावंत डी. जे. वानखडे होते. या वेळी कलावंत बी. गोपनारायण, साहित्यिक अर्जुन घुगे, मिलिंद बनसोड, वऱ्हाडी झटका चे संपादक दिलीप दांदळे, क्राईम ड्युटी चे संपादक दीपक शिरसाट, अकोला मेट्रो चे संपादक संतोष मोरे, समाधान खरात, वाचनालयाचे सभासद ओरा चक्रे सर, कलावंत ॲड. प्रजानंद उपर्वट, कवी/गायक अनिल श्यामस्कर, रंजनाताई आडे, जयश्री आडे, निर्भय रमेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. प्रजानंद उपर्वट यांनी केले, तर आभार प्रदर्शन वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांनी मानले.

संतोष आडे यांचे सातत्याने सामाजिक कार्य आणि ग्रामीण भागातील उपेक्षित कलावंतांना दिलेले बळ, हे त्यांच्या कार्यातील ठळक वैशिष्ट्य ठरत असून, या पुरस्काराद्वारे त्यांच्या कार्याला समाजातून मिळालेली ही जाणीवपूर्वक पावती असल्याचे सर्व मान्यवरांनी नमूद केले.

## निधन वार्ता

### समीर माहुलकर



**अकोला :** डाबकी रोड, रेणुका नगर येथील रहिवासी समीर मारोतराव माहुलकर यांचे रविवार, २२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी यांचे वय ४८ वर्षे होते. त्यांच्यावर सोमवार, २३ रोजी गडंकी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडतील. त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या घरून सकाळी १०.३० वाजता निघेल. त्यांच्या पश्चात भाऊ विजय माहुलकर पीएसआय नागपूर, बहीण, पत्नी, दोन मुली, एक मुलगा व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### गणेशराव महल्ले



**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा येथील प्रतिष्ठित नागरिक गणेशराव नारायण महल्ले (७०) यांचे रविवारी सकाळी ९ वाजता च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दगडपारवा येथील मोक्षधाम येथे सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,मुलगी,सुना नातवंड असा मोठा आप्तपरिवार आहे.

# अकोल्यातील रुग्णांसाठी धोका ठरणारा 'बनावट डॉक्टर राज'!

## आरोग्य विभागाची डोळेझाक; बनावट डॉक्टरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. २२ : जिल्ह्यात खासगी व निमशासकीय रुग्णालयांमध्ये बनावट डॉक्टरांचा सुळसुळाट झाला असून, अनेक ठिकाणी वैद्यकीय पदव्या नसलेली मंडळी रोग निदान, उपचार, इंजेक्शन, सलाईन, एक्स-रे, अगदी सोनोग्राफीसारखी गंभीर कामे करत असल्याचे उघड झाले आहे. यामुळे रुग्णांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला असून, आरोग्य विभाग अजूनही निष्क्रिय असल्याचे दिसते.**

दोन दिवसांपूर्वी अकोल्याच्या जुने शहर भागात एका कथित डॉक्टरवर कारवाई करताना पोलिसांनी धक्कादायक बाब उघडकीस आणली संबंधित इसम कोणतीही वैद्यकीय पदवी न धरता गेली अनेक वर्षे ॲलोपॅथी उपचार करत होता. रुग्णांवर अयोग्य औषधे वापरणे, चुकीचे निदान करणे आणि घातक इंजेक्शन्स देणे हे त्याचे नेहमीचे काम होते. असे प्रकार केवळ शहरापुरते मर्यादित नसून ग्रामीण भागात तर परिस्थिती आणखी भयावह आहे. अनेक गावांत पशुवैद्यकीय शिक्षण घेतलेल्या किंवा अगदी कोणतीही वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्ती स्वत:ला डॉक्टर म्हणून मिरवत आहेत.

**'डॉक्टर' की केवळ कंपाउंडर? वास्तव अधिक भीषण**

रुग्णालयांमध्ये काम करणारे कंपाउंडर, सहाय्यक किंवा औषध विक्रेते हेच आता डॉक्टरांची भूमिका बजावत असल्याचे अनेक ठिकाणी निदर्शनास आले आहे. वैद्यकीय शिक्षणाशिवाय सलाईन लावणे, इंजेक्शन देणे, गर्भपरीक्षण करणे, एक्स-रे करणे आणि अगदी जन्माचा अंदाज लावणे यासारखी कामे ही मंडळी करत आहेत. ही गोष्ट कायदेशीरदृष्ट्या तर चुकीची आहेच, पण रुग्णांच्या जीवाशी खेळ करणारी आहे.



**आरोग्य विभागाची भूमिकाच संशयास्पद**

या सर्व प्रकारांबाबत आरोग्य विभागाला सातत्याने तक्रारी मिळत असूनही अद्याप कोणतीही व्यापक तपासणी मोहीम हाती घेण्यात आलेली नाही. केवळ एखादा एन्फोर्समेंट कारवाईचा अपवाद सोडला तर, मोठ्या प्रमाणावर बोगस डॉक्टरांविरुद्ध एकही सुनियोजित मोहीम राबवलेली नाही.

**कायद्याचे उल्लंघन गुन्हा आणि शिक्षा**

भारतीय वैद्यकीय परिषद कायद्यानुसार ( इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट १९५६), कोणतीही वैद्यकीय पदवी नसलेल्या व्यक्तीने डॉक्टर असल्याचे भासवून उपचार करणे हा गुन्हा आहे. यासाठी शिक्षेसह आर्थिक दंडाची तरतूद आहे. तथापि, अंमलबजावणीच्या अभावामुळे या बनावट डॉक्टरांना सर्रास मोकळे रान मिळाले आहे.

### डॉ. प्रशांत जावळकर आत्महत्या प्रकरण अधिक तपासाची गरज

शनिवारी सकाळी न्यू तापडिया नगर येथील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रशांत जावळकर यांनी विषारी इंजेक्शन घेऊन आत्महत्या केली. वैयक्तिक कारणांचा तपास पोलिस करत असले तरी, त्यांच्या शिक्षण पात्रतेबाबतही काही प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांच्या डिग्रीची पडताळणी करावी, अशी मागणी मानसोपचार क्षेत्रातील काही जाणकारांनी केली आहे.

### शेकडो नव्हे, हजारो बोगस डॉक्टरांची शक्यता

अकोल्यात जवळपास १००० पेक्षा जास्त खासगी क्लिनिक्स, छोटे रुग्णालये व निदान केंद्रे आहेत. प्रत्येक ठिकाणी एक ना एक ''शंकास्पद डॉक्टर'' कार्यरत असल्याची माहिती स्थानिक पातळीवर मिळत आहे. अशा परिस्थितीत जर आरोग्य विभागाने राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय तपासणी मोहीम हाती घेतली, तर हजारो बोगस डॉक्टरांचा पर्दाफाश होऊ शकतो.

### सार्वजनिक मागण्या:

१. डिग्री आणि नोंदणी क्रमांकाची सक्तीने पडताळणी.
२. प्रत्येक खासगी हॉस्पिटल व क्लिनिकची स्वतंत्र वैद्यकीय तपासणी.
३. कंपाउंडर, टेक्निशियन व सहाय्यक यांच्या पात्रतेची तपासणी.
४. बोगस डॉक्टरांविरोधात तत्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सेवा थांबवावी.

# चिकाटी ठेवा, यश तुमचे होईल:उद्योगपती अशोक जैन यांचा बुद्धिबळ खेळाडूंना प्रेरणादायी सल्ला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** चिकाटी, सराव आणि सातत्यामुळेच यश मिळते. त्यामुळे फक्त यशाची वाट न पाहता सातत्याने प्रयत्न करत रहा, असे प्रेरणादायी उद्गार जैन इरिगेशनचे संस्थापक व ख्यातनाम उद्योगपती अशोक जैन यांनी काढले.इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला येथे रविवारी जिल्हा महानगर बुद्धिबळ संघटनेतर्फे आयोजित मार्गदर्शन व बक्षीस वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

खेळ म्हणजे केवळ टाइमपास नसून जीवनातील शिस्त, एकाग्रता आणि निर्णयक्षमता शिकवणारी शाळा आहे. जैन इरिगेशनमार्फत आम्ही नेहमीच बुद्धिबळ, कॅरम आणि विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन देत आलो आहोत,असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात अशोक जैन यांच्या हस्ते विविध वयोगटांतील विजेत्या बुद्धिबळपटूंना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. विजयी खेळाडूंनी यावेळी आपल्या यशामागील मेहनतीचा आणि प्रशिक्षकांचा उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली.

या वेळी रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार, ॲड. महेंद्र साहू, संदीप पुंडकर, अमर गौड आदी मान्यवरांच्या हस्ते अशोक जैन यांचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मानद सचिव प्रभजीत सिंह बछेर यांनी उपक्रमाची माहिती दिली.

रेड क्रॉसच्या सामाजिक उपक्रमांबाबत डॉ. मालोकार यांनी सविस्तर माहिती दिली. ॲड. सुभाषसिंह ठाकूर यांनी उपस्थितांचे आभार मानले.प्रमुख पाहुण्यांमध्ये भारतीय जैन संघटनेचे प्रा. सुभाष गादिया, जैन श्वेतांबर संघाचे मयूर चंद्रकांत शहा, विदर्भ कच्छी ओसवाल समाजाचे विपुल गोसर, सीए केयूर देढिया तसेच बुद्धिबळ प्रशिक्षक जितेंद्र अग्रवाल व उमेश काकड यांचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अरविंद रत्नपारखी, मोहन काजळे, केदार काजळे, अनमोल सिंह बछेर, मंगला डोंगरे आदींनी विशेष मेहनत घेतली.

# ऑलिम्पिक दिनानिमित्त जलतरणात सुवर्णयश!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २२ :** आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनाचे औचित्य साधून मास्टर पावर स्विमिंग क्लबच्या वतीने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते झाले. विजेत्या स्पर्धकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सुवर्ण पदक, प्रमाणपत्र आणि बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी कुंभार यांचे स्वागत क्लबचे प्रमुख योगेश पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांचे स्वागत प्रमुख प्रशिक्षक दीपक सदाशिव यांनी केले. पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांचे स्वागत चंचल महाजन व ज्योती पनपालिया यांनी, तर प्रताप पाटील यांचे स्वागत विशाल पोहेकर व प्रमोद खंडारे यांनी केले.

स्पर्धेत विविध वयोगटांतील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेच्या आयोजनासाठी क्लबचे योगेश पाटील, गोपाल पाटील, दीपक सदाशिव, विशाल पोहेकर, प्रमोद खंडारे, सुशील कांबळे, कौसर भाई, निशान वानखडे, ज्योती पनपालिया, चंचल महाजन, दिनेश वाघ, विनय तायडे, संतोष जगताप, सतीश पानझाडे, संदीप मेहरे, प्रथमेश डोईफोडे, विकी पवार, हर्ष कांबळे, अभी ताले, मनिषा वंजारी, कविता जावरकर, सैयद नूर, कैलास शिंदे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दीपक वैष्णव यांनी नेटकेपणाने केले. स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्याने जलक्रीडा क्षेत्रात नव्या उत्साहाला चालना मिळाली.

# संपूर्ण ग्राहक शोषणमुक्त करणे हेच ग्राहक पंचायतीचे उद्दिष्ट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २२ :** संपूर्ण समाज हा ग्राहक असून, त्याला शोषणमुक्त करणे हेच अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन विदर्भ प्रांत अध्यक्ष प्रा. डॉ. नारायणराव मेहरे यांनी केले. यवतमाळ येथे आज आयोजित जिल्हा कार्यकारिणीच्या सभेत ते बोलत होते.

येथील हॉटेल सुखकर्ता येथे झालेल्या या सभेला जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे, प्रांत सचिव चारुदत्त चौधरी आणि प्रांत संघटक अभय खेडकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या सभेत, प्रांताध्यक्ष डॉ. मेहरे यांनी यवतमाळ जिल्हा आणि दिग्रस तालुका कार्यकारिणीची घोषणा केली. यामध्ये, यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अनंत भिसे, तर सचिवपदी डॉ. केशव चेटूले यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संजय जोशी यांनी सादर केलेल्या संघटन मंत्र आणि ग्राहक गीताने झाली.

### प्रा. डॉ. नारायणराव मेहरे : अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची जिल्हा कार्यकारिणी घोषित

या सभेला प्रांत पदाधिकारी डॉ. शोभा गायकवाड, हितेश सेठ, संतोष डोमाळे, बीरेंद्र चौबे यांच्यासह नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अनंत भिसे, सचिव डॉ. केशव चेटूले, प्रा. मतीन खान, प्रा. सुरेश ढोके, ॲड. विलासराव देवसरकार, हणमंत रजनलवार, शोभा इंगोले, मोहन देशमुख, रामदास पद्मावार, नेहा पंडित, प्रा. राजेंद्र ठाकूर, प्रमोद बाजोरिया, अभय इंगळे, राधाकृष्ण जाधवानी, उत्तम जाधव, चंद्रकांत गड्डमवार, यशवंत गिरी, संजय फाळके, रफिक शेख, डॉ. पंकज पंडित आणि सुरेश मानलवार आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सभेच्या यशस्वीतेसाठी यवतमाळ येथील डॉ. शेखर बंड, जिनेंद्र बंगाले, ॲड. राजेश पोहरे, उमेश पखाले, सुधीर भट, प्रवीण पाटील आणि डॉ. योगेंद्र मारू यांनी परिश्रम घेतले.

# 'आरोग्य आणि पर्यावरणाचा' संदेश देत, आर्णीतील सायकलस्वार पंढरीच्या वाटेवर

## पाच सायकलस्वार करणार ४५० किलोमीटरचा प्रवास; तिसऱ्या वर्षीही 'सायकल वारी'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**आर्णी, दि.२२:** पर्यावरण आणि आरोग्याचा संदेश देत, आर्णी सायकलिंग क्लबचे पाच सदस्य ४५० किलोमीटरच्या सायकल वारीसाठी पंढरपूरकडे रवाना झाले आहेत. सलग तिसऱ्या वर्षी हा अनोखा उपक्रम राबवण्यात येत असून, एका सदस्याने पायी वारी सुरू केली आहे.

विदर्भात प्रसिद्ध असलेल्या आर्णी सायकलिंग क्लबतर्फे हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा', 'प्रदूषण टाळा' आणि 'निरोगी आरोग्यासाठी सायकल चालवा' असा संदेश देत, हे सायकलस्वार आर्णी ते पंढरपूर असा प्रवास करणार आहेत. या सायकलवारीची सुरुवात क्लबचे माजी अध्यक्ष प्रमोद बुटले यांनी तीन वर्षांपूर्वी एकट्याने केली होती. आता या उपक्रमाला प्रतिसाद वाढत असून, यावर्षी त्यांच्यासोबत सुनील जयस्वाल, अमोल देशमुख, सुनील राणे आणि सतीश पाचखंडे हे सदस्य सायकलने, तर शंकर दाभाडकर हे पायी वारीसाठी निघाले आहेत. पंढरपूर येथे होणाऱ्या 'सायकल रिंगण' सोहळ्यातही हे सर्वजण सहभागी होणार आहेत.

या सायकल वारीला निघालेल्या सदस्यांना निरोप देण्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, क्लबचे अध्यक्ष संदीप ढोले, हरिओमसिंह बघेल, रणजित राठोड, अमोल बेलगमवार, गजानन तायडे, विठ्ठल देशमुख, हरिश राठोड, राजू पाचखंडे, संतोष नालमवार, प्रवीण मुंदुलवार, विनोद चव्हाण, प्रवीण येरावार, अभिजित अंधारे, राजू नालमवार, श्रीपाल कोठारी, राजेश श्रीवास, साईनाथ मोटेवार आणि अमोल देशमुख यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते. त्यांनी सर्व वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मातोश्री गार्डन येथे ३ दिवसीय मोफत योग शिबिराचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :**२१ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने मातोश्री गार्डन, अकोला येथे ३ दिवसीय मोफत योग शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन योग शिक्षक संघटना महाराष्ट्र यांच्या वतीने करण्यात आले असून, प्रशिक्षणाचे नेतृत्व करतील विलासराव वाकोडे, प्रशिक्षित योग शिक्षक (पतंजली योग ट्रेंड).

या शिबिरात १९ जून ते २१ जून २०२५ दरम्यान दररोज सकाळी ७:०० वाजता योगसत्र होणार असून, सकाळी ७.३० वाजता आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व, आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठरवलेले प्रोटोकॉल, व त्याअंतर्गत शिफारस करण्यात आलेल्या विविध योगासनांची प्रात्यक्षिकेही दाखवण्यात येतील.



भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या पुढाकाराने आणि संयुक्त राष्ट्र महासभेने १७७ देशांच्या सहमतीने घोषित केलेल्या या दिवशी जगभर योगाची जागृती आणि प्रचारप्रसार होतो. त्या अनुषंगाने अकोल्यातही नागरिकांनी सहभागी व्हावे, व आपल्या आरोग्यवृद्धीसाठी या योगशिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

विलासराव वाकोडे सर हे योगासने, प्राणायाम, व मानसिक आरोग्यावर आधारित मार्गदर्शनासाठी ओळखले जातात. त्यांचा सहजसुंदर संवादशैली, प्रात्यक्षिकांमधील नेमकेपणा आणि प्रेरणादायी अभ्यासपद्धती यामुळे अनेक साधक त्यांच्याकडे आकर्षित होतात.ह्या प्रसंगी सुरेश रहाटे, प्रभुदास रहाटे, पद्माकर महल्ले, अण्णा मिटकरी , बाबा महल्ले, सुरडकर, तुकारामजी घिरके, हरिदास ताठे, बोचे, इंजि. तिवारी,प्रोफ डॉक्टर पसलावर, रवींद्र ग्रामकर,अशोक वाकोडे, मोहोकार, रावणे, शेटे, श्रीकांत रहाटे, आदी योगा प्रेमींचे उपस्थिती लाभली. विलास वाकोडे ह्यांनी अभियंता म्हणून सेवा झाल्यावर, योगाचे धडे देण्याचे काम समाजसेवा म्हणून निशुल्क करीत आहेत. हे वर्ग पुढेही अखंड चालु ठेवावा अशी वॉकिंग ट्रॅकवर येणाऱ्या साधकांची इच्छा आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात वाढती गुन्हेगारी; नागरिक चिंताक्रांत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह; चोरी, खून, विनयभंगाच्या घटनांत वाढ

**यवतमाळ, दि.२२:** गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात चोरी, घरफोडी, खून आणि विनयभंगाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण पसरले असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

गेल्या आठवडाभरातच कळंबमध्ये एका तृतीयपंथीयाचा खून, दिग्रसमध्ये जळालेला सांगाडा, शहरात व्यापाऱ्याच्या दुकानात लाखोंची चोरी आणि एका गावात दिवसाढवळ्या घरफोडी अशा घटनांनी जिल्हा हादरला आहे. रात्रीच्या वेळी अनेक भागांत पोलिसांची गस्त कमी असल्याने चोरट्यांचे फावत असल्याचे नागरिक सांगतात. वाढती बेरोजगारी आणि अमली पदार्थांचे सेवन यामुळे तरुण गुन्हेगारीकडे वळत असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे. पोलीस प्रशासनाने विविध उपाययोजना केल्या असल्या तरी, गुन्हेगारांवर वचक बसवण्यात त्यांना अद्याप यश आलेले दिसत नाही. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून, गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# जस्सी जैसा कोई नही!

## जसप्रीत बुमराहने वसीम अक्रमला टाकले मागे




**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**

भारत वि. इंग्लंडमधील पहिल्या कसोटी सामन्यात जसप्रीत बुमराह भारताचा यशस्वी गोलंदाज ठरला आहे. बुमराहने हेडिंग्ले कसोटीच्या पहिल्या डावात एकट्याने ३ विकेट्स घेतले. बुमराहने पहिल्याच षटकात सलामीवीर जॅक क्रॉलीला झेलबाद केलं. यानंतर त्याने अर्धशतक झळकावत फटकेबाजी करणाऱ्या बेन डकेटला बाद केलं. हे दोन विकेट घेताच बुमराहने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. संपूर्ण आशिया खंडात बुमराह सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरला आहे.

जसप्रीत बुमराहने त्याच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अनेक विकेट घेतले आहेत. यासह त्याने वेगवेगळे विक्रम आपल्या नावे केले आहेत. बुमराहने हेडिंग्ले कसोटीत आपल्या गोलंदाजीच्या जोरावर इंग्लंडच्या फलंदाजांना मोठी खेळी खेळू दिली नाही. बुमराहने जॅक क्रॉली, ऑली पोप यांना बाद केल्यानंतर इंग्लंडचा मोठा फलंदाज जो रूटला झेलबाद करत दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस भारताला दिलासादायक विकेट मिळवून दिली.बुमराह हेडिंग्ले कसोटीतील विकेट्सह दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमध्ये सर्वाधिक कसोटी विकेट्स घेणारा आशियाई गोलंदाज ठरला आहे. बुमराहने हा विक्रम आपल्या नावे करताच पाकिस्तान त्याने पाकिस्तानच्या वसीम अक्रमला मागे टाकत पहिलं स्थान गाठलं आहे. बुमराहने सेना देशांमध्ये आता सर्वाधिक १४७ विकेट्स घेतल्या आहेत.बुमराहने सेना देशांमध्ये ६० डावांमध्ये १४७ विकेट्स घेतल्या आहेत. तर अक्रमने ५५ डावांमध्ये १४६ विकेट्स घेतले होते. या दोघांनंतर माजी भारतीय कर्णधार आणि फिरकीपटू अनिल कुंबळे आहेत, ज्यांनी ६७ डावांमध्ये १४१ विकेट घेतले. भारताचा इशांत शर्मा ७१ डावांमध्ये १३० विकेट्सह चौथ्या आणि मोहम्मद शमी ६३ डावांमध्ये १२३ विकेटसह पाचव्या स्थानावर आहे.या यादीत पुढे श्रीलंकेचा मुथय्या मुरलीधरनच्या नावे ३४ डावात १२० विकेटस आहेत. भारताचा झहीर खान ५३ डावांत ११९ विकेट्ससह पुढच्या स्थानी आहे. तर कपिल देव यांच्या नावे ६२ डावांत ११७ विकेट आहेत.बुमराहने ऑस्ट्रेलियामध्ये आतापर्यंत २३ डावांमध्ये गोलंदाजी करत ६४ विकेट घेतले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या मैदानावर बुमराह सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेत १५ डावांमध्ये ३८ विकेट, इंग्लंडमध्ये १६ डावांमध्ये ३९ विकेट आणि न्यूझीलंडमध्ये चार डावांमध्ये सहा विकेट घेतले आहेत. बुमराहने २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर कसोटी पदार्पण केले. तेव्हापासून तो टीम इंडियाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि सध्या तो कसोटीतील नंबर वन गोलंदाज आहे. त्याने कसोटीत एकूण २०७ विकेट्स घेतल्या आहेत.

## निवृत्तीचा निर्णय भावनिक करणारा-अँजेलो मॅथ्यूज




**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**

भारत-इंग्लंड यांच्यात पांच कसोटी सामन्यांच्या कसोटी मालिकेतील लीड्स येथे पहिलं सामना खेळवण्यात येत आहे. तर दुसरीलडे श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यात देखील कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना दोघांमध्ये अनिर्णित राहिला. सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंनी शानदार फलंदाजी करत भरपूर धावा केल्या आहेत. बांगलादेशी संघाकडून फलंदाज नझमुल हसन शांतोने दोन्ही डावांमध्य शतक झळकावले. दुसरीकडे, श्रीलंकेकडून पथुम निस्सांका याने देखील शानदार शतक ठोकले.एकूणच, सामन्यात दोन्ही संघांकडच्या फलंदाजांकडून विरोधी संघाच्या गोलंदाजांवर हल्लाबोल करण्यात आला आहे. तथापि, सामन्याचा निकाल मात्र लागू शकला नाही, ज्यामुळे सामना अनिर्णित राहिला आहे. यासोबतच, श्रीलंकेच्या अनुभवी खेळाडू अँजेलो मॅथ्यूजची शानदार कसोटी कारकीर्दीचा देखील शेवट झाला. त्याने, आधीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घोषणा केली होती.कसोटी कारकिर्दीतील शेवटच्या सामन्यानंतर अँजेलो मॅथ्यूजने प्रतिक्रिया व्यक्त केली. त्याच्या बोलण्याचा आशय असा होटा की, ''निवृत्ती जाहीर केल्यापासून त्याला लोकांकडून खूप प्रेम आणि पाठिंबा मिळत आला आहे. त्यांच्यासोबत उभ्या असलेल्या लोकांचे त्याने आभार देखील मानले आहे. क्रिकेटचा प्रवास त्यांच्यासाठी अजिबात देखील सोपा नव्हता. त्याने त्यांच्या कारकिर्दीत अनेक चढ-उतारही पाहिले आहेत. तरी देखील तो इथवर येण्यास सक्षम राहिला आहे.मॅथ्यूज म्हणाला पुढे की, त्यांनी सांगितले की ''मला कसोटी क्रिकेट खेळायला खूप आवडतं. कसोटी स्वरूपात निवृत्तीची घोषणा करणे हा माझ्यासाठी खूप भावनिक क्षण होता. आता वेळ आली आहे की श्रीलंकेचे तरुण खेळाडू देशाला विजय मिळवून देतील. यावेळी आमच्या ड्रेसिंग रूममध्ये अनेक असे आशादायक खेळाडू उपस्थित आहेत. सध्या पथुम निस्सांका शानदार फलंदाजी करताना दिसत आहे.''श्रीलंकेच्या दिग्गज अष्टपैलू खेळाडू अँजेलो मॅथ्यूजने त्यांच्या संघाचे कौतुक देखील केले. तो म्हणाला की, ''आमच्या संघासाठी सर्वात मोठी कामगिरी म्हणजे इंग्लंडमध्ये कसोटी सामना जिंकणे तसेच घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाला ३-० ने पराभूत करणे. माझ्या सहकारी खेळाडूंनी आणि प्रशिक्षकांनी मला दिलेल्या प्रेमाबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.'' अशी प्रतिक्रिया अँजेलो मॅथ्यूजने दिली.श्रीलंकेचा अष्टपैलू खेळाडू अँजेलो मॅथ्यूजने २००९ मध्ये कसोटी पदार्पण केले होते. त्यानंतर त्याने आपल्या देशासाठी एकूण ११९ कसोटी सामने खेळले आहेत. या काळात त्याने ८२१४ धावा केल्या असून ज्यामध्ये १६ शतके आणि ४५ अर्धशतके यांचा समावेश आहे. त्याच वेळी, त्याच्या नावावर कसोटीमध्ये ३३ विकेट्स देखील जमा आहेत. त्याने ३४ कसोटी सामन्यांमध्ये श्रीलंकेच्या संघाची धुरा देखील वाहिली आहे.

## भारत-श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० वर्ल्डकपसाठी कॅनडाचा संघ पात्र

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**




भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या २० विश्वचषक २०२६ साठी संघांची निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार असून, कॅनडा संघाने नुकतेच आपले स्थान निश्चित केले आहे. अमेरिकन पात्रता फेरीत बहामास संघाचा सात गडी राखून पराभव करत कॅनडाने विश्वचषकाचे तिकीट मिळवले आहे. विशेष म्हणजे, कॅनडाने २० विश्वचषक २०२४ मध्येही सहभाग घेतला होता.२० विश्वचषक २०२६ साठी कॅनडाच्या समावेशानंतर आतापर्यंत एकूण १३ संघांनी आपली जागा पक्की केली आहे. यजमान म्हणून भारत आणि श्रीलंकेच्या संघांना थेट प्रवेश मिळाला आहे. तर, आयर्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तान या संघांनी आयसीसी क्रमवारीच्या आधारे आपले स्थान मिळवले आहे. याव्यतिरिक्त, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिज हे संघ आधीच पात्र ठरले आहेत.

आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, स्पर्धेतील उर्वरित सात जागांसाठी अद्याप चुरस बाकी आहे. युरोपीय पात्रता फेरीतून दोन संघ (५ ते ११ जुलै), आफ्रिकन पात्रता फ ेरीतून दोन संघ (१९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर) आणि आशियाई ईएपी पात्रता फेरीतून तीन संघ (१ ते १७ ऑक्टोबर) मुख्य स्पर्धेत दाखल होतील.पात्रता फेरीतील सामन्यात बहामासचा संघ कॅनडासमोर फारसा प्रभाव पाडू शकला नाही. बहामासचा संपूर्ण संघ केवळ ५७ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात, कॅनडाने हे लक्ष्य सहज गाठले. दिलप्रीत बाजवाच्या नाबाद ३६ धावांच्या खेळीमुळे कॅनडाने केवळ ५.३ षटकांतच विजय नोंदवला. तत्पूर्वी, कॅनडाचे फिरकी गोलंदाज कलीम सना आणि शिवम शर्मा यांनी प्रत्येकी तीन बळी घेत बहामासच्या संघाला अल्प धावसंख्येवर रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## हिटमॅनला आयुष्यात कोणत्या गोष्टीचा आहे पश्चात्ताप? स्वत:च केला खुलासा

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**




रोहित शर्माने टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो सध्या फक्त एकदिवसीय क्रिकेटमध्ये टीम इंडियाचे नेतृत्त्व करत आहे. अशात त्याला विचारण्यात आले की, त्याला आयुष्यात कोणत्या गोष्टीचा पश्चाताप आहे, तेव्हा त्यानी सांगितले की, त्याला जीवनात कोणत्याही गोष्टीचा पश्चाताप नाही. त्यानी पुढे म्हटले की, २५ वर्षांपूर्वी त्यांच्याकडे काय होते आणि आज त्यानी काय काय मिळवले आहे.

रोहितचे म्हणणे आहे की, जे काही नशिबात लिहिले आहे, तेच घडत आहे आणि त्यामुळे तो समाधानी आहे. त्याला कोणत्याही गोष्टीचा पश्चाताप नाही. रोहित शर्माने भारताला आतापर्यंत दोन आयसीसी ट्रॉफी जिंकून दिल्या आहेत. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला २०२३ च्या विश्वचषक अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव पत्करावा लागला होता.रोहित शर्माने हरभजन सिंग आणि गीता बसरा यांच्या 'हू इज द बॉस?' या शोमध्ये सांगितले, ''मला अनेकदा मुलाखतींमध्ये विचारले गेले की, तुम्हाला आयुष्यात कशाचा पश्चात्ताप आहे? मी पण त्यांना नेहमी विचारले आहे, कशाचा पश्चात्ताप? जर मी २५ वर्षे मागे गेलो, तर मला माहीत आहे की मी कुठे होतो आणि माझे आयुष्य कसे होते.




## अभिषेक पाठक ३३ चेंडूत शतक ठोकून उडविली खळबळ

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ मध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू वैभव सूर्यवंशी याने १८ व्या सीझनमध्ये पदार्पण करून कहर केला होता. त्याने आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद गतीने शतक ठोकून इतिहास रचला होता. त्याच्या या खेळीने त्याने सर्वांचाच लक्ष वेधले होते. त्याची ही खेळी चाहते अद्याप विसरलेले नाही. वैभव सूर्यवंशी याने ३५ चेंडुमध्ये शतक पुर्ण केले होते. मध्य प्रदेश प्रीमियर लीग २०२५ सुरु आहे, यामध्ये आता वैभव सूर्यवंशी याचा रेकॉर्ड अभिषेक पाठक याने मोडला आहे. मध्य प्रदेश प्रीमियर लीग २०२५ मध्ये, अभिषेक पाठकने फक्त ३३ चेंडूत शतक ठोकून पुन्हा एकदा टी-२० क्रिकेटमध्ये खळबळ उडवून दिली आहे. या स्फोटक शतकी खेळीत अभिषेकने वैभवपेक्षा जास्त षटकार मारले. सध्या भारतात मध्य प्रदेश लीग खेळली जात आहे. ज्यामध्ये तरुण खेळाडू धमाल करत आहेत. या लीगमध्ये खेळल्या गेलेल्या बुंदेलखंड बुल्स आणि जबलपूर रॉयल लायन्स सामन्यात अभिषेक पाठकची स्फोटक फलंदाजी पाहायला मिळाली.बुंदेलखंड बुल्सकडून फलंदाजी करताना अभिषेकने फक्त ३३ चेंडूत शतक झळकावून टी-२० क्रिकेटमध्ये खळबळ उडवून दिली.

या सामन्यात त्याने ४८ चेंडूत १३३ धावांची खेळी केली, ज्यामध्ये १५ षटकार आणि ७ चौकारांचा समावेश होता. यासह, त्याने आयपीएल २०२५ मध्ये ३५ चेंडूत शतक झळकावणारा राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीलाही मागे टाकले आहे. ज्यामध्ये ११ षटकारांचा समावेश होता.एमपीएल २०२५ च्या १८ व्या सामन्यात बुंदेलखंड बुल्स आणि जबलपूर रॉयल लायन्स हे संघ आमनेसामने होते. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बुंदेलखंडने २० षटकांत ६ गडी गमावून २४६ धावा केल्या. यामध्ये अभिषेक पाठकचे १३३, करणचे ४५ आणि गौतम जोशीचे २४ धावा समाविष्ट होते. जबलपूर रॉयल लायन्सकडून गोलंदाजी करताना पंकज पटेलने ४ षटकांत ३१ धावा देत ४ विकेट घेतल्या.

आयपीएल २०२५ झाल्यानंतर अनेक क्रिकेट लीग सुरु आहेत, त्यानंतर अनेक राज्यामध्ये अनेक क्रिकेट लीग खेळवले जात आहेत. महाराष्ट्र लीग सध्या सुरु आहे, त्याआधी महाराष्ट्रामध्ये मुंबई लीग पार पडले होते.

## कच्च्या तेलाचे दर १२० डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता!



इस्रायल-इराण युद्धात अमेरिकेच्या प्रवेशामुळे जागतिक तणाव वाढला आहे आणि अमेरिकेच्या हवाई हल्ल्यामुळे व्यापक संघर्षाची भीती आणखी वाढली आहे. त्याचा मोठा परिणाम उद्या आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी शेअर बाजार उघडेल तेव्हा दिसून येईल आणि आधीच वाढणाऱ्या कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांमधील युद्ध वाढल्यामुळे अमेरिकेपासून आशियापर्यंतच्या बाजारपेठांवर आधीच दबाव होता. दरम्यान, सुरक्षित गुंतवणूक ठिकाण मानल्या जाणाऱ्या सोन्याच्या किमती वाढण्याची भीतीही वाढली आहे.अमेरिकेच्या हल्ल्यानंतरही इराण थांबलेला दिसत नाही आणि त्याने इस्रायलवरील हल्ले तीव्र केले आहेत. या युद्धाचा सर्वात मोठा धोका कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ होण्याच्या स्वरूपात दिसून येत आहे, ज्यामुळे अनेक देशांमध्ये महागाई वाढू शकते. हो, गेल्या आठवड्यात ब्रेंट क्रूड फ्युचर्समध्ये सुमारे १८% वाढ झाली होती आणि ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल ७९ डॉलरवर पोहोचली होती, परंतु नंतर ती घसरून ७७ डॉलरच्या आसपास व्यवहार करत आहे. तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट ( क्रूड ऑइल) सुमारे ७५ डॉलरच्या पातळीवर व्यवहार करत आहे.दरम्यान, शिपिंग विमा कंपन्यांनी होर्मुझची सामुद्रधुनी, सर्वात महत्त्वाचा तेल मार्ग, उच्च-जोखीम क्षेत्र घोषित केले आहे, ज्यामुळे टँकरचे दर दुप्पट झाले आहेत आणि काही जहाजांना त्यांचा मार्ग बदलण्यास भाग पाडले गेले आहे. बिझनेस टुडेच्या अहवालानुसार, सॅक्सो मार्केट्समधील ऊर्जा रणनीतिकाराने म्हटले आहे की, 'तेलावरील जोखीम प्रीमियम परत आला आहे,

## टेस्ला पुढील महिन्यात पहिले शोरूम मुंबईत उघडणार

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**




अब्जाधीश इलॉन मस्क यांची आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रिक वाहन उत्पादक कंपनी टेस्ला () भारतात आपलं पहिलं शोरूम पुढील महिन्यात मुंबईत सुरू करणार आहे. ब्लूमबर्ग न्यूजने याबाबतचे वृत्त दिले आहे. त्यानुसार टेस्ला भारतातील आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी चीनमधून आणलेल्या मॉडेल गाड्यांची विक्री मुंबईतून सुरू करणार आहे. हे भारतातील टेस्लाची पहिली अधिकृत विक्री केंद्र असेल.अनेक वर्षांपासून चालू असलेल्या चर्चांनंतर अखेर टेस्लाचा भारतात प्रवेश निश्चित झाला आहे. कंपनीच्या स्थापनेसाठी आणि विक्रीसाठी लागणारे उपकरणे, सुपरचार्जर कॉम्पोनंट्स, ॲक्सेसरीज आणि स्पेअर पार्ट्स टेस्लाने अमेरिका, चीन आणि नेदरलँड्स येथून भारतात आयात केली आहेत.टेस्लाचे प्रमुख इलॉन मस्क यांनी फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर ही प्रक्रिया वेगाने पुढे सरकली. याआधी टेस्ला आणि भारत सरकारमध्ये आयात शुल्क आणि स्थानिक उत्पादन या मुद्द्यावरून मतभेद होते. टेस्लाने आपल्या पहिल्या काही मॉडेल गाड्या शांघाय येथील कारखान्यातून भारतात पाठवल्या आहेत. यातील ५ गाड्या आधीच मुंबईत दाखल झाल्या असून त्यांची कस्टम घोषणावार किंमत सुमारे २७.७ लाख रुपये ( ३१,९८८) आहे.या गाड्यांवर सुमारे २१ लाख रुपये इतकं आयात शुल्क लागलं आहे, जे भारताच्या ७० टक्के टॅरिफ धोरणानुसार ठरवले गेले आहे. ( ४०,००० पेक्षा कमी किंमतीच्या पूर्णतः बनवलेल्या गाड्यांसाठी लागू).या गाड्यांची विक्री किंमत भारतीय बाजारात ५६,००० (सुमारे ४६ लाख रुपये) पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे, ही किंमत कर आणि विमा वगळून आहे. अमेरिकेत हीच गाडी सुमारे ४४,९९० ला विकली जाते. भारतात ही किंमत टेस्लाच्या मार्केटिंग धोरणानुसार निश्चित केली जाईल.मुंबईतील पहिल्या शोरूमनंतर टेस्ला दिल्लीमध्येही विक्री केंद्र सुरू करण्याची योजना आखत आहे. हे टेस्लाचे भारतातील धोरणात्मक विस्ताराचे पहिले पाऊल असून, भविष्यात स्थानिक उत्पादन, सेवा केंद्रे आणि चार्जिंग नेटवर्क विकसित करण्याच्या दिशेनेही पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.निष्कर्ष: टेस्लाचा भारतात प्रवेश ही इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील मोठी घडामोड आहे. ही पायाभूत गुंतवणूक भारताच्या ग्रीन मोबिलिटी धोरणासाठी महत्त्वाची ठरणार आहे. ग्राहकांसाठी ही लक्झरी सेगमेंटमध्ये एक नवा पर्याय असेल. टेस्ला सध्या (२०२५ पर्यंत) चार प्रमुख प्रकारच्या प्रवासी इलेक्ट्रिक गाड्या ( ) बनवते, त्याखेरीज काही विशेष मॉडेल्स आणि व्यावसायिक वाहने देखील आहेत. टेस्ला ही लक्झरी सेडान आहे. टेस्ला ३ ही मिड-सेगमेंट सेडान आहे. टेस्ला ही लक्झरी आहे.टेस्ला ही कॉम्पॅक्ट / क्रॉसओव्हर कार आहे. हेच मॉडेल सध्या भारतात विक्रीसाठी निवडले आहे.

## सोन्याच्या किंमतीत पुन्हा वाढ

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**




भू-राजकीय तणाव आणि जागतिक अनिश्चिततेमुळे आज सोन्याच्या किमती पुन्हा वाढल्या आहेत. चीन आणि स्वित्झर्लंडनंतर भारत हा सोन्याचा तिसरा सर्वात मोठा खरेदीदार आणि दुसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. भारत आपल्या देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी सोने आयात करतो.

सोन्याच्या किमती आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉलरमध्ये निश्चित असल्याने, विनिमय दरांमधील चढ-उतारांचा भारतातील सोन्याच्या किमतींवर थेट परिणाम होतो. दरम्यान, यूएस फेड रिझर्व्हने देखील व्याजदर ४.२५-४.५० टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवले आहेत, ज्यामुळे सोन्याच्या किमतींना आधार मिळाला आहे. यामुळेच आज सलग तिसऱ्या दिवशी सोन्याच्या किमती वाढल्या आहेत.

२४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत १,०१,०९० रुपयांवर पोहोचली आहे. त्याच वेळी, त्याच संख्येच्या ग्रॅमच्या २२ कॅरेट सोन्याची किंमत ९२,६६० रुपये आहे आणि १८ कॅरेटची किंमत प्रति १० ग्रॅम ७५,८२० रुपये आहे. त्याच वेळी, चांदीच्या किमतीतही थोडी वाढ झाली आहे.आज दिल्ली, बंगळुरू, मुंबई, अमरावती, औरंगाबाद, गाझियाबादमध्ये चांदीचा दर प्रति किलो १,१२,१०० रुपये आहे. तर, हैदराबाद, चेन्नईमध्ये आज चांदीचा दर १,२२,१०० रुपये आहे. भोपाळमध्ये चांदीचा दर प्रति किलो १,११,२०० रुपये आहे.

## एअर इंडियाच्या सेवांबद्दल ७९ टक्के प्रवासी असमाधानी

**नवी दिल्ली: दि. २२ प्रतिनिधी**




एअर इंडियाबद्दल प्रवाशांमध्ये असंतोष सतत वाढत आहे. अलिकडेच लोकलसर्कल नावाच्या संस्थेने एक सर्वेक्षण केले, ज्यामध्ये धक्कादायक निकाल समोर आले. सर्वेक्षणानुसार, गेल्या एका वर्षात ७९ टक्के प्रवाशांनी एअर इंडियाच्या विमानाच्या दर्जा आणि देखभालीबद्दल तक्रारी केल्या.

२०२४ मध्ये हा आकडा ५५ टक्के होता, म्हणजेच तक्रारींमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे.१२ जून रोजी एअर इंडियाच्या फ्लाइट १७१ च्या अपघातानंतर हे सर्वेक्षण आणखी महत्त्वाचे बनले, ज्यामध्ये बोईंग ७८७ ड्रीमलाइनर अपघातातून २४२ पैकी फक्त एकच प्रवासी वाचला. यासोबतच जमिनीवर असलेल्या ३४ इतर लोकांचाही मृत्यू झाला.या सर्वे क्षणात १५,००० प्रवाशांनी भाग घेतला, जे भारतातील ३०७ हून अधिक जिल्ह्यांतील होते. त्यापैकी ६३ टक्के पुरुष आणि ३७ टक्के महिला होत्या. ४४ टक्के प्रवासी टियर-१ शहरांमधून, २६ टक्के टियर-२ मधून आणि ३० टक्के टियर-३, ४, ५ किंवा ग्रामीण भागातील होते. प्रवाशांनी विमानाची खराब स्थिती ही सर्वात मोठी समस्या असल्याचे सांगितले.

पैसे बिमारी ठीक होने के बाद
उम्र की अधिकता और बीपी शुगर से आई कमजोरी, टायमिंग में कमी, शुक्राणु की कमी, निःसंतान, आदी सभी रोगों का विशेष आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें



धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर, दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

# खोदकामाआधी परवानगी बंधनकारक

## मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांचे निर्देश, विकास संस्थांसाठी नवी एसओपी तयार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर , दि. २२ :** विविध संस्थांकडून नागपूर शहरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे नागपूर स्मार्ट सिटीच्या वतीने (एनएससी) लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीच्या ऑप्टिकल फायबर नेटवर्कमध्ये बिघाड होत आहे. ऑप्टिकल फायबर नेटवर्क खंडित होत असल्याने सुरक्षा प्रणालीमध्ये खंड पडतो. यासाठी ऑप्टिकल फायबर केबल्सला अत्यावश्यक सार्वजनिक सेवा समजून विकासकामात गुंतलेल्या संस्थांनी यासंदर्भात पूर्वसूचना द्यावी, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

शहरातील ऑप्टिकल फायबर केबल्स खंडीत होत असल्याबद्दल 'नागपूर स्मार्ट सिटीच्या'वतीने विविध विभागांची कार्यशाळेत आयुक्तांनी वरील निर्देश दिले. नागपूर शहरात कायदा आणि सुव्यस्था राखण्यासाठी नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत शहरातील ७०० चौकांत सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले असून, नागपूरच्या सुरक्षेसाठी हे फार महत्वाचे पाऊल आहे. मात्र, विविध कामांमुळे फायबर नेटवर्क खंडित होत आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीच्या वतीने 'एसओपी' तयार करण्यात आली. आता रस्ता खोदण्यापूर्वी संबंधितांना स्मार्ट सिटीकडून पूर्व परवानगी आवश्यक असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले तसेच, काही विभागांनी सुरक्षा ठेव सुद्धा जमा केलेली नाही नेटवर्क पूर्ववत करण्यासाठी हे दुरुस्त करणे गरजेचे आहे. सोबतच केबल नेटवर्क पूर्ववत करण्यासाठी एजन्सी नियुक्त केली आहे. स्मार्ट सिटीचे प्रतिनिधी आणि एजन्सीसोबत चर्चा केल्यानंतरच खोदकाम करावे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात डॉ शील घुले (महा प्रबंधक, ई गव्हर्नन्स विभाग, नागपूर स्मार्ट सिटी) यांनी सांगितले, की नागपूर शहरातील ७०० चौकात ३ हजार ६८६ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहे. काही कॅमेरे बंद असल्याने नागपूर पोलिस आणि मनपा प्रशासनासमोर अडचणी निर्माण होत आहे कायदा सुव्यस्था राखणे आणि मान्सूनदरम्यान कामे करण्यात कॅमेराचा वापर करण्यात येतो. सर्व विभागांसाठी 'एसओपी' तयार करण्यात आली असून, कोणतेही खोदकाम सुरू करण्यापूर्वी भूमिगत केबल्सची माहिती घेणे आवश्यक असेल. कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी. प्रामुख्याने उपस्थित होत्या. सोबतच महावितरण, मनपा, बीएसएनएल, महा मेट्रोचे प्रतिनिधी, मनपाच्या अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, स्मार्ट सिटी कंपनीच्या सचिव भानुप्रिया ठाकूर, महामेट्रोचे वरिष्ठ डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर, नागपूर सुधार प्रन्यास, एमएसआरडीसी, जिल्हा परिषद, आणि इतर विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले.

### नागपूरच्या सुरक्षेचा तिसरा डोळा आहे हे नेटवर्क

'नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी' प्रकल्प हा शहराच्या सुरक्षेचा कणा आहे. याअंतर्गत शहरातील ७०० महत्त्वाच्या चौकांमध्ये ३,६८६ हाय-रिझोल्यूशन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे संपूर्ण नेटवर्क ऑप्टिकल फायबर केबलने जोडलेले आहे. गुन्हेगारी रोखणे, वाहतूक व्यवस्थापन आणि पावसाळ्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत देखरेख ठेवण्यासाठी पोलीस आणि मनपा प्रशासनासाठी हे कॅमेरे अत्यंत महत्त्वाचे आहेत. केबल तुटल्याने यात मोठा खंड पडतो.

### कार्यशाळेला विविध विभागांची महत्त्वपूर्ण उपस्थिती

या महत्त्वपूर्ण कार्यशाळेला अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आणि वैष्णवी बी. यांची प्रमुख उपस्थिती होती. सोबतच, महावितरण, बीएसएनएल, महा मेट्रो, नागपूर सुधार प्रन्यास, एमएसआरडीसी, जिल्हा परिषद यांसारख्या प्रमुख संस्थांचे प्रतिनिधी, मनपाच्या अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, स्मार्ट सिटी कंपनीच्या सचिव भानुप्रिया ठाकूर आणि महामेट्रोचे वरिष्ठ डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले.

## थोडक्यात

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ६ जुलैला

**नागपूर :** तिरळे कुणबी सेवा मंडळाच्या वतीने २०२४-२५ मध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी इयत्तांमध्ये उच्च गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे हा कार्यक्रम ६ जुलै २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता 'तिरळे कुणबी सेवा मंडळ टाऊन हॉल बिडीपेठ येथे होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सत्कारासोबत भविष्यातील करिअर संदर्भात ज्येष्ठ समुपदेशक डॉ. प्रा. आशीष तायवाडे यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान होणार आहे विद्यार्थी व पालकांनी विद्यार्थांची गुणपत्रिका आणि आवश्यक माहिती मंडळाच्या कार्यालयात सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत प्रत्यक्ष आणून द्यावे याशिवाय अध्यक्ष पी.बी.वाकडे पाटील ९९२०२८२३७७, सचिव नितीन हांडे ९०४९०९१९९०, कोषाध्यक्ष महादेव बोराडे ८६००९६६२५ या व्हॉट्सअप क्रमांकावर माहिती देता येणार आहे.

### खेळनिहाय प्रवेश प्रक्रिया

**नागपूर :** शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचणी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ या वर्षात विभागीय स्तरावर २६ ते २७ जून २०२५ रोजी विभागीय क्रीडा संकुल मानकापूर येथे चाचण्या होत आहेत ७ जुलै २००६ नंतर जन्मलेले आणि ८ जुलै २०२५ रोजी १९ वर्षे पूर्ण झालेले खेळाडू अर्ज करू शकतात. अर्जाचा नमुना कार्यालयात उपलब्ध असून, कागदपत्रांची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच, क्रीडा प्रबोधिनी चाचणीदरम्यान खेळाडूंनी मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीकरिता राज्य क्रीडा मार्गदर्शक भूषण इंगळे ( ८६२६०३९९९२) यांच्याशी संपर्क साधावा.

## उत्कृष्ट कार्याबद्दल 'बस' वाहकांचा सत्कार

### कर्तव्यात उत्कृष्टता दाखवणाऱ्यांची निवड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर , दि. २२ :** महानगरपालिकेच्या परिवहन विभागात कार्यरत 'आपली बस'च्या १२ वाहकांचा त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.

'आपली बस'चे परिवहन व्यवस्थापक तथा मनपाचे उपायुक्त विनोद जाधव यांच्या हस्ते व परिवहन विभागाचे परिवहन प्रशासकीय अधिकारी सोनम देशमुख यांच्या उपस्थितीत हा सत्कार करण्यात आला. डिजिटल इंडिया मोहिमेला पाठिंबा देत डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देणारे, तसेच प्रवाशांशी सौहार्दपूर्ण संवाद साधणारे आणि आपल्या कर्तव्यात उत्कृष्टता दाखवणारे वाहक या सत्कारासाठी निवडण्यात आले होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन मनपाद्वारे त्यांना गौरवण्यात आले. वाहक अर्चना गोरे, शंकर कनोजिया, दिप्ती दिनेश सूर्यवंशी, रोमन रोशन राहुलकर, मीना लेंडारे ,हर्षल घेवत, शिल्पा वाघमारे, तिलकचंद भुजाडे, फिरोज खान पठाण, मोहन नाडेकर, मंगला गाडेकर, अशोक सी. राघोर्ते यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कारामुळे इतर वाहकांनाही चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळेल, अशी आशा परिवहन विभागाने व्यक्त केली. नागरिकांना उत्तम सेवा देण्यासाठी परिवहन विभाग कटिबद्ध असल्याचे याप्रसंगी सांगण्यात आले. याप्रसंगी आरटीएल अजय कुमार, ऑपरेशन मॅनेजर सुमित देशमुख, ऑपरेशन मॅनेजर (महसूल)सचिन गाडबैल,असिस्टंट ऑपरेशन मॅनेजर आशीष वर्मा उपस्थित होते.

## ममता हेल्थ इन्स्टिट्युटतर्फे योगदिन

**नागपूर, दि. २२ :** जागतिक योगदिनाच्या निमित्ताने ममता हेल्थ इन्स्टिट्युट फॉर मदर अँड चाईल्ड जागृती चारतर्फे किशोरवयीन मुले आणि मुलींसोबत योगसत्र आयोजित करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक प्रार्थना आणि 'ओमकार'ध्वनीने करण्यात आली. मुलांनीही सहभाग घेत संपूर्ण योगसत्र अतिशय उत्साहाने पूर्ण केले. तणावमुक्त राहणे, एकाग्रता वाढवण आदींबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमात योगा शिक्षिका सुनीता नेटके, पल्लवी भांडारकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून, तो जीवनशैलीचा भाग बनवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादित केले. कार्यक्रमाचे संचालन योगेश राठोड व मंजूषा नासरे यांनी केले.

## कामठी येथे अंमली पदार्थांविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन

### पालकमंत्री बावनकुळे, पोलिस आयुक्तांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**कामठी, दि. २२ :** नागपूर शहर पोलिसांच्या 'ऑपरेशन थंडर' या विशेष मोहिमेअंतर्गत शनिवारी (२१ जून) नवीन कामठी व जुने कामठी (परिमंडळ पाच) येथे अंमली पदार्थांविरोधी जनजागृती रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रॅलीमध्ये पोलिस उपायुक्त परिमंडळ पाचचे अधिकारी-कर्मचारी, सर्वधर्मीय प्रतिनिधी, सामाजिक संस्था, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येतील नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'ऑपरेशन थंडर' उपक्रमाचे कौतुक करत नागपूर पोलिसांच्या कार्यशैलीचे अभिनंदन केले. अंमली पदार्थांविरोधी एकत्र येण्याचे आणि कामठी शहरातील प्रत्येक नागरिकाने मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. रॅलीच्या माध्यमातून समाजात अंमली पदार्थांविरोधी जनजागृतीचा ठोस संदेश देण्यात येत असून, नागपूर शहर पोलिसांच्या या उपक्रमाला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद लाभत आहे.

CAPTION **झाड कोसळले ...**



**नागपूर :** जून महिन्याचा पाऊण भाग संपला नागपुरात पाऊस नाही, वारा नाही. प्रचंड उकाडा आहे. तरीही सिव्हिल लाईन्स भागातील हिस्लॉप कॉलेज परिसरात रविवारी सकाळी रस्त्यावर भलेमोठे झाड कोसळले. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी झाडाचा काही भाग कापून रस्ता मोकळा केला.

## जलपर्णीपासून बनताहेत विविध दैनंदिन वस्तू

### स्वयंसहायता गटातील महिलांचे कसब; महानगरपालिकेच्या समाजविकास विभागाचा उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर , दि. २२ :** तलावातील जलपर्णी वनस्पतीचा वापर करून स्वयंसहायता गटातील महिलांनी आपले कसब समोर आणत हस्तशिल्प उत्पादनास सुरुवात केली आहे. या महिलांनी दैनंदिन वापरातील विविध वस्तू तयार केल्या आहेत. नागपूर महानगरपालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने पहिल्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी महिलांचे ४५ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण झाले.

नागपूर महानगरपालिकाच्या पुनापूर येथील कौशल्य विकास केंद्रात जलपर्णीपासून विविध वस्तू तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात तसेच समाज विकास उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या नेतृत्वात महिलांचे सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. विविध वस्तूंची निर्मिती मनपाच्या समाज विकास विभागामार्फत जलपर्णीपासून विविध वस्तू तयार करण्याकरीता पुनापूर पारडी येथे कौशल्य विकास केंद्र तयार करण्यात आले आहे. याठिकाणी प्रशिक्षणाची सुरुवात २ मे २०२५ पासून सुरुवात झालेली आहे. सध्या अजय बहुउद्देशीय संस्था यांच्यामार्फत लूम मशीनद्वारे ५० महिलांना व रोलर मशीनद्वारे ५० महिलांना जलपर्णीवर प्रक्रिया करण्याचे तसेच जलपर्णीपासून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणार्थीकडून टी कोस्टर, टोपी, हँड बॅग, फाईल फोल्डर, फ्रुट बास्केट, कंटेनर, स्मॉल बास्केट, राउंड कंटेनर, प्लँटर, मॅट बॉक्स, पाण्याची बॉटल बॅग, योगा मॅट आदी विविध वस्तूंची निर्मिती केली आहे. स्वयंरोजगाराला मदत जलपर्णीपासून विविध वस्तू तयार करण्याच्या प्रशिक्षणामुळे महिलांचे सक्षमीकरण होत असून, रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत प्रशिक्षणार्थीपैकी काही प्रशिक्षणार्थी स्वयंरोजगार करण्यास इच्छुक असल्यास त्याकरिता आवश्यक असलेले उद्यम रजिस्टेशन, आर्टिस्ट कार्ड (वस्त्रोद्योग मंत्रालय), मास्टर कार्ड आदी परवाने मिळविण्यास समाज विकास विभागातर्फे सहाकार्य दिले जाईल. याशिवाय प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगाराकरीता आवश्यक असलेल्या निधीच्या उपलब्धतेकरिता शासनाच्या दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान, दीनदयाल अंत्योदय योजना नॅशनल अर्बन, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पीएम मुद्रासारख्या योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे.

## निधन

### ईश्वर जयपाल रामटेके



**नागपूर :** आनंद रोड इंदोरा येथील रहिवासी ईश्वर जयपाल रामटेके यांचे निधन झाले ते ८६ वर्षांचे होते त्यांच्यावर वैशाली निर्वाण घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### घनश्याम नागो खोबरागडे

**नागपूर :** गूडलक सोसायटी समतानगर रोड नारी येथील घनश्याम नागो खोब्रागडे यांचे निधन झाले ते ८६ वर्षांचे होते त्यांच्यावर नारा घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# नागपुरात विविध संस्थांतर्फे आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात

## लहान थोरांचा हिरिरीने सहभाग, हास्ययोगा क्लबच्या कार्यक्रमाचे आयोजन, नागरिकांनी घेतले योगाचे धडे

**नागपूर , दि. २२ : हास्य योगा क्लबच्या वतीने शनिवारी सकाळी साडेसहा वाजता सरस्वतीनगर एन.आय. टी. गार्डन हनुमान मंदिर येथे हास्ययोगा क्लब, जनार्दन स्वामी योगभ्यासी महिला मंडळ आणि सरस्वती महिला योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने योगा दिवस साजरा करण्यात आला.**







कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजपाल सिंग बैस होते. प्रमुख अतिथी श्रीमती ठवकर आणि अर्चना श्रीरसागर उपस्थित होत्या. संचालन सिद्धार्थ कांबळे यांनी केले. अनंत गुंडलवार यांनी आभार मानले.

'हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' हे गीत रेश्मा लाखे आणि महिला सहकाऱ्यांनी सादर केले.

महिला वर्गाने सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, मयुरासन, त्रिकोणासन आणि इतर योगाचे प्रात्यक्षिके सादर करण्यात आलीत. श्रीमती निशा यांनी म्युझिकल योगा सादर केला. पुरुष सदस्यांनी त्रिकोणासन, कटी वक्रासन, रोते रोते हसना सिखो, ओंकार गजर, शेर की दहाड असे काही प्रकार सादर केले. वासुदेव मेश्राम व केवलराम हेमणे यांनी योगाविषयी माहिती दिली. अशोक शहारे यांनी 'ये कौन चित्रकार ...' हे सुरेख गीत सादर केले. राजपाल सिंग बैस यांनी भारतीय प्राचीन संस्कृती, परंपरांमध्ये योग, योगासने व योगसाधना यांना अनन्य महत्त्व असल्याचे सांगितले. प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंतर्भाव नक्की करावा आरोग्याच्या सुदृढतेसाठी अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी सर्वश्री रामकृष्ण बांगडे, विजय लांजेवार, जॉन गायगोले, अरुण कोहाड, विजू ठवकर, सुरेश ताकोद, सुरेश बोरकर, भास्कर फुकटकर, गौतम वरघट, रईश तरवटकर, गौतम मेश्राम, दिलीप राऊत, भारत मंचमवार, ज्ञानेश्वर ठाकरे, माणिक झाडे, ए.पी.सिंग, लीलाधर ढुंमणे, सुधाकर भिसीकर, विनायक मस्के, राजू रामटेककर, अशोक निमजे, भास्कर रणदिवे, धनराज बर्वे धनराज भांदककर, तितरमारे, ज्ञानेश्वर माहुले, श्री. पेठेकर आदींनी सहकार्य केले. शासकीय विभागीय ग्रंथालय सिव्हिल लाईन्स येथे शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. शासकीय विभागीय ग्रंथालय, सहाय्यक ग्रंथालय संचालक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, वाचक उपस्थित होते. योग प्रशिक्षक सुधीर तिवारी (सीआरपीएफ) आसाम यांनी योगविषयक माहिती देऊन सर्वांना योगाचे प्रशिक्षण दिले. तसेच, प्रात्यक्षिक सादर केले. कलेक्टर कॉलनी परिसरात शनिवारी सकाळी सहा वाजता योग दिवस आयोजित करण्यात आला यानंतर उपस्थितांनी वृक्षारोपण उपक्रम राबविला आंबा, कडुलिंब, रातराणी, गुलाब, मोगरा आदी वृक्षांचे रोपण केले. निवृत्त हवालदार महेश कुमार वर्मा, मनीष भेंडे, योगेश पातावणे (जिल्हा न्यायालय), अमोल ठाकरे (शिक्षक सहकारी बँक), अप्पू ठाकूर (मध्य रेल्वे), धीरज दीक्षित,ॲडव्होकेट अशोक संघई, संजय पहाडे, आशीष वर्मा, मानवकल्याण सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्थाचे अध्यक्ष कमलेश सिंह ठाकूर आदींची उपस्थिती होती.






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, सोमवार, दि. २३ जून २०२५







# प्लास्टिकमुक्त शहरासाठी मनपा सरसावली!

## ग्लास, कप, कॅरीबॅग, द्रोण यांची दुकानदारांकडे कसून तपासणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ : अकोला शहरातून प्रतिबंधित प्लास्टिकचे उच्चाटन व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी अकोला महानगरपालिकेच्या वतीने टॉवर चौकाजवळील फ्रुट मार्केट परिसरात विशेष मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपस्थितीत पार पडली.**





या वेळी प्लास्टिकच्या कॅरीबॅग, ग्लास, कप, द्रोण यांची कसून तपासणी करण्यात आली. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक साठा आढळून आल्याने ते जप्त करण्यात आले. संबंधित विक्रेत्यांना यापुढे प्लास्टिकचा वापर किंवा विक्री न करण्याबाबत ताकीद देण्यात आली.

स्वच्छता तपासणीदरम्यान डॉ. लहाने यांनी सर्व स्वच्छता निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात दररोज किमान एक गस्त लावण्याच्या सूचना दिल्या. तसेच ज्या भागात पुन्हा प्रतिबंधित प्लास्टिक आढळेल, तेथील स्वच्छता निरीक्षकांना जबाबदार धरून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असेही स्पष्ट केले.

या मोहिमेच्या अखेरीस दुकाने आणि वाहनांवर प्लास्टिकचा वापर टाळा, कापडी पिशवीचा स्वीकार करा असे संदेश देणारे स्टीकर लावून जनजागृती करण्यात आली.या विशेष मोहिमेत सहायक आयुक्त दिलीप जाधव, सचिव अमोल डोईफोडे, राजेश सरप, जितेंद्र तिवारी, स्वच्छता विभाग प्रमुख संजय खोसे, पर्यावरण अधिकारी अनिल बिडवे, विधी अधिकारी शाम ठाकूर, शाम बगेरे, राजेश सोनाग्रे, संजय चव्हाण, नरेश बावणे यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक व सफाई कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## महापालिकेचे मुत्रीघर कुलूपबंद, जबाबदार कोण?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** अकोला महापालिकेच्या मुख्य इमारतीत नागरिक आणि कर्मचाऱ्यांसाठी सुलभतेसाठी खालच्या मजल्यावर बांधण्यात आलेले मुत्रीघर गेल्या अनेक महिन्यांपासून कुलूपबंद अवस्थेत आहे. लघुशंका आल्यास नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना थेट पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर जावे लागते. हे केवळ गैरसोयीचेच नाही, तर प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, खालचे मुत्रीघर चुकीच्या पद्धतीने, दर्जाहीन बांधकामामुळे वापरासाठी अयोग्य ठरले. परिणामी, लाखो रुपये खर्च करून उभारलेले हे शौचालय कुलूप लावून ठेवलं जात आहे. महापालिकेच्या अभियंते व संबंधित ठेकेदार यांनी हे बांधकाम मंजूर करताना योग्य नियोजन आणि तपासणी केली होती की नाही, हा मोठा प्रश्नच आहे.

महापालिकेच्या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना हे मोठे त्रासदायक ठरत असून सार्वजनिक सुविधा म्हणजे फक्त खर्चाचा प्रपंच हेच या प्रकरणातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अकार्यक्षम यंत्रणा, अनुत्तरदायी अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमतामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी होत आहे.या प्रकरणात महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी त्वरित लक्ष घालून दोषींवर जबाबदारी निश्चित करून आर्थिक व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून जोर धरू लागली आहे. जनतेचा पैसा खर्चून अशी 'कुलूपबंद सुविधा' निर्माण करणे म्हणजे थेट शासकीय फसवणूकच नाही का?

## लातूर चे जांभुळ बाजारपेठेत ...



फळाचा राजा आंबा या आंब्यांचे सीझन संपत आले असुन मृग नक्षत्रात जांभूळ हे फळं आरोग्यासाठी खाणे चांगले असून हे जांभूळ लातूर येथून अकोला बाजारपेठेत विक्रीस आली आहे तरी या जांभूळाची चवच न्यारी. (छाया. संजय ताथुरकर)

## गौमास विक्री विरोधात मोठी कारवाई; अकोटमध्ये ५५० किलो गौमांसासह तिघे अटकेत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** अकोला पोलीस अधीक्षक अकोला अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत आज २२ जून २०२५ रोजी अकोट शहरात मोठी कारवाई करण्यात आली.

पोलीस निरीक्षक अमोल माळवे यांच्या आदेशाने डिबी पथकाचे पोउपनि वैभव तायडे, पोउपनि अविनाश मोहिते व त्यांच्या पथकाने कुरेशीपुरा परिसरात छापा टाकून गौकशी प्रकरण उघडकीस आणले. जुनेद अहमद जहूर अहमद याच्या घरात गोवंश जनावरांची कत्तल होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, डिबी पथकाने पंचासमक्ष कारवाई केली असता, त्या ठिकाणी ५५० किलो गौमांस, काटण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी सुरा, लाकडी कु-हाड व ठोकडा असा एकूण १ लक्ष १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात खालील तिघांना अटक करण्यात आली आहे त्यामध्ये अब्दुल नहींम अब्दुल रहीम (४३) रा. कसाबपुरा, अकोट, जुनेद अहमद जहूर अहमद (३५) रा. शौकत अली चौक, अकोट, शेख असलम शेख महबूब (२९) रा. ठाकूर मळा, शौकत अली चौक, अकोट यांचा समावेश आहे.

सदर आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण कायदा १९७६ सुधारित कलम ५, ५(क), ९(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना पोलीस कोठडीत घेतले आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत डिबी स्कॉडचे पोउपनि वैभव तायडे, पोउपनि अविनाश मोहिते, पोहेकॉ गणेश सोळंके, बजरंग इंगळे, नरेंद्र जाधव, गजानन राठोड, नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ अश्विन चौव्हाण, नितेश सोळंके, पोकॉ शिवशंकर गावंडे, मपोकॉ अपेक्षा खारोडे व पद्मिनी येरनाळे यांनी सहभाग घेतला.

## तरणतलावात योगासनांची रंगत; अबाल-वृद्धांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून अकोल्यातील वसंत देसाई क्रीडांगण येथील तरणतलावात शुक्रवार, २१ जून रोजी सकाळी एक आगळावेगळा योग उपक्रम राबविण्यात आला. पाण्याच्या शांत तलावावर योगासनं सादर करून आरोग्यवर्धक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. विशेष म्हणजे या उपक्रमात ८ वर्षांच्या चिमुकल्यांपासून ते तब्बल ८० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच उत्साहाने सहभाग नोंदवला.



पाण्यावर योगासन करणे ही कल्पनाच नवीन आणि धाडसी. परंतु प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या मदतीने आणि योग्य तयारीनंतर या अद्वितीय उपक्रमाची अंमलबजावणी यशस्वीपणे पार पडली. सहभागी साधकांनी कमालीची एकाग्रता, संतुलन आणि शारीरिक तंदुरुस्तीचे प्रदर्शन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या उपक्रमामागचा मुख्य उद्देश म्हणजे शरीर आणि मन यांची एकसंधता साधणे, जीवनशैलीत योगाचा समावेश करणे आणि मानसिक स्वास्थ्याकडे लक्ष वेधणे हा होता. उपस्थित नागरिकांना योगसाधनेचे महत्त्व पटवून देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. तलावाच्या पाण्यावर योग करताना साधकांनी ताडासन, वज्रासन, पद्मासन, श्वासोच्छ्वासाचे नियमन आदी आसनांद्वारे योगः कर्मसु कौशलम् हे सूत्र प्रत्यक्षात उतरवले. यामुळे योग दिनाचे औचित्य खऱ्या अर्थाने साजरे झाले. अकोल्यात अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम राबविला गेला असून नागरिकांसाठी तो आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.योग दिनाचे औचित्य साधून शहरात विविध ठिकाणी योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले असले तरी जलतलावरील हा विशेष योग उपक्रम मनाला स्पर्शून गेला.



# आजच्या व्यस्त व तणावग्रस्त जीवनशैलीत योगा व ध्यान ही काळाची गरज - कल्याणी सिंग

### सम्यक संबोधी संस्था, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी व दै.अजिंक्य भारततर्फे ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे यशस्वी आयोजन





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** आजच्या व्यस्त व तणावग्रस्त जीवनशैलीत योगा व ध्यान ही काळाची गरज असल्याचे मत योगा प्रशिक्षक कल्याणी सिंग यांनी सम्यक संबोधी संस्था, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला व अजिंक्य भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून रोजी सम्यक संबोधी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी चे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे, संस्थेच्या उपाध्यक्ष सौ तनुजा सुगत वाघमारे यांच्या सूचनेनुसार तसेच संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, मार्गदर्शक अँड. संजय सेंगर, संस्थेचे जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनात सम्यक संबोधी संस्था येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात परिसरातील विविध वयोगटातील उत्साही महिलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी योगा प्रशिक्षक कल्याणी सिंग संस्थापक संचालक किप फिट फिटनेस सेंटर यांचे मार्गदर्शन लाभले. आजच्या व्यस्त व तणावग्रस्त जीवनशैलीत योगा व ध्यान ही काळाची गरज आहे. नियमित योग अभ्यास केल्याने उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलत्व, थायराइड, सांधे विकार,मनोविकार कमी होतात यासाठी प्रत्येक व्यक्तीने नियमित योग व ध्यान केले पाहिजे.यावेळी उपस्थित सहभागी योगसाधक महिलांनी ध्यान संगीताच्या मधुर सुरात वेगवेगळे प्राणायाम व आसने केले, त्यामध्ये कपालभाति, अनुलोम विलोम यासारखे प्राणायाम तसेच ताडासन,वज्रासन, शवासन मत्स्यासन,भुजंगासन इत्यादी आसनेही करण्यात आली.आसन व प्राणायम झाल्यानंतर ध्यानही करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सदस्य उमेश शिरसाठ, श्वेता शिरसाठ, सुचिता घोगरे , करण पळसपगार,सपना म्हात्रे यश साळवे, रश्मी घुगे,भीमा शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आज जिल्हयात

**खामगाव :** शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे हे सोमवार २३ जून। -२०२५ रोजी मौजे सिनगाव जहाँगीर ता. देऊळगाव जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार जालना येथून सकाळी ८.३० वाजता मौजे सिनगांव जहाँगीर ता. देऊळगांव राजा येथे आगमन, सकाळी ९ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिनगाव जहाँगीर येथे शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम २०२५ अंतर्गत विद्यार्थी स्वागतासाठी उपस्थिती, त्यानंतर सकाळी १०.३० वाजता शासकीय वाहनाने मुंबईकडे प्रयाण करतील.

### शेगाव सामान्य रुग्णालयात योगदिन उत्साहात साजरा

**शेगाव :** केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या आदेशानुसार शेगाव येथील सामान्य रुग्णालयात आंतरराष्ट्रीय योग दिन शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात शिवसेनेचे पदाधिकारी, रुग्णालयातील अधिकारी-कर्मचारी आणि योगप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू पाटील मिरगे, तालुकाप्रमुख रामा पाटील थारकर, पवन बरिंगे, मोहन लांजुलकर, चंद्रकांत माने, विनायक भारंबे आदींचे विशेष योगदान होते. योगसत्राचे मार्गदर्शन प्रसिद्ध योग प्रशिक्षक निळकंठ साबळे यांनी केले. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि त्यांचे शारीरिक-मानसिक लाभ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

### तिरंदाजी स्पर्धेत मिहीर अपारला रौप्य

**खामगाव :** सिंगापूर येथे १५ जून दरम्यान एशिया कप स्टेज २ जिरंदाजी स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेतमध्ये आशिया खंडतील देशांनी सहभग घेतला होता. या स्पर्धेमध्ये भारतीय संघाला रौप्य पदक मिळाले आहे. भारतीय संघामध्ये बुलढाण्याचा तिरंदाज मिहीर नितीन अपार, हरियणाचा कुशल दलाल व आंध्र प्रदेशचा गणेश मणीरतम् यांचा समावेश होता. मिहीर अपार याने यापूर्वी सुध्दा अनेक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करत भारताला सुवर्ण पदक मिळवून दिलेले आहे. तसेच ऑगस्ट मध्ये होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिप कॅनडासाठी सुध्दा मिहिर अपार भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. मिहीर आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक चंद्रकांत इलग व आईवडीलांना देतो. मिहीरच्या या यशाबद्दल त्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५६० - २४५० |
| गहू | २४०० - २४७५ |
| तुर | ५६०० - ६८७५ |
| हरभरा | ४३७५ - ५५०० |
| सोयाबीन | ३४२५ - ४४५० |
| भुईमुग | ३८०० - ५७७५ |
| निंबोळी | १३०० - १३०० |
| मक्का | १७२५ - १९४० |
| मूंग | ५३२५ - ६५०० |
| मलाई चना | ४८००-४८०० |

# जिल्ह्यातील तीन धार्मिक स्थळांना 'ब' वर्ग तीर्थस्थळांचा दर्जा !

## राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाचा निर्णय

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि. २२**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेंतर्गत जिल्ह्यातील तीन धार्मिक स्थळांना ब वर्ग तीर्थस्थळाचा दर्जा देण्यात आला असून, यासंदर्भातील शासनआदेश निर्गमित करण्यात आला आहे.

यानिर्णयाने जिल्ह्याच्या आध्यात्मिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, दर्जा प्राप्त स्थळांना भौतिक सुविधांच्या दृष्टीने महत्व प्राप्त होणार आहे. दर्जा देण्याच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागाला अनेक प्रस्ताव मिळाले होते. यासंदर्भाने (दि.८) ऑक्टोबर २०२४ रोजी एका विशेष समितीपुढे नव्याने ब



दर्जा प्राप्त पूर्तता केली. यामध्ये, चिखली तालुक्यातील गोंदरी येथील रेणुकादेवी संस्थान, बुलढाणा तालुक्यातील दुधा येथील श्री मर्दडी देवी संस्थान तसेच चिखली तालुक्यातील डोंगरशेवली येथील श्री सोमनाथ महाराज संस्थान या स्थळांचा समावेश आहे. उपरोक्त प्रस्तावातील कागदपत्रांची तपासणी करित सदर धार्मिक स्थळांना ब वर्गीय तीर्थस्थळ दर्जा प्रदान करण्यात आला आहे. यामुळे, आगामी काळात या स्थळांचा विकास होण्यास मदत मिळणार आहे. भाविकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तिर्थस्थळाचा दर्जा मिळाल्यामुळे येथे भाविकांसाठी सोइ-सुविधांची निर्मिती होणार आहे. भाविकांसाठी सुख सोई व पर्याई व्यवस्थेत वाढ होणार असून शासनाच्या या निर्णयामुळे भाविकांमध्ये समाधानी वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हयात अनेक प्रसिध्द धार्मिक स्थळे असेन जिल्हयातीलच नव्हे तर जिल्हयाबाहेरील भाविकांची असीम श्रध्दा असलेले अनेक देवस्थाने आहेत. त्यांना सुध्दा शासनकडून मदतीची प्रतिक्षा आहे. भाविकाच्या सोईसाठी अनेक देवस्थान समिती अपूरी पडत असल्याने अनेक समस्यांना तोंड देत भाविक आपल्या देवस्थानांना भेट देवून मनोभावे दर्शन घेण्यासाठी येतात. जिल्ह्यातील असे अनेक दुलर्क्षीत असलेल्या देवस्थानांना सुध्दा समावेश करण्यात यावा आणि शासनाकडून मदत मिळावी अशी आशा भक्तांकडून व्यक्त होत आहे.

**आदिशक्तीचे शक्तीपीठ रेणुकादेवी संस्थान**

आराध्य दैवत व आदिशक्तीचे शक्तीपीठ म्हणून सर्वत्र प्रसिध्द असलेल्या चिखली तालुक्यातील गोंदरी येथील रेणुकादेवी संस्थान परिसराला ऐतीहासिक पार्श्वभूमी आहे. तालुक्यातील हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. श्री सोमनाथ महाराज मंदीर ज्ञानगंगा अभयारण्याला लागून असलेल्या श्री सोमनाथ महाराज मंदीर हे शिवभक्तांचे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात येथे शिवभक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी उसळते. या मंदिराला हजारो वर्षांची पुरातन परंपरा लाभली आहे.

**सातपुडा पर्वतरांगेत वसलेले मर्दडी माता मंदीर**

सातपुडा पर्वतरांगेत वसलेल्या बुलढाणा धाड मार्गावरील मर्दडी मातेचे मंदीर आहे. येथे नवरात्र उत्सवादरम्यान भाविकांची वर्दळ असते. या मंदिराला लाभलेल्या निसर्ग सौंदर्यामुळे भाविकांसह पर्यटकांची नेहमी गर्दी असते.

# दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव वाटप

**अजिंक्य भारत/प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२२**

दिव्यांग व्यक्तींसाठी मदतीचा हात देणे म्हणजे कृत्रिम अवयवाचे वाटप करणे होय. नेमकी हीच बाब हेरून जिल्हा प्रशासन व राजकीय पक्ष संघटनांनी कृत्रिम अवयव वाटपाचे काम केले. याचा शेकडो गरजूंनी लाभ घेतला.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून अम्लिको आर.एम.सी. मुंबई, बुलढाणा जिल्हा प्रशासन व भाजपा महिला मोर्चा बुलढाणा जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने हात पाय इत्यादी साहित्य पुरविणे याकरिता दिनांक २० जून रोजी शिबिर घेण्यात आले. जिल्हा



प्रशासनाद्वारे बुलढाणा पंचायत समिती सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात बहुसंख्या गरजूंनी भाग घेतला. त्यांना कृत्रिम हात पाय बूट इत्यादी साहित्याची वाटप करण्यात आले. या शिबिराला दिवसभरात सामाजिक राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी भेटी दिल्या. त्याामध्ये भाजपा नगरसेवक वैभव इंगळे, बुलढाणा शहर भाजपा नेते नारायण भाऊ हेलगे, पंचायत समिती सदस्य संदीप उगले, नगरसेवक सिंधुताई खेडेकर, युवा नेते राजू नाटेकर आदी तर शिबिरासाठी भारतीय जनता पार्टी बुलढाणा महिला जिल्हाध्यक्ष सौ. स्मिताताई महेश चेकटकर, भाजपा तालुका अध्यक्ष सतीश भाकरे पाटील, महिला भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संगीताताई पवार, नितीन पंडित, किरण राऊत, भागवत जाधव, सागर पाटील यांच्यासह जिल्हा प्रशासन, अम्लिको आर.एम.सी. मुंबई यांची टीम यांनी हे दिव्यांग शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# सिल्वरसिटी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये 'जागतिक योग दिन' उत्साहात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२२**

बुलडाणा जिल्यातील सर्वात मोठया व एकाच छताखाली सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असलेल्या एकमेव अशा सिल्वरसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, क्रिटिकल केअर व ट्रामा सेंटर, खामगाव येथे शनिवार दि २१ जून २०२५ रोजी ''जागतिक योग दिन '' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी सिल्वरसिटी हॉस्पिटल चे अध्यक्ष डॉ अशोक बावस्कर, व्यवस्थापकीय संचालक डॉ पंकज मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पराग महाजन, उप मुख्य कार्य कारी अधिकारी डॉ



गौरव लदढा, संचालक डॉ निलेश तिबडेवाल, डॉ. गणेश महाले, डॉ. गौरव गोयंका, डॉ आनंद राठी,यांची उपस्थिती होती. आर्ट ऑफ लिविंग तर्फे त्याचे प्रशिक्षक श्री हितेश बोहरा तसेच स्वयंसेवक, दीपा पुरोहित हे आले होते यांनी वेग वेगळे योग शिकविले त्याात सूर्यनमस्कार, भ्रामरी, मकर आसन इ. चा समावेश होता. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ अशोक बावस्कर यांनी ''जागतिक योग दिना '' चे महत्व, सुरुवात, त्यामागील अभिप्रेत असलेला हेतू तसेच जागतिक आरोग्य तसेच वैद्यकीय क्षेत्रातील योगदान व योगा नियमित करण्यसाठी आपण काय करू शकतो या बद्दल विस्तृत माहिति दिली. हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पंकज मंत्री यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास सिल्वरसिटी हॉस्पिटलचे कर्मचारीने सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी निलेश बैरागी, सुपरवायझर यश देशमुख व सर्व कर्मचार्यांनी तसेच इप्का फार्मा कंपनी तर्फे रुपेश पुरोहित व शरद भालतडक यांनी परिश्रम घेतले अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पराग महाजन यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# भानखेड येथे धरती आबा अभियान

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मंगरूळ नवघरे दि.२२**



जनजातीय गौरव वर्ष २०२५ निमित्त आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना सक्षम बनविण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपाय योजना राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने १५ ते ३० जून दरम्यान तालुक्यात भानखेड व किन्ही नाईक येथे दिनांक १८ जुनं रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील भानखेड येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ उमा गायकवाड होत्याा तर प्रमुख पाहुणे म्हणून निवासी नायब तहसीलदार एच.डी. वीर होते. या कार्यक्रमाला मंडळ अधिकारी संजय चौधरी , एकात्मिक आदिवासी विभाग अकोला येथील प्रतिनिधी अमोल शिंदे ,मंडळ कृषी अधिकारी परिहार, रावे तसेच ग्राम महसूल अधिकारी संजय डुकरे ,सुनील ढवळे,रुपेश एकडे व सर्व महसूल सेवक तसेच पोलीस पाटील मिलिंद इंगळे, सेतूचालक, आरोग्य विभाग प्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, अशा वर्कर, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद व मोठ्या प्रमाणात गावकरी हजर होते संचालन सुनील ढवळे यांनी तर प्रास्ताविक संजय चौधरी मंडळ अधिकारी यांनी केले प्रास्ताविकामध्ये चौधरी यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकार राबवित असलेल्या प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान व प्रधानमंत्री जन मन योजने संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध विभागांची संबंधित योजनांची माहिती दिली तसेच एकात्मिक आदिवासी विभागाचे प्रतिनिधी अमोल शिंदे यांनी सुद्धा याबाबत सविस्तर माहिती ग्रामस्थांना दिली तर वीर यांनी मार्गदर्शन करून उपस्थित झालेल्या तक्रारींचे जागेवरच निराकरण केले .मंडळ कृषी अधिकारी परिहार यांनी त्यांच्या कृषी विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांना दिली. आरोग्य विभागाच्या प्रतिनिधी यांनी सुद्धा आयुष्यमान भारत पीएम जन आरोग्य योजना व पीएम मातृवंदना योजने संदर्भात माहिती दिली.

सरपंच यांनी सुध्दा अशा शिबिराचा गावकऱ्यांनी हजर राहून लाभ घेतला पाहिजे असे विशद केले.सदर शिबिरामध्ये आरोग्य विभागातर्फे कार्डचे वाटप करण्यात आले तसेच जॉब कार्ड ,जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत सातबारा वाटप ,संजय गांधी मंजूर आदेश, भुमि अभिलेख विभागातर्फे प्यार कार्ड इ चे वाटप करण्यात आले. सदर शिबीर यशस्वी होण्यासाठी रुपेश एकडे ग्राम महसूल अधिकारी भानखेड व मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शन संजय डुकरे ग्राम महसूल अधिकारी यांनी केले.

### स्वातंत्र्यवीर गणपतराव इंगळे महाविद्यालयाकडून योगाचा प्रसार

# रावे विद्यार्थ्यांनी चांगेफळ गावात रुजविले योगाचे महत्व !

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२२**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त स्वातंत्र्यवीर गणपतराव इंगळे उद्यानविद्या महाविद्यालयाच्या रावे (ग्रामीण कृषी जागरूकता आणि अनुभव) विद्यार्थ्यांनी एक कौतुकास्पद उपक्रम राबवला. त्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील चांगेफळ येथील शाळेत योग दिनाचे विशेष शिबिर आयोजित केले, ज्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि गावातील नागरिकांना योगाचे महत्व पटले.

महाविद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश गवळी सर, विषय तज्ञ प्राध्यापक जिवेश साळी सर आणि कार्यक्रम अधिकारी प्रितेश वानखडे सर यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली रावे विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी केली. रावे कार्यक्रमांतर्गत, विद्यार्थ्यांनी चांगेफळ गावातील शाळेला भेट दिली. येथे त्यांनी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित ग्रामस्थ यांच्यासाठी योग प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले. प्राध्यापक जिवेश साळी



सरांनी विद्यार्थ्यांना योगाचे शारीरिक आणि मानसिक फायदे, तसेच दैनंदिन जीवनातील त्याचे महत्व यावर पूर्वीच सखोल मार्गदर्शन केले होते, ज्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शिबिरात केला. या उपक्रमात सहभागी रावे विद्यार्थी: विद्यार्थी प्रमुख मयूर खवले, ऋतिक नागे, अथर्व मोहरील, आदेश ठोंबरे, आदित्य खोंड, आदित्य धाडवे. या विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यांनी सहभागींना योगासने योग्य प्रकारे कशी करावीत याबद्दल सूचना दिल्या आणि त्यांच्या शंकांचे निरसनही केले. त्यांच्या उत्साहामुळे आणि सोप्या मार्गदर्शनामुळे शाळेतील मुलांनी मोठ्या उत्साहात योगासने केली. यामुळे लहान वयातच योगाची सवय लावण्याचे महत्व अधोरेखित झाले.

# योगा, प्राणायाम केल्याने आरोग्य सुदृढ व निरोगी राहते- शिंदे

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**साखरखेर्डा दि.२२**

प्रत्येक व्यक्तीला योगा प्राणायाम केल्याने आरोग्य सुदृढ व निरोगी राहते. शरीर स्वस्थ ठेवण्याचा मूलमंत्र म्हणजे योग शिबीर आहे, त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने योग करणं महत्वाचं आहे असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजराज शिंदे यांनी दि. २१ जून रोजी जागतिक योग दिनानिमित्त येथील पलसिध्द महास्वामी मठाचे सभागृहात योग शिबिरात आयोजित कार्यक्रमातून केले.

बुलढाणा जिल्हा भाजपाचे अध्यक्ष मा.आ.विजयराज शिंदे यांच्या हस्ते या योग शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. भाजपचे प्रदेश प्रतिनिधी रावसाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या



या योग शिबीराचा पलसिध्द महास्वामी मठाचे दिवानजी विश्वनाथ जितकर आप्पा, भाजप शिक्षक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष दसरे,जिल्हा संयोजक चंद्रकांत बद्रे , जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अशोक इंगळे, प्राचार्य डी. एन.पंचाळ, शहराध्यक्ष गणेश शिराळे, सामाजिक कार्यकर्ते गोपाल शिराळे, संतोष गाडेकर, साहित्यिक कवि जगन्नाथ अवचार आदीं मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. वय केवळ १५ वर्ष वयाच्या प्रसिध्द योग शिक्षक बालयोगी वरद संतोष जोशी यांनी उपस्थित योग प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिले. तसेच दररोज योगाभ्यास केल्याने आपल्या मौल्यवान शरीराचे आरोग्य कसे संतुलित राहते, मन प्रसन्न राहून शरीर रोगराई विरहित राहते याबाबत सविस्तर माहिती दिली. या शिबिराला ५१ प्रशिक्षणार्थीनींनी हजेरी लावली. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब देशपांडे यांनी उपस्थितांना चित्र योगासनांची चित्रमय मार्गदर्शक पुस्तिका मोफत वितरीत करण्यात आली .

# मराठा पाटील युवक समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि. २२**

दिनांक २२ जुन वार रविवार रोजी इयत्ता दहावी व बारावी मध्ये ८० % पेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून खामगाव चे तहसीलदार सुनील पाटील, बांधकाम विभाग मुख्य अधीक्षक अभियंता सुनील थोटांगे, मराठा पाटील युवक समिती संस्थापक अध्यक्ष गजानन ढगे पाटील,खामगाव शहर पोस्टे चे ठाणेदार पवार, बांधकाम विभाग उप अभियंता पुंडकर, माजी जिल्हाध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हाध्यक्ष सुनील पाटील, खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोर आप्पा भोसले, बोंद्रे साहेब



आदींची उपस्थित होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार अर्पण करुन करण्यात आली. समिती संस्थापक अध्यक्ष गजानन ढगे यांनी समिती वतीने आयोजित विविध सामाजीक उपक्रमाची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांना काहीही शिक्षण घेतांना कुठल्याही समस्या असल्यास त्या समिती वतीने सोडविण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यामध्ये अशीच प्रगती करून समाजाची उन्नतीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष खामगाव चे तहसीलदार सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाप्रति ठाम राहून अभ्यासामध्ये सातत्य व चिकाटी ठेवल्यास यश हे नक्कीच मिळेल अशी सांगितले. याचबरोबर ठाणेदार पवार , पुंडकर , किशोर आप्पा भोसले यांनी सुद्धा यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विठ्ठल आवताडे यांनी केले. यावेळी दहावी व बारावी मध्ये ८०% विशेष प्राविण्य श्रेणी गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांना समिती वतीने प्रशस्तीपत्र तसेच स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार व अभिनंदन करण्यात आले. याचबरोबर प्रशांत यादगिरे, जय यादगिरे व अक्षय यादगिरे यांची मुंबई पोलीस तसेच भारतीय सेना मध्ये नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी समितीचे प्रा योगेश म्हैसागर, प्रफुल्ल पाटील,अनंता धामोडे, जिल्हा कार्याध्यक्ष मोहन घुईकर ,संघटक अविनाश कुटे खामगाव , जिल्हा उपाध्यक्ष सतीश लांजुळकर, प्रतीक मिरगे,जिल्हा प्रवक्ते विठ्ठल अवताडे, कृष्णा जवंजाळ आदी पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

## थोडक्यात

### रानडुकराचा हल्ला; दोघे गंभीर जखमी

**कारंजा :** तालुक्यातील बग्गी शिवारात शेतात काम करत असलेल्या दोघांवर रानडुकराने अचानक हल्ला केला. त्यात दोघेही गंभीर जखमी झाल्याची घटना १८ जून रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली. प्राप्त माहितीनुसार, आखतवाडा येथील राज रामभाऊ अवताडे (१९) आणि १८ वर्षीय मुलगी शेतात काम करत असताना अचानक त्यांच्यावर रानडुकराने हल्ला चढविला. या हल्ल्यात दोघांनाही गंभीर इजा झाली असून, कुटुंबीयांनी त्यांना तत्काळ कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले आहे.

### विजेचा धक्का लागून ६० वर्षीय इसम जखमी

**कारंजा :** शहरातील फंक्शन हॉलनजीक सकाळच्या सुमारास विजेचा शॉक लागून ६० वर्षीय गंगाराम माणिक नेवाळे हे जखमी झाले. ही घटना २१ जून रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. नेवाळे यांना अचानक विजेचा शॉक लागल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय सूत्रांकडून सांगण्यात आले. दरम्यान, त्यांना शॉक नेमका कसा लागला, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही.

### ५ लाखांचे अनुदान देण्याची मागणी

**वाशिम :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) सिंचन विहिरीचे अनुदान ५ लाख रुपये करण्यात आले. चालू आर्थिक वर्षात निवड झालेल्या लाभार्थ्यांना सिंचन विहीर बांधकामासाठी ५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी वाशिम बाजार समितीचे संचालक चरण गोटे यांनी १९ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. अनुदानात वाढ होऊनही पूर्वीचेच ४ लाखांचे अनुदान मिळत असल्याने शेतकरी लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

### दोन दिवसांत तिघांनी घेतला जगाचा निरोप

**कारंजा :** १९ जून रोजी मूर्तिजापूर तालुक्यातील २८ वर्षीय युवकाने कारंजा शहरातील बायपास परिसरात विष प्राशन केले. याच दिवशी सायंकाळी साडेतीनच्या सुमारास कारंजा तालुक्यातील शेलुवाडा येथील ३५ वर्षीय विवाहित महिलेने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला, तर २० जून रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास मनभा येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने विष घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

### जिल्हा न्यायालयात योग दिन साजरा



**वाशिम :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जुन २०२५ रोजी जागतिक योग दिनानिमित्त जिल्हा व सत्र न्यायालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या राज्य गीताने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. हांडे, तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे उपस्थित होते. योग प्रशिक्षक आशिष सिताराम जामकर यांनी सर्व उपस्थितांना योगाचे प्रशिक्षण दिले. तसेच २०२५ ची योगा थिम एक पृथ्वी, एक आरोग्य याअनुषंगाने योगाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमात मुख्यालयात कार्यरत सर्व न्यायीक अधिकारी तसेच ॲड. ए. एस. बाकलीवाल, अध्यक्ष जिल्हा विधिज्ञ मंडळ, विधिज्ञ मंडळातील इतर सदस्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची प्रस्तावना ॲड. परमेश्वर आ. शेळके, मुख्य न्यायरक्षक यांनी केली. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड. वैभव तिफणे, उपाध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ मंडळ यांनी केले. या कार्यक्रमात न्यायीक अधिकारी, विधिज्ञ मंडळातील सदस्य व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'महा स्ट्राईड': विकासाच्या दिशेने पहिले पाऊल

## गुरू मंदिर, बालाजी मंदिर अशा पर्यटन स्थळांना प्रोत्साहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २२ :** विकासाच्या वाटचालीत प्रत्येक जिल्ह्याला स्थानिक गरजांनुसार प्रभावी योजना आखण्याची आणि अंमलात आणण्याची आवश्यकता असते. शासनाच्या नव्या दृष्टीकोनातून जिल्हास्तरावर माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया सक्षम करण्यासाठी महा स्ट्राईड ही महत्त्वाकांक्षी योजना साकार होत आहे. वाशीम जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील शाश्वत विकास सुनिश्चित करण्यासाठी ही योजना ठोस पाऊल ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर वाशीम जिल्हाधिकारी कार्यालयात या योजनेची प्रारंभिक बैठक आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये डेटा व धोरण युनिटच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नव्याने दिशा ठरवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आज जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या अध्यक्षतेखाली महास्ट्राईड (महाराष्ट्र स्ट्रेन्थनिंग इन्स्टिट्यूशनल कॅपॅबिलिटीज इन डिस्ट्रीक्ट्स फॉर एनब्लिंग ग्रोथ) योजनेची प्रारंभिक बैठक पार पडली. ही बैठक योजनेच्या परिचयासाठी आयोजित करण्यात आली होती. यावेळी मोहम्मद अमीन यांनी डेटा आणि धोरण युनिट (डीएसयू) च्या कार्यप्रणाली आणि उद्दिष्टांबाबत सविस्तर माहिती सादर केली. ही योजना भविष्यात वाशिमच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे,मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे , वनसंरक्षक अभिजीत वायकोस, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ



घुगे, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

महास्ट्राईड योजनेचा उद्देश जिल्ह्यामध्ये माहिती-आधारित शासन पद्धती लागू करणे आणि स्थानिक प्रशासनाच्या संस्थात्मक क्षमता वाढवून शाश्वत विकास साध्य करणे आहे. मोहम्मद अमीन यांनी या बैठकीत सांगितले की, डीएसयूच्या महा माहिती बँक मंचाद्वारे शेती, पर्यटन आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील माहिती संकलन, एकत्रिकरण आणि विश्लेषणाचे काम सुरू होणार आहे. विशेषतः, पोहरादेवी मंदिर, बालाजी मंदिर आणि बंजारा विरासत संग्रहालय यांसारख्या पर्यटन स्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी माहिती-आधारित धोरणे आखण्याचे नियोजन आहे. यामुळे पर्यटन क्षेत्रात रोजगार निर्मिती आणि आर्थिक वाढीला चालना मिळेल. तसेच, शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना आणि रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी माहिती विश्लेषणाचा उपयोग होईल, ज्यामुळे शेती उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी योजनेच्या प्रारंभिक टप्प्याचे कौतुक केले आणि वाशिमच्या मागास तालुक्यांमध्ये, विशेषतः रिसोड आणि मालेगाव येथे, विकासकामांना गती देण्याचे निर्देश दिले. पैनगंगा नदी खोऱ्यातील पूर आणि दुष्काळ व्यवस्थापनासाठी माहिती-आधारित तयारीवर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. डीएसयूच्या तात्काळ माहिती फलकाद्वारे प्रकल्पांचे निरीक्षण आणि पारदर्शकता वाढवण्याच्या योजनेचा परिचयही या बैठकीत झाला.

**ही प्रारंभिक बैठक वाशिमच्या शाश्वत विकासाच्या दिशेने पहिले पाऊल मानली जात आहे. योजनेच्या दीर्घकालीन फायद्यांमुळे वाशीम जिल्हा पर्यटन, शेती आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात एक समृद्ध केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.**

बैठकीत तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पर्यटन, शेती आणि महसूल विभागाचे प्रतिनिधीही उपस्थित होते. मोहम्मद अमीन यांनी डीएसयू च्या माध्यमातून वाशीमच्या सहा तालुक्यांमध्ये माहिती-आधारित नियोजन आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या योजनांचा परिचय करून दिला. जिल्हा प्रशासनाने महा स्ट्राईड योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# दोन दुचाकीची समोरासमोर धडक; एक जण गंभीर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २२ :** तालुक्यातील ग्राम गंगापुर फाट्या जवळ रविवारी सकाळी ११च्या सुमारस् दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला असून दोन जणांना किरकोळ दुखापत झाली आ हे.घटनेची माहिती मिळताच रुग्णसेवक विधाता चव्हाण, शिवम खोंड दिपक सोनोने घटनास्थळी दाखल झाले व जख्मीना उपजिल्हा रुग्णाल्यात दाखल केले.गंभीर जख्मीचे नाव आजाब बाबूसिंग जाधव वय ४५ रा.रामनगर व किरकोळ जख्मी बबन चव्हाण वय ५५ कुसुम चव्हाण ५३ दोघेहीं रा. गंगापुर असे आहे तर आजाब जाधव यांना पायाला गंभीर दुखापत झाल्यामुळे डॉक्टरानी तपासून उपचार करुण पुढील उपचारा करिता यवतमाळ येथे हलविण्यात आले.अपघातात दोन्ही दुचाकींचे मोठे नुकसान झाले. प्रत्यक्षदर्शींनी



तात्काळ मदत करत जखमींना कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. किरकोळ जखमी व्यक्ती व महिलाची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पुढील तपास सुरू केला आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप समजले नसले तरी वेगावर नियंत्रण न राखणे व चुकीचा ओव्हरटेक हे कारण असू शकते, असा प्राथमिक अंदाज आहे.

# बनावट खत विक्री: आरोपी अद्यापही फरारच

## १५ दिवसांपूर्वी प्रकार उघडकीस, गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २२ :** राजस्थानहून कमी दरात रासायनिक खत आणून ते नामांकित कंपन्यांच्या बॅगमध्ये भरून स्थानिक बाजारात विक्री करणाऱ्या दिनेश चव्हाण याच्याविरोधात कृषी विभागाच्या तक्रारीनंतर ३ जून रोजी मानोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, १५ दिवस उलटूनही आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही.

तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत व मंडळ कृषी अधिकारी उमेश राठोड यांनी कारपा येथे



छापा टाकला. यावेळी कृभको कंपनीच्या लेबल असलेल्या २७० बनावट खताच्या बॅग, ३३० बेनामी बॅग, शिवणयंत्र व इतर साहित्य जप्त करण्यात आले. दरम्यान, हे सर्व जप्त साहित्य अद्याप घटनास्थळीच, गोठ्यात ठेवलेले आहे. दिनेश चव्हाण हा आरोपीही अद्याप फरार असल्यामुळे या प्रकरणावर गूढतेची छाया आहे.

बनावट खत प्रकरणात केवळ एका व्यक्तीचे नाही, तर अनेकांचे हात ओले असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये होत आहे. आरोपीला लवकरात लवकर जामीन मिळावा यासाठी देखील प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, आरोपीने न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला असून, तो फेटाळण्यात आला तर घटनास्थळीच त्याला अटक करण्यात येईल, अशी माहिती ठाणेदार प्रवीण शिंदे यांनी दिली.

### खताच्या अहवालाची प्रतीक्षा

जप्त केलेल्या बनावट खताचा नमुना छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आला असून, या आठवड्यात विश्लेषणात्मक अहवाल मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाई होईल, असे तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांनी स्पष्ट केले.

# ॲग्रीस्टॅक योजना: शेतकऱ्यांनो ओळखपत्र तयार करून घ्या!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २२ :** तालुक्यातील शेतकरी बांधवांनी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले असून विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी उपरोक्त केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत ओळखपत्र अनिवार्य करण्यात आल्याचे तहसीलदार डॉ.संतोष येवलीकर यांनी केले आहे.

शेतकरी ओळखपत्र शिवाय शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्माननिधी आणि नमो शेतकरी महासन्मान निधी सारख्या महत्त्वाच्या योजनांचा लाभ घेता येणार नाही. त्यामुळे मानोरा तालुक्यातील सर्व जमीन धारक शेतकऱ्यांनी त्वरित शेतकरी ओळखपत्रासाठी अर्ज करण्याची आवाहन तहसीलदार डॉ. येवलीकर यांनी केले आहे. डॉ. येवलीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी ओळखपत्रामुळे सरकारला



शेतकऱ्यांची अचूक माहिती उपलब्ध होऊन त्यांना योग्य योजनांचा लाभ पोहोचवणे सोपे होणार आहे. विशेषतः पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा आगामी हप्ता आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शेतकरी ओळखपत्र असणे यापुढे बंधनकारक करण्यात आलेले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे हे ओळखपत्र नसेल त्यांच्या खात्यात पुढील हप्ता जमा होण्यात तांत्रिक अडचणी निर्माण होणार आहे. या ओळखपत्रासाठी अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर संपर्क साधण्याचे आवाहन तालुका आपत्ती निवारण प्राधिकारी तथा तहसीलदार मानोरा डॉ.येवलीकर यांनी केले आहे.

# आ. खोडे यांनी केले खरात कुटुंबाचे सांत्वन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २२ :** अनसिंग येथील खरात व लाटे कुटुंबाची आमदार श्याम खोडे यांनी भेट घेवून त्यांचे सांत्वन केले. मृतक तनुजा खरात यांचे पती अनिल खरात यांना आ.खोडे यांनी चार लाख रुपयाचा धनादेश दिला. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक सहाय्य करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही दिली. गंभीर जखमी झालेल्या गंगाबाई लाटे यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदत देणार असे म्हटले.

१२ जून रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास अनसिंग येथील तनुजा अनिल खरात (१९ वर्ष) आणि गंगाबाई लाटे



(४० वर्ष) या त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या शेतामध्ये पिण्याचे पाणी आणण्यासाठी गेल्या होत्या.अचानक त्यावेळी विजांचा कडकडाट सुरू झाला. दोघीही पाणी घेवून घरी परत येतांना तनुजा खरात हिच्या अंगावर वीज पडून ती जागीच ठार झाली.तर सोबत असलेल्या गंगाबाई लाटे गंभीर जखमी झाल्यात.या नैसर्गिक आपत्तीमुळे खरात परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला. वाशीमचे आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शनिवार २१ जून रोजी सकाळी अनसिंग येथे खरात व लाटे कुटुंबाची भेट घेवून दोन्ही कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी बाजार समितीचे संचालक नत्थुजी कापसे,भाजपचे माजी शहरअध्यक्ष राजकुमार मानधणे,माजी पंचायत समिती सदस्य बालु माल,सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सातव,चंद्रकांत ठाकरे यांचेसह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पर्यावरण पूरक रेशीम शेतीसाठी लाखोचे अनुदान

## मनरेगा आणि केंद्र पुरस्कृत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २२ :** मनरेगा अंतर्गत एक एकर वृक्ष लागवड जोपासना करण्यासाठी रु. २ लक्ष १२ हजार ७८४ मजुरी तीन वर्षात दिली जाणार आहे. रेशीम किटक संगोपन गृह बांधकामासाठी मजुरी रु. ६६ हजार ४५६ तर साहित्य साठी रु. १ लक्ष ५३ हजार दिले जाणार आहेत. असे एकूण रु. ४ लक्ष ३२ हजार २४० तीन वर्षात दिले जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र रेशीम संचालनालय, नागपूर अंतर्गत जिल्हा रेशीम कार्यालय, वाशीम मार्फत रेशीम विकास योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेत



सहभागी केले जाते. एका गावातून कमीत कमी ५ शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने जिल्हा रेशीम कार्यालयाकडे ग्राम रोजगार सेवक यांचे मार्फत अर्ज करावेत. त्यासाठी प्रति एकर रु. ५०० नोंदणी शुल्क रेशीम कार्यालयात जमा करावे.

बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र - २ या योजनेत सहभाग घेता येईल. तुती वृक्ष लागवडीसाठी १ एकर करिता रु. ४५ हजार, सिंचन व्यवस्थेकरिता रु. ४५ हजार, संगोपनगृह बांधकाम करिता रु. २ लक्ष ४३ हजार ७५०, संगोपन साहित्यासाठी रु. ३७ हजार ५०० आणि निर्जंतुकीकरण औषधी साठी रु ३ हजार ७५० काम पूर्ण झाल्यावर दिले जातात.

या योजनेतून होणारी तुती वृक्ष लागवड मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पावसाळ्यात १० कोटी वृक्ष लागवड पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी उद्दिष्ट दिले आहे. त्यामध्ये या तुती वृक्ष लागवडीची गणना होणार आहे. रेशीम संचालनालयास ४ कोटी चा लक्षाँक देण्यात आला आहे. त्यापैकी १८ लक्ष (३०० एकर) तुती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वाशीम जिल्ह्यास देण्यात आले आहे.

तरी शेतकरी बंधूनी पर्यावरण पूरक व शेतीशी निगडीत रेशीम उद्योग करून रेशीम कोष निर्मिती पासून आपले उत्पन्न वाढवावे. असे आवाहन जिल्हा रेशीम अधिकारी सुनील दत्त फडके यांनी केले आहे.

# पाऊस नसल्याने बियाणे उगविण्यासाठी सिंचनाचा आधार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**इंझोरी, दि. २२ :** इंझोरी परिसरात अद्यापही पेरणी योग्य पाऊस झालाच नसल्याने शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची व्यवस्था आहे. त्यांनी शेतामध्ये बियाणे पेरले असून त्या बियाण्यांना अंकुरण्याकरिता तुषार सिंचनाचा वापर करत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे .

परिसरात हलक्या फुलक्या रिमझिम पावसामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. असे असले तरी पेरलेल्या पिकांना वाढीसाठी दमदार पावसाची आवश्यकता आहे. अशा अपुऱ्या पावसाच्या भरोशावर काही शेतकऱ्यांनी शेतामध्ये बियाण्यांची पेरणी केली



आहे. तर अनेक शेतकऱ्यांच्या पेरण्या रखडल्या असून शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागले आहे. मृग नक्षत्र संपत आला असूनही अद्याप परिसरात दमदार पावसाने हजेरी लावलेली नाही. करिता कोरडवाहू शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे असून ज्या शेतकऱ्यांकडे सिंचन व्यवस्था आहे त्यांनी मात्र शेतामध्ये पेरणी केली आहे. त्यामुळे बियाणे अंकुरणे व वाढीकरिता तुषार सिंचनाचा वापर करत असल्याचे चित्र परिसरात बघायला मिळत आहे.

# भीमशक्तीच्या संघर्षाला यश

## अकोल्यातील 'सामाजिक न्याय भवन'ला लागला नामफलक, लवकरच होणार लोकार्पण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २२ :** सामाजिक न्यायासाठी सुरू असलेल्या दीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले असून तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री .खा. चंद्रकांत हंडोरे यांच्या ऐतिहासिक क्रांतिकारी शासन निर्णयातून अकोला जिल्ह्यातील बहुप्रतीक्षित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन' या इमारतीवर अधिकृत सरकारी नामफलक लावण्यात आला आहे. अनुसूचित जाती मागासवर्गीय, व इतर वंचित घटकांसाठी ही एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी घटना मानली जात आहे.



या यशामागे भीमशक्ती संघटनेचा सातत्यपूर्ण लढा, कार्यकर्त्यांचा निर्धार आणि नेतृत्वाची स्पष्ट दिशा कार्यरत होती. विदर्भ प्रदेशाध्यक्ष पंकज मेश्राम व अकोला जिल्हाध्यक्ष भूषण गायकवाड यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. आंदोलनं, निवेदने, जनजागृती मोहीम यांद्वारे या भवनाचे प्रत्यक्ष अस्तित्व शक्य झाले.

ही इमारत समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचे प्रमुख केंद्र ठरणार असून, वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळणार असून मागासवर्गीयासाठी संघर्ष, प्रेरणा आणि मार्गदर्शनाचे प्रतीक ठरेल.

### लवकरच लोकार्पण

नामफलक लावण्यात आल्यानंतर आता या इमारतीच्या औपचारिक लोकार्पणाची तयारी सुरू झाली आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

### भीमशक्तीचा निर्धार

या यशस्वी पाठपुराव्या बाबत प्रतिक्रिया देताना जिल्हाध्यक्ष भूषण गायकवाड म्हणाले, ''हे फक्त पहिले पाऊल आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, हक्कांसाठी आणि सामाजिक समतेसाठी आमचा लढा आणखी जोमाने सुरू राहील.

### या यशामध्ये विशेष योगदान

या ऐतिहासिक कार्यात पुढील पदाधिकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले आहे. शैलेश लंकेश्वर, विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष, सचिन शेजव, दिव्यांग विभाग अध्यक्ष, अंकूश गावंडे, युवा आघाडी अध्यक्ष, सचिन तिडके, युवा आघाडी शहराध्यक्ष, सुशिल गायकवाड, सुशिल कांबळे, आकाश हिवराळे, अभिजीत गायकवाड, दिनेश खोब्रागडे, गौतम उमाळे, मिलींद गवई, राहुल अंभोरे यांच्यासह भीमशक्ती संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी प्रशासनाशी संवाद, जनजागृती, आणि सशक्त मागणी यांद्वारे या लढ्याला यशस्वी बनवले.

## थोडक्यात

### शिवपूर येथील जि.प. शाळेत योग दिवस साजरा




**अकोट** : अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या ग्राम शिवपुर येथे जि.प.वरि प्रा.सेमी इंग्रजी शाळा येथे योगगुरू प्रकाश बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून सांगण्यात आले.व त्यांच्या कडून योगाचे प्रात्यक्षिके करून घेण्यात आले.योगदीन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिपक ताराम व उपसरपंच हरिदास सुरत्ने,पालक वर्ग,व उच्चश्रेणी मुख्याध्यापक गोपाल वानखडे, नागरे, बिहाडे, ढोरे, शिवरकर, खोटरे, कृतिका महाले स्वयंसेवक,अंगणवाडी सेविका,मदतनीस,व गावातील नागरिक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दानापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**दानापूर** : संपूर्ण जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, सहकार विद्या मंदिर व नारायणदेवी सहा. कनिष्ठ महाविद्यालयात योग दिन उत्साहात पार पडला. निरोगी शरीर आणि शांत, स्थिर मनासाठी योगाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन विविध योगासने केली. कार्यक्रमाचे आयोजन सहकार विद्या मंदिर जळगाव, जामोद, वरवट बकाल, दानापूर तसेच पिंपळगाव काळे या शाखांचे अध्यक्ष डॉ. किशोर केला. व मुख्य संयोजिका तसेच महाराष्ट्र बालशिक्षण परिषद जळगाव केंद्राच्या अध्यक्षा डॉ. स्वाती केला यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पाटील सर यांनी उपस्थितांना विविध योग प्रकार शिकवले व त्यामागील शास्त्रीय व व्यावहारिक महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, योग केवळ शारीरिक आरोग्यासाठीच नाही, तर मानसिक स्थैर्यासाठीही उपयुक्त आहे. या कार्यक्रमात सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. संपूर्ण परिसरात एक सकारात्मक ऊर्जा अनुभवास आली आणि योग दिन उत्साहात साजरा झाला.

### कुरणखेडच्या तीन भूमिपुत्रांची भारतीय रेल्वेत निवड



**कुरणखेड** : येथील मातीत गुणवत्तेची आणि प्रतिभेची कमी नसल्याचे उदाहरण पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कुरणखेडच्या तीन भूमिपुत्रांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या कर्तव्याची मोहर उमटवली आहे. आहे.गावातील सार्वजनिक अभ्यासिकेत अभ्यास करून त्यांनी या यशाकडे आपली वाटचाल केली आहे रेल्वे विभागाचा नुकताच जाहीर झालेल्या निकालात येथील तिघांची भारतीय रेल्वे कोकण विभागात वेगवेगळ्या पदावर निवड झाली आहे. कुरणखेड येथील आकाश अरुण चिकार हे स्पर्धापरीक्षेचा अभ्यास करत त्यांनी कुठेही न थांबता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी चार शासकीय नोकरीची पोस्टिंग मिळवीली आहे. कोकण रेल्वेस्टेशन मास्तर, कोकण रेल्वे टीसी, कोकण रेल्वे ट्रेन मॅनेजर, भारतीय रेल्वे टेक्निशियन या पदावर त्यांची निवड झाली आहे. विशेष भारतीय रेल्वे मेकॅनिकल फील्डमधून भारतातून त्यांचा पहिला क्रमांक आल्याने कुरणखेड येथील नागरिकांसाठी ही खूप अभिमानाची बाब आहे, त्याचबरोबर कुरणखेड येथीलच भूमिपुत्र राजरत्न बाबाराव गायकवाड यांनी सुद्धा कोकण रेल्वे स्टेशनमास्तर ,कोकण रेल्वे टीसी, कोकण रेल्वे ट्रेन मॅनेजर, त्याचबरोबर भारतीय रेल्वे टेक्निशियन या पदावर त्यांची निवड झाली आहे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन केले आहे. या सोबतच कुरणखेड येथुनच जवळच असलेल्या खडका गावातील अनुज नागे यांची काही दिवसा अगोदरच भारतीय रेल्वे गट ड मध्ये निवड झाली होती. मात्र आता नव्यानेच आलेल्या रिझल्टमध्ये त्यांची गट क मध्ये निवड झाली आहे त्यामुळे या तिन्ही भूमिपुत्रांनी अटकेपार झेंडा रोवल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई वडील यांना दिले त्यामुळे या सर्व भूमिपुत्रांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## भेंडीमहाल ते पिंजर रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पिंजर दि. २२ :** भेंडीमहाल ते पिंजर रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून, रस्त्यावरील खड्ड्यामुळे प्रवास अक्षरशः जीवघेणा झाला आहे,

सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष व प्रशासनाच्या उदासीन ते मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, विशेषता: किसन राठोड यांच्या शेता जवळील एका बाजूने पूर्णत: खड्यामुळे त्या भागातून चारचाकी वाहनाची वाहतूक

बंद झाली आहे परिणामी कारंजा ते अकोला जाणारी एस,टी बस सेवा बंद करण्यात आली असून त्याचा फटका वृद्ध नागरिक व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात बसत आहे, या खड्ड्यामुळे वाहनधारकांना विकार, अपघाताचा धोका आणि वेळेचा अपव्यय सहन करावा लागत आहे, रस्त्यालगत



असलेल्या झाडाच्या वाढलेल्या फांद्याही प्रवाशांना अडथळा ठरत आहेत, या झाडाच्या फांद्या तोडून विल्हेवाट लावावी, अशी मागणीही स्थानिक नागरिकांनी केली आहे, या रस्त्याची त्वरित डागडुजीकरण्यात यावी,रस्ता सुरक्षित करावा आणि झाडाच्या फांद्या तोडून वाहतूक सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी,राजेश महल्ले, रामेश्वर राठोड, विजय चव्हाण, अनिल देशमुख, राजेंद्र देशमुख, रवी जाधव,राजु राठोड,सहदेव पवार, कुलदीप राठोड, संजय राठोड, तसेच स्थानिक तरुण व ज्येष्ठ मंडळी कडून करण्यात आली आहे, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## बोरगाव मंजू मधील वीजपुरवठा वारंवार खंडित

### ग्रामस्थांनी दिला उपोषणाचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बोरगाव मंजू, दि. २२ :** बोरगाव मंजू येथील निपाणा रस्त्यावर डीपीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे बोरगाव मंजू परिसरातील काही भागातील विजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. ही डीपी ही खूप जुनी झाली असल्यामुळे वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर विद्युत कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी संपर्क केला असता, एक तर त्यांच्याशी संपर्क होत नाही आणि झाला तर कोणताही कर्मचारी फोन उचलायला तयार




नाही. असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या डीपीवरून विद्युत पुरवठा खंडित झाल्यास नागरिक जीव हातात धरून आपल्या हाताने फ्युज टाकण्याचं काम करतात, यामधून काही जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? हा प्रश्न उपस्थित होत आहे. डीपीचे काम आठ दिवसात पूर्ण करावे अन्यथा समस्त गावकरी बोरगाव मंजू येथील विद्युत कार्यालयासमोर आमरण उपोषण करतील असा इशारा ग्रामस्थांनी आपल्या निवेदनातून विद्युत विभागाला दिलेला आहे.

## फुटलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना त्रास

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २२ :** येथील ग्रामपंचायतने जलजीवन मिशनचे माध्यमातून गावातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती केली आहे. मात्र रस्ते दुरुस्ती करताना कुठे सळई वापर केला गेला मात्र सिमेंट कॉन्क्रीटचा अपुरा माल वापरला गेल्याने त्या सळई उघड्या पडल्या आहेत. तर कुठे सळईचा वापरच केला नसल्याने याचा त्रास गावातील नागरिकांना होत आहे. त्यातच हेच रस्ते दुरुस्ती करण्यासाठी केवळ खोदून ठेवले असल्याने समस्यामध्ये वाढच होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने किमान लोकांची वर्दळ असलेल्या रस्त्यावर उघड्या पडलेल्या सळई दाबावयात आणि रस्ते सुस्थितीत चालण्यायोग्य करावीत अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. गेल्या दोन वर्षापासून वाडेगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या जलजीवन मिशनचे काम कधी चालू तर कधी बंद राहते. त्यातच गावातील मुख्य रस्ता खोदल्यामुळे त्यामधील सळई बाहेर निघलेले आहेत. आठवडी बाजारात जाताना मोठ्या प्रमाणात निघालेल्या सळईमुळे ४० वर्षीय महिलेचा सळईमध्ये पाय अडकून पडल्याने गंभीर दुखापत झालेली आहे. तसेच गावातील प्रत्येक गल्लीमध्ये रस्त्याचे खोदकाम करून वरच्यावर काम केल्याने रस्त्याने चालणे झाले अवघड झाले आहे. सध्या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. मुख्य रस्त्याने जाताना शाळेकरी विद्यार्थ्यांना अंदाज येत नसल्याने कित्येकदा विद्यार्थी त्या खड्ड्यामध्ये पडले आहेत.

## छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २२ :** तालुक्यातील लाखपुरी येथे दि. २० ला ग्रामपंचायत कार्यालय लाखपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ॲग्रीटेक/किसान कार्ड/शेत रस्त्याबद्दल अडचणी, जिवंत सातबारा मोहीम, सेतू मधील सर्व दाखले वितरण, श्रावण बाळ/ संजय गांधी योजने मधील ज्या लाभार्थ्यांचे मानधान झाले नाही त्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या व ईतर योजनेचा लाभ यावेळी लाभार्थ्यांना देण्यात आला .ज्या शेतकऱ्याच्या अडचणी आल्या त्या जाणून घेतल्या.



यावेळी निवासी नायब तहसिलदार रविंद्र राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. निवासी नायब तहसीलदार रविंद्र राऊत यांनी शेतकऱ्यांना ॲग्री टेक / फार्मर आयडीचे महत्व व फायदे सांगितले व याशिवाय अतिवृष्टी चे पैसे पिक विमा चा लाभ रजिस्ट्रेशन न केल्यास मिळणार नाही व सर्व शेतकऱ्यांनी रजिस्ट्रेशन करून घ्या असे आव्हान सुद्धा त्यांनी यावेळी केले व शेतकऱ्यांचे विविध समस्या जाणून घेतल्या यावेळी मंडळ अधिकारी राजेंद्र जाधव, ग्राम महसूल अधिकारीमध्ये वीरेंद्र वानखडे, वैभव राऊत, संतोष समुद्रे, पवन जोथ, अजय तायडे, सरपंच राजप्रसाद कैथवास, कृषी सेवक राठोड, महसूल सेवक आरती मदन कैथवास, महसूल सेवक कु. कावरे, ग्रामपंचायत सदस्य गण, संगणक परिचालक अतुल नवघरे, ग्रामपंचायत कर्मचारी श्रीकांत देशमुख, जगन सुरजुसे सह गावातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

> ज्या शेतकऱ्यांने अद्याप पर्यत ॲग्रीटेक / किसान कार्ड नोंदणी केली नसेल त्यांनी करुन घ्या व श्रावण बाळ योजना व संजय गाधी योजना मधील ज्या लाभार्थ्यांचे अद्याप पर्यंत पैसे आले नसेल त्यांनी आधार व पासबुक झे. आधार ला मोबाईल नंबर लिंक असलेला मोबाईल नंबर सहित तहसिल कार्यालयात जमा करावे.
>
> **- रविद्र राऊत,** निवासी नायब तहसिलदार मुर्तिजापुर

## शेतकऱ्यांचे सोयाबीन ४५०० रुपये क्विंटल; तर बियाण्यांचा भाव ११ हजार रुपयांवर

। विनोद वसु ।

**टाकळी बु., दि. २३ :** खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून सोयाबीनची ओळख आहे. यामुळे शेतकऱ्यांकडून या पिकाचा काही प्रमाणात पेरा केला जातो. सोयाबीनवरच शेतकऱ्यांचे आर्थिक गणित ठरलेले असते; परंतु सोयाबीनचे उत्पन्न निघाल्यावर शेतकऱ्यांना भाव मिळत नाही. सध्या सोयाबीनचा भाव क्विंटलमागे ४३०० रुपये आहे. तर एक क्विंटल सोयाबीन बियाण्यासाठी ११ हजार रुपये (३० किलोची बॅग ३३०० रुपये) मोजावे लागत आहे.शेती उत्पन्नाला भाव मिळत नाही व दुसरीकडे बियाणे, खते व कीटकनाशकांचे दर प्रचंड वाढले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. भरघोस पावसामुळे २०२४-२५ मधील खरीप व रब्बी दोन्ही हंगाम हातचे गेले. यावर्षी २०२५-२६ हवामान खात्याने चांगल्या पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्या उमेदीने खरीप हंगामाची



तयारी चालू केली आहे. शेतकऱ्यांसह कृषी सेवा केंद्र आणि खत, बियाणे पुरवठा करणारे दुकानदारही सज्ज झाले आहेत. नवीन बियाणे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. यावर्षी सोयाबीनचे दर पाहता बियाण्यांच्या दरात काही प्रमाणात कपात दिसून येत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या मालापेक्षा कंपनीच्या मालाला तीनपट अधिक भाव आहे. सध्या सोयाबीनला क्विंटलमागे ४३०० रुपयांचा दर आहे, तर कंपनीच्या बियाण्यांचा भाव दहा हजार रुपये आहे. सोयाबीन बियाण्यांच्या विविध प्रकारच्या बॅगचे भाव २४०० पासून ते ३३०० रुपयांपर्यंत आहे. सोयाबीन बियाणे ३० किलोच्या बॅगमध्ये उपलब्ध आहे.

> शेतकऱ्यांकडून ४३०० रुपये क्विंटलने सोयाबीन खरेदी केले जाते. परंतु बियाणे तीनपट अधिक दराने खरेदी करावे लागते. सोयाबीन बियाण्यांची ३० किलोची बॅग ३३०० रुपयांना असून शेतकऱ्यांचा झालेला खर्च व मिळणाऱ्या उत्पन्नाचा ताळमेळ जुळत नाही.
>
> **- रमेश वसु,** शेतकरी, टाकळी बु

> शेतकऱ्यांचे सोयाबीन ४३०० रुपये क्विंटलने खरेदी करायचे आणि सोयाबीनची ३० किलोंची बॅग ३३०० रुपयांना विकायची, म्हणजेच क्विंटलला ११ हजार रुपये मोजावे लागतात. शासनाचे शेतकऱ्यांसाठी दामदुप्पट धोरण हेच आहे का, असा प्रश्न पडतो.
>
> **- रामकृष्ण वसु,** शेतकरी टाकळी बु

### योजनेच्या बियाण्यांचा लाभ मिळेना

शेतकरी बांधवांसाठी बांधावर बियाणे, मोफत बियाणे अशा शासनाच्या विविध योजना असल्याचे शेतकऱ्यांना सांगण्यात येतेः परंतु प्रत्यक्षात या योजनांचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही. अनेक शेतकरी बियाणे मिळण्यासाठी नोंदणी करतातः परंतु त्याचा लाभमोजक्याच शेतकऱ्यांना मिळतो. उर्वरित शेतकऱ्यांना त्यापासून वंचित रहावे लागते, हे वास्तव चित्र आहे.

## वन्यप्राण्यांचा पिंजर, भेंडगाव परिसरातील शेतात हैदोस

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. २२ :** बार्शीटाकळी पिंजर, भेंडगाव परिसरात वन्य प्राण्यांचा हैदोस वाढत चालला असून, शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. पेरणी करून आठ दिवसपण झाले नाहीत, आता कुठे अंकुर वर येत आहेत. अश्या परिस्थितीत हा २५ ते ३० नीलगाईचा कळप शेतात घुसून अंकुराची नासधूस करत हैदोस घालत आहेत.

आधीच पाऊस पडत असल्यामुळे त्यात दुबार पेरणीचे संकट आणि नीलगाय, रानडुक्कर, माकडे आणि हरणे अशी वन्य प्राणी शेतात शिरून पेरणी केलेले पिक उद्ध्वस्त करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. पिंजर, भेंडगाव आणि परिसरातील अनेक शेतांमध्ये नुकतीच लावलेली सोयाबीन, तूर, कपाशी आणि मूगाची पिके या प्राण्यांच्या हल्ल्यामुळे खराब झाली आहेत. शेतकरी रात्र न दिवस शेतात राहून, प्राणी हाकलण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, यामुळे फारसा फरक पडत नाही. स्थानिक शेतकरी करण इंगोले यांनी सांगितले की, रोज दिवसा किंवा रात्री हे प्राणी शेतात येतात आणि आमचे पिके फस्त करतात. पिंजर, भेंडगाव परिसरातील वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा व वन्य प्राण्यां पासून पिकांचे संरक्षण व्हावे याकरिता तारांचे किंवा जाळीचे कूपन योजनेद्वारे द्यावे आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शासनाकडे केली आहे.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

सोमवार, दि. २३ जून २०२५

## थोडक्यात

### दर्यापुरात बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**दर्यापूर :** बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्या एका कृषी केंद्र चालकावर दर्यापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक सुरेश रामभाऊ रामागडे (५५) यांनी दर्यापूर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी महेंद्र वासुदेवराव बोरेकर (५६, रा. दर्यापूर) याच्या ताब्यातून बनावट बियाण्यांचे चार पाकीट जप्त करीत त्याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला

### युवकाला मारहाण; पाच जणांवर गुन्हा दाखल

**मोर्शी :** मित्राच्या लग्नाच्या वरातीत नाचणाऱ्या युवकाने वेळ झाल्याने पोलीस येतील असे सांगत डीजे बंद करण्यास सांगीतला. त्यामुळे चिडलेल्या चौघांनी त्याच्यासोबत वाद घालत त्याला काठीने मारहाण केली. ही घटना दुर्गवाडा येथे घडली. याबाबत आदेश नारायणराव खडसे (२५) याने दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी चंद्रपाल ठकारे (६३), तेजस वानखेड (२२), केवल खडसे (२२) व अन्य एका युवकाविरुद्ध, तर अंकित सुभाषराव रिठे (३२, रा. अमरावती) याच्या परस्परविरोधी तक्रारीवरून आदेश खडसे याच्याविरुद्ध ११८(१),३५२, ३५१ (२/३), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला.

### मजुरीचे पैसे मागणाऱ्या युवकाला मारहाण

**मोर्शी:** आंबे तोडण्याचे काम करणारा कैलाश पंजाबराव राऊत (२८, रा. अंबाडा) हा मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेला असता, गावातीलच तिघांनी त्याला शिविगाळ करीत लोटालोट केली. दगड त्याच्या डोक्यावर मारत जखमी केले. जीवे मारण्याचीही धमकी दिली. जखमीने दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शेताच्या कुंपणाचा वाद पोहोचला पोलीस ठाण्यात

**धारणी :** तालुक्यातील कसाईखेडा येथे शेताच्या कुंपणाचा वाद धारणी पोलीस ठाण्यात पोहोचला. कुंपणाच्या कारणावरून महिलेने शिवराम जरू उईके (४०) यांना कु?हाडीने मारून जखमी केले. या प्रकरणी महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

### नया सावंगा येथे दाम्पत्याला मारहाण

**चांदूर रेल्वे :** घरासमोर उभ्या असलेल्या व्यक्तीला दोघांनी शिविगाह केली. त्यातून वाद निर्माण झाला. त्यात दोघांनी दाम्पत्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना नया सावंगा येथे घडली. किशोर रामभाऊ महल्ले (६५) यांच्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### शेतीवर अतिक्रमण करीत जीवे मारण्याची धमकी

**नांदगाव खंडेश्वर :** शेती विकण्याच्या कारणावरून एकाने वृद्धाच्या शेतीत अनाधिकृतपणे प्रवेश करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सातरगाव शेत शिवारात घडली. या प्रकरणी नंदकिशोर हेमराज खंडेलवाल (६६, रा. टोपे नगर, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीवरून एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### चारित्र्यावर संशय घेत विवाहितेचा छळ

**वरुड :** शहरातील एका विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेत गाडी घेण्यासाठी माहेरवरून ५० हजार रुपये आणण्याचा तगादा लावत सासरची छळ करीत असल्याची तक्रार विवाहितेने वरुड पोलिसात दिली. पोलिसांनी सचिन रामप्रसाद चामलाटे (३८) याच्यासह अन्य चार महिलांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### विवाहितेला सासरच्यांकडून मारहाण

**अंजनगाव सुर्जी :** मुलगा न झाल्याच्या कारणावरून पती दारू पिवून पत्नीला मारहाण करतो, तर सासरची अन्य मंडळी तिचा शारीरिक व मानसिक छळ करतात. याबाबत तिने अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

# कृषी विभागात चार कोटींचा बदली घोटाळा?

## कृषी विभागातील भ्रष्टाचाराच्या किडीवर आ. धस यांची फवारणी | जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून आशा पल्लवीत

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती :** कृषी विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रिया म्हणजे बड्या अधिकाऱ्यांसाठी पाहुणचार ठरला आहे ही प्रक्रिया करोडोंची माया जमवून सहज, सुलभरीतीने पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांना आपल्या मनाप्रमाणे बदली अथवा पदोन्नतीचे गिफ्ट देण्यात आले. हा आजपर्यंतचा इतिहास आहे. याहीवर्षी तोच कित्ता गिरविण्यात आला. यावर्षीचा बदली घोटाळा हा चार करोडच्या आसपास असल्याची चर्चा सध्या कृषी विभागात रंगली असून या प्रक्रिया ज्यांचा अधिनस्त पार पाडल्या गेली ते विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे हे येत्या ३१ जुलैला सेवानिवृत्त होत असून प्रशासन अधिकारी उमेश गजभिये यांचे नागपूर येथे त्यांच्या सोयीनुसार बदली करण्यात आली हे विशेष.

राज्यातील शेतकरी आत्महत्येने उग्ररूप धारण केलेल्या अमरावती व नागपूर विभागातील कृषी विभागात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची पोलखोल आ. सुरेश धस यांनी केली आहे. या भ्रष्टाचारातील मुख्य पात्र असलेल्या अमरावतीचे विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे व शंकर तोटावार यांच्या गैरव्यवहाराच्या संतापजनक कहाण्या उघड केल्या असून या अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची कोटीच्या कोटी उड्डाणे लक्षात घेता अमरावती विभागात नुकताच घडलेला बदली घोटाळा हाही चार कोटीपेक्षा कमी नसावा अशी चर्चा कृषी वर्तुळात सुरू आहे. कमी दिवसात अधिक उत्पन्न देणाऱ्या या बोगस बदली प्रक्रियेचे लाभ आपल्याही पदरात पाडून घेण्याकरिता कृषी आयुक्तालयातील सोनेरी टोळीने गैर व्यवहारात पारंगत असलेल्या अधिकाऱ्यांनचा त्यासाठी प्राचारण केले हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. २०२१ मध्ये वाशिम




जिल्ह्याचे तत्कालीन एसएओ पदाचा पदभार असलेल्या शंकर तोटावार यांना अमरावती जेडीएच्या पदावर प्रभारी म्हणून पाचारण करण्यात आले. यावेळी त्यांना तालसंगत दिली ती तत्कालीन प्रशासन अधिकारी गजानन पाटील यांनी. याहीवेळी उलाढाल ही करोडोंचीच. माध्यमांमधून टीका झाली आयुक्तालयापर्यंत तक्रारी झाल्या, मात्र आयुक्तालयातील सोनेरी टोळीने वातावरण शांत केले. लगेच दुसऱ्या वर्षीही ऐन बदलीच्या काळात तोटेवार पुन्हा अमरावतीच्या जेडीए कार्यालयात प्रगट झाले. ते म्हणजे समूपदेशन समितीचे अध्यक्ष म्हणून. पुन्हा याहीवर्षी बदल्यांची शस्त्रक्रिया तोटावार यांनीच पार पाडली. आ.सुरेश धस यांनी कृषी विभागातील महाघोटाळे बाजारा विरोधात रणशिंग फुकले असून त्यांच्या या कार्याचे शेतकरी वर्गातून स्वागत केल्या जात आहे. त्याआधी शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी करूनसुद्धा भ्रष्ट यंत्रणेची साखळी तोडने कठीण होऊन बसले होते, मात्र आता आ.धस हे सत्ताधारी पक्षाचे नेते असल्याने कृषी विभागात लागलेली भ्रष्टाचाराची कीड ही तेच आटोक्यात आणतील असा विश्वास शेतकरीवर्गातून व्यक्त केल्या जात आहे.

### एका प्रामाणिक कार्यकर्त्यांचा घेतला बळी

कृषी विभागातील गैरव्यवहाराचे अभ्यासक असलेले सामाजिक कार्यकर्ते सुरेश राजगुरे यांनी या बोगस बदलीच्यासंदर्भात माहिती मागविण्यासाठी माहितीच्या अधिकारात जेडीए कार्यालयात अर्ज केला होता, मात्र कार्यालयाकडून त्यांना माहिती न देता व उडवाउडवीचे उत्तरे दिल्या जात होती. त्यामुळे संतापलेल्या राजगुरेयांनी जाब विचारण्यासाठी थेट जेडीए कार्यालय गाठले. यावेळी त्यांची तत्कालीन प्रशासन अधिकाऱ्यांशी तूतू- मैमै झाली. यावेळी या अधिकाऱ्याने कार्यालयातीलच एका कर्मचारी महिलेला समोर करून महिलेला मारहाण व हात पकडल्याचा राजगुरेयांच्यावर आरोप केला व त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. पोलिसांनी राजगुरेयांना याप्रकरणात अटक केली. एवढेच नव्हे तर राजगुरेसारख्या एका कर्तव्यदक्ष सामाजिक कार्यकर्त्याविरोधात विभागातील भ्रष्ट अधिकारी आंदोलनाचा पवित्रा घेऊन एकत्र आले. सर्वत्र कोरोनाचा लॉकडाऊन सुरू असताना चार लोकांना एकत्र येण्यास जिल्हा प्रशासनाने बंदी घातली होती. असे असतानासुद्धा या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी या नियमाला तिलांजली देत जवळपास दीडशे ते दोनशे अधिकाऱ्यांनी या आंदोलनात सहभागी होऊन मांडीला मांडी लावून कामबंद आंदोलन केले होते. याही आंदोलनाचे नेतृत्व शंकर तोटावार यांनीच केले होते. या प्रकरणात तुरुंगवास भोगून बाहेर आल्यानंतर काही दिवसातच राजगुरेयांचे हृदयविकाराने निधन झाले. राजगुरेसारख्या प्रामाणिक कार्यकर्त्याला खोट्या गुन्ह्यात अडकून तुरुंगवास भोगायला लावणाऱ्या या अधिकाऱ्यांनाही एकदा तुरुंगाची हवा खाऊ द्या अशी मागणी यानिमित्ताने आता केली जात आहे.

# पती, पत्नीसह एकाच दिवशी पूर्णानगरात चौघांचा मृत्यू

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. २२ :** पूर्णानगर येथील चिंतामण गायगोले यांच्या मृत्यूनंतर काही तासातच त्यांच्या पत्नी सुभद्राबाई चिंतामण गायगोले यांनीही जीव सोडला तर गावातीलच माळीपुरा येथिल ताईआत्या ढाकुलकर यांचाही मृत्यू झाला हे तिघेजण वृध असले तरी सुनील रामदास खंडारे या युवकाचा हृदयाच्या झटक्याने निधन झाल्याने गावात संकटाच सावट आले आहे. रविवारी सकाळपासून दुःखमय वातावरण दिसून येत होते. गावात एकच शांतता पसरली होती. एकाच घरातील पतीपत्नी यांनी काही अंतरानेच जीव सोडल्याने कुटुंबात दुःखाचे वातावरण निर्माण झाले होते. तर गावातीलच युवा



सामाजिक कार्यकर्ते सुनील खंडारे यांच्या निधनाने तर गाव अक्षरशः होरपळून गेले होते. सुनील सकाळी नेहमीप्रमाणे शेतातील काम करण्यासाठी गेला होता. सायंकाळी आपल्या मित्रांसोबत कामे आटपून घरी आल्यावर त्याने जेवण घेतले व झोपत असतांनाच त्याच्या छातीत दुखायला लागले काही कळायच्या आतच व रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्याने दम सोडल्याने त्याचाही मृत्यू झाला. असे एकूण गावात चार मृत्यू झाल्याने बऱ्याच गावाकर्यांनी आपल्या चुली सुद्धा पेटविल्या नाहीत. सुनील खंडारे हा गावात मनमिळाऊ स्वभावाचा म्हणून परिचित असून तो कुणाच्याही सुखदुःखात नेहमीच भाग घ्यायचा. तो मागील ग्रामपंचायत निवडूकीत निवडूनही आला होता. तो घरचा एकटाच कर्ताधरता असून त्याच्या मागे दोन लहान मुले , आई व पत्नी असल्याने आता त्याच्या कुटुंबावर मोठे संकट येऊन पडले आहे. त्याच्या आकास्मिक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अशा संकटाला पूर्णानगरवासियांनी पहिल्यांदाच पहिले असल्याचे दिसून येत आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अमरावती –** चिखलदरा पोलिस स्टेशन परिसरात एका अल्पवयीन मुलाने १५ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यामध्ये ती पाच महिन्यांची गर्भवतीही झाली. मुलीच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, चिखलदरा पोलिस स्टेशन परिसरात राहणारी १५ वर्षांची मुलगी तिच्या घरात एकटी राहत होती. त्यावेळी अल्पवयीन मुलगा घरी येऊन लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करीत असे. त्यामुळे ती ५ महिन्यांची गर्भवती राहिली.

# सोन्याच्या नावाखाली फसवणूक; महिलेला 3 लाखाने लुटले

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, दि. २२ :** स्वस्तात सोने देतो म्हणत सात जणांनी एका महिलेचे तीन लाख रुपये लुटले. यापैकी तिघांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. गुरुवारी न्यायालयात हजर केल्यानंतर तिघांचीही २१ जूनपर्यंत पोलिस कोठडी घेण्यात आली. पोलिस निरीक्षक किरण औटे हे या प्रकरणाची चौकशी करित आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर महिला ही नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यातील गोंडवळसा येथे राहते. तेथील काही परिचित व्यक्तींनी तिला स्वस्तात सोने देण्याचे आमिष दिले होते. त्यासाठी गावाबाहेर जावे लागेल, असे आधीच सांगण्यात आले होते. त्यानुसार मंगळवारी तिघे जण तिला नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घेऊन आले. सायंकाळी पाचच्या सुमारास मुख्य रस्त्यावर संवाद सुरु असतानाच आणखी चौघे तेथे आले. त्यानंतर सोने देण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या नावाखाली सदर महिलेकडून तीन लाख रुपयांची रोकड घेण्यात आली. दरम्यान काही कळण्याच्या आतच प्रत्येकाने वेगवेगळा बहाणा करत महिलेला एकप्रकारे संमोहित करुन पोबारा केला. दरम्यान आपण लुटले गेलो, हे लक्षात आल्यावर सदर महिलेने नांदगाव खंडेश्वर पोलिसांत तक्रार नोंदवली. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास चक्र सुरु केले. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती दीपक रामदास पलांडे (३०), श्यामराव आनंदराव राकडे (३०) व सचिन विलास तोडसाम (२९) या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून ४० हजार रुपये रोख व दुचाकी जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी या तिघांनाही आज न्यायालयात हजर केले असता न्यायाधीशांनी त्यांना २१ जूनपर्यंत कोठडीत ठेवण्याची परवानगी दिली. सहायक पोलिस निरीक्षक किरण औटे यांच्या नेतृत्वात या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात ३० रुग्णांवर शस्त्रक्रिया



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २२ :** जागतिक योगदिनाचे औचित्य साधून दि.२२ जून रोजी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य व आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेअंतर्गत स्थानिक उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हर्निया, हायड्रोसिल, अमबिलीकल हर्निया, अपेनडिक्स सारख्या इतर ३० रुग्णांवर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडल्या. हे शस्त्रक्रिया शिबिर सर्जन डॉ.प्रविण बिजवे,डॉ.राहुल खन्ना,भुलतज्ञ डॉ. जगदीश काळभोर,डॉ. अश्विनी वंजारी यांच्या प्रत्यक्ष सहभागातून संपन्न झाले.सदर शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौदंळे,डॉ.संदीप हेडाऊ यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वरूड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ. घनश्याम मानकर, श्रीमती मिनाक्षी वगारे,श्रीमती रेशमा बहुरूपी, भागश्री नागले, अंकित नेवारे, स्वाती पाटील, ज्ञानेश्वर टाकले, सागर झटाले, प्रवीण कापडे, आकाश जवंजाळ, शोभा इंगळे, शिला राऊत, आचल तायवाडे, नौशाद शहा, महात्मा जोतिराव फुले जन व आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेमधील वशीम शेख,प्रकाश पांडे,सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परीश्रम घेतले.

# ट्रकच्या धडकेत दोन ठार; दोन गंभीर

**अमरावती :** भरधाव वेगात असलेल्या ट्रकने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दोन दुचाकींना एकाच वेळी धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले. ही हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि. २० जून) दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास कोढाळी (ता. काटोल) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चक्री घाटात घडली. या अपघातात मंगेश शंकर खाडे (३७) आणि पवन सुनील शेंबेकर (२३, दोघेही रा. पोरगव्हाण, ता. वरूड, जि. अमरावती) यांचा जागीच मृत्यू झाला. तर आकाश वासुदेव जवणे (३२) आणि गौतम श्रावण बागडे (२४, दोघेही रा. जलालखेडा, ता. नरखेड) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश व पवन एमएच २७-सीएन-६४३७ क्रमांकाच्या दुचाकीने चक्री घाटातून जात असताना विरुद्ध दिशेने वेगात येणा?या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ट्रकचा वेग इतका प्रचंड होता की, तो दुचाकीला धडक देत पुढे गेला आणि दुसऱ्या दुचाकीलाही उडवले. अपघातात मंगेश आणि पवन यांचे डोक्यावर गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# दर्जेदार रस्ते निर्मितीतून शाश्वत विकासाला बळकटी - आ. सौ. सुलभा खोडके

## शेगाव –रहाटगांव प्रभागातील रस्त्याचे भुमीपुजन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२२ :** शहराचा वाढता विस्तार व वाढती अवागमन लक्षात घेता रस्ते विकासाला बळकटी मिळणे आवश्यक आहे. शहरातील अंतर्गत भागाला जोडले गेलेले डीपी रस्ते विकसित झाल्यास अपघात विरहित वाहतुकीला चालना मिळणार आहे. दर्जेदार रस्ते निर्मितीतून शाश्वत विकासाला अधिक बळकटी मिळणार असल्याचे प्रतिपादन आ.सौ.सुलभा खोडके यांनी केले.

निवडणूकपूर्व काळात आशीर्वाद यात्रेच्या माध्यमातून जनतेची संवाद साधला असला अनेक नागरिकांनी या संदर्भात अवगत केले. त्यामुळे लोकांनी आपल्याला निवडून दिले व काम करण्याची संधी दिली त्यांच्यासाठी चांगले काम करणे हे आपले कर्तव्यच आहे. आगामी काळातही प्रभाग क्रमांक १ शेंगाव -रहाटगांव मध्ये पायाभूत सुविधांची कामे,



सौंदर्यीकरण , तसेच आरोग्य , क्रीडा व पाणीपुरवठा , वीज पुरवठा आदी विकासात्मक बाबींची पूर्तता करण्यासाठी एक कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी दिली.

दरम्यान स्थानिक नागरिकांच्या निवेदनाचा स्वीकार करीत आमदार महोदयांनी स्थानिकांशी संवाद साधला. यावेळी अर्जुन नगर, गित अपार्टमेंट, पराग टाउनशिप ,हिवसे ले-आऊट ,अनुसया माता मंदिर परिसर, दत्तवाडी, हेगडेवार लेआऊट ,महारुद्र नगर ,अमृत विश्व वसाहत ,पटवारी कॉलनी, आशिष नगर, वर्धेकर लेआऊट, पराग टाऊनशिप, ज्ञानेश्वरी नगर, रहाटगांव गावठाण येथील स्थानिक नागरिक व महिला भगिनी प्रामुख्याने उपस्थित होते.

# १६५० गावांमध्ये 'स्वच्छ भारत मिशन' अभियान

## जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचा समावेश

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** स्वच्छ भारत मिशन आराखड्यातील १६५० गावांमध्ये मध्ये स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेले परिसर स्वच्छता शिवाय प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन बदललेल्या मानसिकतेची माहिती घेण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने पाहणी करण्यात येणार असल्याने सर्व ग्रामस्थांनी मिळून लोकसहभाग व श्रमदानातून या सार्वजनिक सुविधांचा पुरेपूर वापर करत परिसराची स्वच्छता, व प्लास्टिक मुक्तीची अंमलबजावणी करावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे.

जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या उपक्रमामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत सहभागी होत असते. केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येक ग्रामपंचायतीची अद्यावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी व तपासणी करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात दाखल झाले आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी करून एक हजार गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे गुणांकन ठरणार आहे त्याचप्रमाणे राज्याचे देखील गुणांकन देशपातळीवरती ठरणार असल्याने प्रत्येक गावाने आपापल्या सुविधांचा वापर नियमित केला पाहिजे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. या पाहणी दरम्यान प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन म्हणजेच वर्गीकरण केंद्राची पाहणी, खतखड्यांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता तसेच गृहभेटीतून मिळणारी माहिती इत्यादी बाबत गुणांकन होणार




आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांबाबत थेट निरीक्षणासाठी १२० गुण आहेत ग्रामस्थांचा प्रतिसादासाठी १०० गुण, गावातील सुविधांचा वापराबाबत २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षणा दरम्यान ५४० गुणांची प्रश्नावली असणार आहे , एकूण १००० गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे देशातील व महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ सुंदर गाव व ग्रामपंचायत या




मोहिमेदरम्यान घोषित होणार आहे.

ही तपासणी त्रयस्थ संस्थेमार्फत असल्याने गावातील सुविधांचा वापर तसेच बदललेल्या मानसिकतेबाबत कुटुंबांच्या भेटी शिवाय हा उपक्रम कायमस्वरूपी ठेवण्यासाठी गाव पातळीवर झालेली उपायोजना ग्रामस्थांचा सहभाग इत्यादी बाबींची प्रामुख्याने पाहणी होणार आहे. गाव भेटी दरम्यान प्रत्यक्ष निरीक्षण करताना स्वच्छता सुविधांचे निरीक्षण, ग्रामस्थांचा सहभाग जनजागृती दृश्यमान स्वच्छता इत्यादी बाबत पाहणी होणार आहे.

कुटुंबाची गृहभेट होत असताना घरातील स्वच्छतेच्या सुविधांची स्थिती वैयक्तिक शौचालयाचा वापर हात धुण्याच्या सवयी तसेच कुजनारा व नकुजणाऱ्या कच?याचे वर्गीकरण व त्याकरिता असलेली सुविधा शिवाय सांडपाणी व्यवस्थापनाचे केलेले काम इत्यादी बाबत गुणांकन होणार आहे.

गाव भेटी दरम्यान रस्त्यावर कुठेही सांडपाणी व घनकचरा पडलेला नाही शिवाय प्लास्टिक व्यवस्थापन हे कचरा वर्गीकरण केंद्रात केलेले आहे निर्माण झालेल्या खतखड्यांमधून खत निर्मिती बाबत चे नियोजन केले आहे, शिवाय सांडपाणी व्यवस्थापनाचे काम अतिशय सुरेख झालेले आहे सार्वजनिक ठिकाणी ही स्वच्छ व नीटनेटकी केलेली आहेत इत्यादी बाबत ही पाहणी होणार आहे. सार्वजनिक ठिकाणे उदाहरणार्थ धार्मिक स्थळे, शाळा अंगणवाडी परिसर, बाजार तळ या ठिकाणी उघड्यावरती कचरा पडलेला नाही तसेच सार्वजनिक शौचालयाची सुविधा नीटनेटकी आहे वापर सुरू आहे कचरा वर्गीकरणासाठी वर्गीकरण केंद्र आहे आणि हा परिसर स्वच्छ असून मैलागाळ व्यवस्थापनाबाबत सुविधा गावात आहे अशा प्रकारची पाहणी व गुणांकन होणार आहे.

> “प्लास्टिक संकलन व प्रक्रिया केंद्र तसेच गोवर्धन व मैला गाळ व्यवस्थापन इत्यादीचे पाहणी दरम्यान गुणांकन होणार आहे.सर्वात महत्त्वाचे म्हणजे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा ही आगामी भविष्यकाळात बचत गटांना किंवा इतर व्यवस्थेमार्फत कायमस्वरूपी चालविण्याबाबत सुरू ठेवण्याबाबत ग्रामपंचायतीने शाश्वत उपायोजना केलेली असल्यास त्याचेही गुणांकन यात होणार असल्याने सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंच ग्रामपंचायत अधिकारी तसेच ग्राम पाणीपुरवठा समितीच्या सदस्यांनी काळजी घ्यावी.



**संजिता महापात्र**
**जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी**

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
सोमवार, दि. २३ जून २०२५


# विद्राव्य खतांच्या नावाखाली भेसळयुक्त पावडर

## कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक | कृषी विभाग लक्ष देईल का?

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** गेल्या चार पाच वर्षा पासून पाण्यात मिसळून देता येणाऱ्या खतांची मागणी खूप वाढलेली दिसून येते. ठीबक द्वारे किंवा थेट पिकावरून फवारून ही विद्राव्य खते देता येतात. पिकांच्या मुळाच्या वाढीसाठी, पिकाच्या वाढीसाठी ,फळाच्या उत्तम रंगासाठी आकारासाठी आणि चवीसाठी विविध प्रकारची विद्राव्य खते बाजारात उपलब्ध आहेत. थेट पाण्यातून देता येत असल्याने विद्राव्य खतांचा परिणाम इतर पारंपारिक खतापेक्षा चांगला दिसून येतो, म्हणून विद्राव्य खतांचा वापर दिवसे दिवस वाढत आहे. अजून सुद्धा बऱ्याच शेतकऱ्यांना विद्राव्य खतांची पूर्ण माहिती नसल्यामुळे विद्राव्य खतांच्या नावाखाली भेसळयुक्त पावडर विकली जाण्याचे प्रकार दिसून येत आहेत.

विद्राव्य खतांची आणि आयात केलेली उच्च दर्जाची खते कशी ओळखावीत आणि फसवणूक कशी टाळावी ह्याची थोडक्यात माहिती घेऊ. विद्राव्य खते ही साधारण पणे नायट्रोजन, फोस्फारस, पोटशियम या तीन मुल्द्रव्यापासून तयार केलेली असतात. मोड आल्यापासून ते फळ धारणे पर्यंत पिकाच्या प्रत्येक अवस्थेसाठी ह्या तीन मुलद्रव्यांची बाकीच्या इतर उपयुक्त घटकाबरोबर विविध प्रकारे मिश्रण करून वेगवेगळ्या प्रकारची खते तयार करण्यात येतात. वर्षा नु वर्षे जमिनीत पिके घेतल्याने पिक्वाढीसाठी महत्वाच्या असणाऱ्या घटकांची मातीत कमतरता निर्माण होते त्याची भरपाई करण्यासाठी वेगवेगळ्या खतांची पिकांना गरज असते.



नायट्रोजन झाडांच्या प्रकाश संस्लेषण प्रक्रीयेसाठी खूप महत्वाचा घटक आहे. कार्बन डाय ओक्साईड आणि पाण्यापासून साखर आणि झाडाच्या वाढीसाठी लागणारी इतर प्रथिने तयार करण्यासाठी झाडांना नायट्रोजनची आवश्यकता असते.नायट्रोजनच्या कमतरतेमुळे उत्पादनात ३० ते ५० टक्क्यांनी घट होऊ शकते. फोस्फारस हा घटक मुळाच्या आणि फाद्यांच्या वाढीसाठी महत्वाचा असतो तर पोटशियम फळ धारणेत योग्य रंग आकार आणि चवीसाठी फार महत्वाचा असतो. विद्राव्य खते पावडर आणि द्रव अशा दोन्ही स्वरूपात उप्लब्ध आहेत. विद्राव्य खते किंवा त्याना तयार करण्यसाठी लागणारी मूलद्रव्ये महत्वाचे घटक प्रामुख्याने बाहेरच्या देशातून आयात केलेली असतात. आणि बाजारातील ह्या खतांच्या वाढत्या मागणीमुळे कधी कधी खतांची कमतरता भासते ह्याचा फायदा घेऊन काही बोगस कंपन्या भेसळयुक्त पावडर विद्राव्य खते म्हणून विकून भरघोस नफा मिळवायचा प्रयत्न करतात. अशा फसवणुकीच्या प्रकाराला आळा बसावा म्हणून विद्राव्य खते विकत घेताना काय काळजी घेता येईल त्याचा आढावा कृषि विभागाने घेतला पाहिजे.

आयात केलेल्या खतांच्या पिशवीवर उत्पादकाचे किंवा आयात करणाऱ्या कंपनीचे नाव व "DRC No. LFCD XXXXXXXX" असा उल्लेख आढळतो. बोगस कंपन्या काही पैसे भरून प्रशासनाकडून काही भामट्ये हा उऌउ छे. मिळवतात व बाजारात भेसळयुक्त पावडर विद्राव्य खते म्हणून आकर्षक पिशवीमध्ये विक्री सुरु करतात.सर्वसामान्य शेतकरी गावातील कृषी सेवा केंद्रातून उसनवारी करून खते विकत घेतात पण ती खते खरच उच्च दर्जाची आहेत का याची तपासणी कशी हे माहिती नसल्याने फसवणुकीला बळी पडतात. तसं पाहता राज्य शासनाने व केंद्र सरकारने यावर कडक उपाययोजना केलेल्या आहेत पण शासकीय यंत्रणा प्रत्येक ठिकाणी तपासणी करू शकेल अशी शक?यता जवळपास दुरापास्त आहे.

यावर सर्वात सोपा व सरळ मार्ग म्हणजे आपल्या विक्रेत्या कडे आपण ज्या कंपनीचे खत विकत घेत आहोत ते खत क्षेत्रिय उर्वरक प्रयोगशाळा तुर्भे नवी मुंबई येथे नमुना तपासणी साठी दिलेले आहे का याची खातरजमा खात्री करणे अतिशय महत्वाचे आहे आणि क्षेत्रीय उर्वरक खात्याची प्रमाणपत्र प्रत्येक खत विक्रेत्याने शेतक?यांना देणे आवश्यक आणि कायदेशीर रित्या बंधनकारक आहे अशा प्रमाणपत्राचा आग्रह प्रत्येक शेतकरी बांधवाने खत विक्रेत्याकडे करणे अत्यंत गरजेचे आहे. जर खते आयात केलेली असतील तर खत उत्पादक कंपनीकडे त्या खताचा RFCL च्या नमुना तपासणीचा ऋण असणे बंधनकारक असते आणि जर खते भेसळयुक्त पावडर पासून तयार केलेली असतील तर ही कागदपत्रे खत उत्पादकाकडे नसतात, केवळ उऌउ छे खताच्या पिशवीवर टाकून बोगस पावडर खताच्या नावाखाली विकून फसवणूक केली जात असते.

# युवक काँग्रेसचे शहर स्वच्छता अभियान

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरुद्ध अमरावती शहर युवक कॉंग्रेसद्वारे 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे.

जननायक राहुलजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १९ जून पासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. पुढील टप्प्यात आज दि. २२ जून, रविवार रोजी या अभियानांतर्गत रुक्मिणी नगर येथील सायंस्कोर मैदानासमोर साचलेल्या कच?याच्या ढिगा?यांची साफसफाई करण्यात आली. शहरातील



ऐतिहासिक महत्व प्राप्त असलेले हे मैदान असून या मैदानासमोरून कॉंग्रेस नगरकडे जाणा?या वर्दळीच्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला होता. युवक कॉंग्रेसच्या आंदोलनाच्या इशा?याने आज मनपाने आपली यंत्रणा कार्यान्वित करून सदर ठिकाणी साफसफाईची सुरुवात केली. युवक कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या मेहनतीने मनपाच्या यंत्रणेच्या सहाय्याने परिसरातील कचरा उचलून स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवली. परिसरातील नागरिकांनीही यावेळी युवक कॉंग्रेसच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला व युवक कॉंग्रेसच्या अभियानाचे स्वागत केले. यावेळी माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख, माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, माजी महापौर अशोकराव डोंगरे, प्रदेश कॉंग्रेस सचिव किशोरभाऊ बोरकर, शहर महिला कॉंग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, माजी नगरसेवक बंडूभाऊ हिवसे, माजी नगरसेविका जयश्रीताई डहाके, माजी नगरसेवक संजय शिरभाते, माजी नगरसेविका शोभाताई शिंदे, माजी जिप सभापती जयंतराव देशमुख, डॉ.दिनेश गवळी, बबनराव सोलीव, राजूभाऊ भेले, सुरेश रतावा, विजय राठोड, सचिन निकम, संजय मोरे, रविंद्र शिंदे, प्रदीप शेवतकर, विजय खंडारे, प्रा.डॉ. सुजाता झाडे, मैथिली पाटील, शिल्पा राऊत, वंदना थोरात या कॉंग्रेस पदाधिका?यांसह विजयराव महल्ले, विष्णूपंत कांबे, शंकरराव महल्ले, प्रदीप बनारसे, प्रदीप वानखडे, प्रशांत सोनारे, मंगेश उगले, शशिकांत बोंडे, आकाश घुईखेडकर, दीपक धनोकार, मनिष देशमुख, आशिष राऊत, पंकज लुंगीकर, बबनराव सोलीव,गिरीश देशमुख, प्रा. संजय देशमुख, दिलीप राऊत, डॉ. संजय येऊतकर, निलेश राऊत, सुनील जुनघरे, सारंग पाटील, डॉ.आनंद बरडे व परिसरातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाग्यश्री देशमुख यांच्या पत्राची आरोग्य उपसंचालकाकडून दखल

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा भारतीय जनता पाटीं कामगार मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या सरचिटणीस सौभाग्य श्री ताई देशमुख यांनी अकोला विभागातील आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य सहाय्यक यांच्या समस्या व मागण्या २ जून रोजी व ६ जून रोजी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला या निवेदनामध्ये सातव्या वेतन आयोग अनुषंगाने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत सुधारित योजनेच्या तीस वर्ष तिसरा लाभांच्या बाबत . मागणी केली अकोला विभागातील जवळपास ६० ते ७० कर्मचा?यांना म्हणजेच आरोग्य सहाय्यक आरोग्य पर्यवेक्षकांना याचा लाभ मिळाले नाही. तत्कालीन सहायक संचालक हिवताप यांनी जवळपास बऱ्याच कर्मचाऱ्यांना तिसरी कालबद्ध पदोन्नती लागू करून थकबाकी सुद्धा अदा केलेली आहे. याची दखल घेऊन उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ अकोला यांच्याकडे विचारणा करून याबाबत सत्य परिस्थिती



काय आहे चर्चा व संवाद व तोडगा काढण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ अकोला यांना सभा लावण्यात लावली या पत्राची दखल घेऊन भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा यांच्या पदाधिकाऱ्यांची सभा दिनांक २५ जून रोजी सकाळी ११ वाजता उप संचालक अकोला मंडल अकोला येथे डॉक्टर कमलेश भंडारी यांनी आयोजित केल्यामुळे यावर काय तोडगा निघते याकडे सर्व आरोग्य सहायकांचे व कर्मचाऱ्यांचे व आरोग्य पर्यवेक्षकांचे लक्ष वेधले आहे. आरोग्य सहाय्यक व आरोग्य पर्यवेक्षक यांना तिसरी कालबद्ध पदोन्नती मिळण्यासाठी जे भाग्यश्रीताई देशमुख व सुनील माळोदे प्रयत्न केले त्यामुळे त्यांचे आज जयंत औतकर. व किसन मध्ये यांनी त्यांचे फुल गुच्छ देऊन अभिनंदन केले.. भारतीय जनता पार्टीच्या कामगार मोर्चा महाराष्ट्राचे सरचिटणीस सौ भाग्यश्री देशमुख विदर्भ सरचिटणीस सुनील माळोदे यांच्यासह पदाधिकारी व सेवानिवृत्त कर्मचारी अकोला येथे जाणार आहे अशी माहिती एका पत्रकार द्वारे सुनील माळोदे यांनी दिली आहे

# जनता विद्यालयात योग दिन साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. २२ :** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंजनगाव बारी येथे दि.१२ शनिवार रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. योग साधनेचे मूळ उगमस्थान भारत देश आहे आणि ग्रामीण भागापासून ते शहरापर्यत योगाचे महत्त्व पटवून देणे ही काळाची गरज आहे. जगभरातील अनेक भागांमध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे सर्वप्रथम या योग दिनाच्या निमित्ताने मुख्याध्यापक विनोद मुगल यांनी योगा विषयीचे महत्त्व विशद केले. त्यानंतर



पर्यवेक्षक गजेंद्र अवघड तसेच शारिरीक शिक्षक रितेश खुळसाम यांनी योगासनाची प्रात्यक्षिके करून दाखविली आणि सोबत सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगासनाची प्रात्यक्षिके सादर केली यावेळी सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान आणि विविध योगासने सादर करण्यात आली. निसर्गरम्य वातावरणात योग दिन संपन्न झाला.

### राज्यस्तरीय योगासन स्पर्धा

**अंजनगाव सुर्जी–** येथील मानवसेवा विकास फाउंडेशन द्वारे राज्यस्तरीय खुली योगासन स्पर्धा रविवार २९ जुन २०२५ रोजी मानवसेवा पॅरामेडिकल कॉलेज, लढ्ढा कॅम्पस, महेश नगर, येथे आयोजीत करण्यात आली आहे.

### जळाल्याने महिलेचा मृत्यू

**अमरावती :** राहत्या घरी आग लागून जळालेल्या एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एमआर कॉलनीत १९ जुन रोजी सायंकाळी उघडकीस आली. माधुरी लक्ष्मण धोपाडे (५५, रा. एमआर कॉलनी, राजापेठ) असे मृतकाचे नाव आहे. राहत्या घरी आग लागल्याने माधुरी धोपाडे या ९५ टक्के जळाल्या होत्या.



# भाजपाकडून योग दिवस साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धारणी, दि. २२ :** जागतिक योग दिवस म्हणून पूर्ण जगात साजरा करण्यात येत आलेल्या योग दिन २१ जून रोजी भारतीय जनता पाटी पूर्व मंडल धारणी च्या वतीने हरिसाल येथे साजरा करण्यात आले.

त्या वेळी मंडल अध्यक्ष गजु सुडसकर, माजी, जि. प. सदस्य, सदासिव खड़के मा, उप सरपंच गणेश येवले, युवक अध्यक्ष दीपक गायन, अ. जा. अध्यक्ष दीपक नागले, ता, महा सचिव सोहन क़स्देकर, कमलेश सेलूकर जेष्ठ नेते मुकुंदराव बड़ोदे, निर्मल सवालकर सरपंच बैरागढ़, योग गुरु विकास रोहणकर यांचा मार्ग दर्शनात योग करण्यात आले.

# सावंगा विठोबाचे विश्वस्तपदी प्रवीण कुकडकर यांची नियुक्ती

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदुर रेल्वे, दि. २२ :** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे २१ जून रोजी विश्वस्त मंडळाची सामान्य सभा संस्थांनचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. संस्थानचे विश्वस्त स्व. अनिल बेलसरे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर प्रवीण नानाजी कुकडकर यांची बहुमताने निवड करण्यात आली.

या निवडीमुळे ग्रामस्थ आणि संस्थान भक्तातून समाधान व्यक्त होत आहे. नियुक्ती प्रसंगी संस्थांचे



अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके गोविंदा राठोड, चरणदास कांडलकर लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्निल चौधरी उपस्थित होते. नवीन विश्वस्त प्रवीण कुकडकर यांचे पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊनस्वागत करण्यात आले. त्यांच्या सहभागामुळे संस्थांच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नवा उत्साह आणि गती निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पोलिस दलातील ७ पीआय, २४ एपीआयच्या बदल्या

## अवतारसिंग चव्हाण धारणी तर अजय जाधव चांदूरबाजारचे ठाणेदार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** ग्रामीण पोलिस दलातील सात पोलिस निरीक्षकांसह २४ एपीआय अशा एकूण ३१ पोलिस अधिकाऱ्यांच्या पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी शनिवारी (दि. २१) रात्री बदल्या केल्या आहेत.

यामध्ये पीआय अवतारसिंग चव्हाण यांना धारणी, पीआय सुरज बोंडे यांना मोशी तर पीआय अजय जाधव यांची चांदूरबाजार ठाणेदार म्हणून बदली केली आहे.

या वेळी पीआय श्रीराम लांबाडे यांची नांदगाव खंडेश्वर ठाणेदार, पीआय राहुल आठवले यांच्याकडे प्रभारी पोलिस उपअधीक्षक मुख्यालय, पीआय अजित राठोड यांची आर्थिक गुन्हे शाखा आणि मोशीचे ठाणेदार असलेले पीआय नितीन देशमुख यांची नियंत्रण कक्षात पोलिस अधीक्षकांकडून या बदल्या करण्यात आली आहे. यामध्ये २४ एपीआयच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये बेनोडा येथील ठाणेदार ज्ञानेश्वर फड यांची एसीबीला बदली झाल्यामुळे त्यांच्या जागी येवदाचे ठाणेदार विवेक देशमुख, प्रशांत जाधव व यांची परतवाड्यावरुन ठाणेदार ब्राम्हणवाडा (थडी), प्रफुल गाडेकर वरुडवरुन (येवदा ठाणेदार), किरण औटे तळेगाव दशासर ३ ठाणेदार, श्रीकांत कडू एलसीबीमधून र माहुली जहागीर ठाणेदार म्हणून तर प्रियंका भोयर भरोसा सेल येथे बदली करण्यात आली आहे. यामध्ये रामेश्वर धोंडगे (चांदूर रेल्वे), उल्हास राठोड (चांदूर बाजार), राहूल य जाधव डीएसबीमधून (वरुड), राहूल गवई शिरखेडवरुन (मोशी), प्रशाली काळे (अंजनगाव सुजी), सुमिता चोरघ (मोशी), रामकृष्ण सोनवणे (दर्यापूर), अमन सिरसट अप्पर पोलिस अधीक्षकांचे वाचक, गजानन गजभारे (दत्तापूर), सारंग बोम्पीलवार (एटीएस), सुरज तेलगोटे (अंजनगाव सुजी), वर्षा खरसान (अर्ज श शाखा), अमोल मुडे (तिवसा), प्रकाश र पाटील सीसीटीएनएस व डायल ११२, ईश्वर पं वर्गे (अचलपूर), संध्या चव्हाण य (धारणी), राजेंद्र मुंढे (नांदगाव खंडेश्वर) आणि प्रवीण पाटील यांची चिखलदरा ठाण्यात बदली झाली आहे.

# चौकशी अधिकारी नियुक्त; 'एसएओ' तोटावार अडचणीत

## कृषी आयुक्तांचे आदेश : संचालक अंकुश माने करणार प्रकरणाची चौकशी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २२ :** नागपूर व अमरावतीचे तत्कालीन प्रभारी कृषी सहसंचालक व सध्या चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (एसएओ) म्हणून कार्यरत असलेले शंकर तोटावार यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आमदार सुरेश धस यांनी १८ जून रोजी कृषी आयुक्तांकडे सादर केलेल्या ११ पानी तक्रारीच्या आधारे १९ गंभीर मुद्द्यांवरून त्यांच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

या चौकशीसाठी अकोला येथील बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे संचालक अंकुश माने यांची १९ जून रोजी अधिकृतरित्या नियुक्ती करण्यात आली आहे. ते १५ दिवसांत चौकशीचा अहवाल राज्य शासनाकडे सादर करणार आहेत. २४ तासांत याबाबतचे दोन स्वतंत्र आदेश राज्याचे कृषी आयुक्तांनी काढले आहे. तक्रारीत अमरावती व नागपूर विभागातील विविध गैरव्यवहार, आर्थिक अनियमितता आणि प्रशासकीय अकार्यक्षमता यांचा उल्लेख आहे. या चौकशीत अमरावती विभागात जेडीए प्रमोद लहाळे यांचाही समावेश असून, त्यांच्यावरही गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले आहेत. अमरावती विभागात जेडीए प्रमोद लहाळे व नागपूर विभागासह अमरावती विभागात एसएओ शंकर तोटावार यांच्याद्वारे झालेली अनियमितता व गैरव्यवहाराबाबतचे प्रकरण आमदार धस लावून धरले आहे. याबाबत त्यांनी विविध तक्रारी पुण्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे व राज्याचे प्रधान सचिव (कृषी) विकासचंद रस्तोगी यांच्याकडे केल्या आहेत.

### दोन्ही अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवा

कृषी सचिव व कृषी आयुक्तांच्या निर्देशाने चौकशी अधिका?यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मात्र हे दोन्ही अधिकारी अधीनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दबाब आणण्याची शक्यता गृहीत धरता, यांना चौकशी होईतोवर सक्तीच्या रजेवर पाठवा, अशी मागणी आमदार धस यांनी कृषी सचिवांकडे केल्याची माहिती आहे.

# थोडक्यात

### विवाहितेचा विनयभंग करून दिली धमकी

**अमरावती :** पती घरी नसताना परिचित युवक तिच्यासोबत नेहमीच असभ्य वर्तन करतो. दरम्यान घटनेच्या वेळी ती घरी एकटी असताना, त्याने तिचा हात पकडून लज्जास्पद वर्तन करीत विनयभंग केला, तसेच तिला मोबाइलवर कॉल करून तू माझ्यासोबत राहिली नाही, तर मी माझ्या जीवाचे बरे वाईट करून तुला फसवेन अशी धमकी दिली. याबाबत विवाहितेने खोलापुरी गेट पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी विक्की मनोहर खडसे (३२) याच्याविरुद्ध ७४, ७५(१), ३५१(२), ३३३ अंतर्गत गुन्हा नोंद केला.

### भरधाव दुचाकीच्या धडकेत महिला जखमी

**अमरावती :** डागा सफायर बिल्डिंग समोरील वळणार दुचाकीने जाणा?या महिलेला मागून भरधाव आलेल्या दुचाकीने धडक दिली. त्यात तिच्या पायाला दुखापत झाली. याबाबत जखमी महिलेचे पती प्रफुल्ल यशवंत गवई (४०, रा. न्यू साई कॉलनी, तपोवन) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध २८१, १२५ (अ),

### जावयाची सासूला अश्लिल शिवीगाळ

**अमरावती :** सासूला घर घेवून देण्याची बतावणी करीत तिच्याकडून सोन्याचे दागिने घेतले. दरम्यान मुलीचा मृत्यू झाल्याने सासूने जावयाला दागिने परत मागीतले. तेव्हा त्याने तिला सोने देण्यास नकार देत जीवे मारण्याची धमकी देत अश्लिल शिविगाळ केली. सासूने फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अभिषेक देविदास चव्हाण (३३, रा. अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** बडनेरा पोलिसांनी मलकापूर ते पांढरी मार्गावर एका अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई केली. त्याच्या ताब्यातून ८४० रुपयांची देशी दारू जप्त केली. या प्रकरणी रुपेश मनोहरराव तायडे (३८) याच्यावर गुन्हा दाखल केला, तर वलगाव पोलिसांनी विर्शी येथे शिवदास नथ्थुजी शेंद्रे (४५) याच्यावर अवैध दारू वित्काना कारवाई केली. त्याच्या ताब्यातून ३५० रुपयांची देशी दारू जप्त केली. दोघांवरही संबंधित पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### नागपुरी गेट पोलिसांची जुगारावर धाड

**अमरावती :** कमेला ग्राउंड परिसरात जुगार सुरू असल्याच्या मिळालेल्या गुप्त माहितीवरून नागपुरी गेट पोलिसांनी कारवाई केली. प्रमोद जगदेवराव कांबळे (५५) याच्यावर गुन्हा दाखल करीत त्याच्या ताब्यातून १ हजार ६५० रुपयाचे साहित्य जप्त करण्यात आले.

### वृद्धेला दगड मारून शिवीगाळ

**अमरावती -** घरी काम करणाऱ्या ६५ वर्षीय वृद्ध महिलेला दगड मारत युवकाने तिला जखमी केले. ही घटना राहुल नगर येथे घडली. महिलेने दिलेल्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. घटनेच्या वेळी निर्मला शिवप्रकाश गड्डू (६५, रा, राहुल नगर) या त्यांच्यर घरातील अंगणात नळाचे पाणी भरत होत्या. त्याच वेळी परिसरातील एका युवकाने त्यांना दगड फेकून मारला. तो दगड तिच्या डोक्याला लागून जखम झाली. त्यातून रक्त निघू लागले. त्याच वेळी युवकासोबत असलेल्या दुसऱ्या सहका?याने तिला शिविगाळ केली. जीवे मारण्याची धकमी दिली. याबाबत जखमी महिलेने फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार नोंदवली.

## घटना-घडामोडी



### अंबिका विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**नेर (परसोपंत) :** येथील मांगला (देवी) येथील अंबिका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य मनोज दुधे यांच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. निरोगी जीवनासाठी योगाचे महत्व पटवून देणाऱ्या या कार्यक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शनिवारी, (दि. २१) रोजी झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य तथा योग प्रशिक्षक मनोज दुधे यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली योगा शिक्षक आशा बांबुर्डे, आनसिंगकर, मनीषा नाल्हे, रजनी श्रीराव, सारिका दातीर, सुवर्णा दुधे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे धडे दिले. यात प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि इतर आसनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग अत्यंत आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहन प्राचार्य दुधे यांनी केले. कार्यक्रमाला माजी सैनिक सुभाषराव नाल्हे, निखिल बांबोर्डे, अविनाश भेंडे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### दिशा आयबँकतर्फे नेत्रदाते कुटुंबीयांचा सन्मान

**यवतमाळ :** ज्यांनी आपल्या प्रियजनांचे मरणोत्तर नेत्रदान केले, अशा कुटुंबांचा सन्मान सोहळा नुकताच येथे पार पडला. दिशा आय बँक व संजीवन हॉस्पिटलतर्फे आयोजित या कार्यक्रमात नेत्रदान चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. संजीवन हॉस्पिटलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेत्रदान चळवळीचे प्रणेते राजू जैन होते. यावेळी नेत्रदाते कुटुंबीयांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दहा जणांना दृष्टी मिळू शकते, त्यामुळे ही चळवळ गैरसमज दूर करून अधिक व्यापक करावी, असे मत डॉ. अपर्णा बाहेती व डॉ. विजय कावलकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नील गावंडे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. श्रद्धा ढाकुलकर-गावंडे यांनी केले. यावेळी डॉ. आलोक गुप्ता, प्राध्यापक काशिनाथ लाहोरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. हिमांशू बंड, अमोल देशमुख, डॉ. प्रणाली चांभारे यांच्यासह संजीवन हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### पॉलिटेक्निक प्रवेश नोंदणीला २६ जूनपर्यंत मुदतवाढ

**यवतमाळ :** दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीला आता २६ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लक्षात घेऊन हा महत्वाचा निर्णय नुकताच जाहीर केला आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सुधारित वेळापत्रकानुसार, विद्यार्थ्यांना आता २६ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज नोंदणी आणि कागदपत्रे अपलोड करता येणार आहेत. तसेच कागदपत्रांची पडताळणी करण्याची अंतिम मुदतही २६ जूनच राहील. त्यानंतर २८ जून रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. विद्यार्थ्यांना अर्जात दुरुस्त्या करण्यासाठी २९ आणि ३० जून हे दोन दिवस मिळतील, तर २ जुलै रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास, विद्यार्थ्यांनी मदत क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यवतमाळ येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेशासाठी प्राचार्य अनंत मटाले यांनी प्रवेश प्रक्रिया अधिकारी डॉ. मो. नदीम कुरेशी यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले.

## रेतीघाटांचा लिलाव नाही, तस्करांची मनमानी, झरी-पाटण परिसरात लाभार्थी आर्थिक संकटात

# घरकुल लाभार्थ्यांची घरे रखडली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ रमेश सिडाम

**पाटणबोरी, दि. २२ :** झरी तालुक्यातील पाटण आणि बोरी परिसरात अधिकृत रेतीघाटांचा लिलाव न झाल्याने, घरकुल लाभार्थ्यांची घरे बांधकामाच्या मध्यातच रखडली आहेत. रेती तस्करांकडून चढ्या दराने विकली जाणारी रेती परवडत नसल्याने, शबरी घरकुल आणि प्रधानमंत्री आवास योजनेतील हजारो गोरगरीब कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न अपूर्ण राहिले आहे. प्रशासनाने यावर तातडीने मार्ग काढावा, अशी मागणी जोर धरत आहे

शासनाच्या घरकुल योजनेत नाव आल्यावर, स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होणार या आशेने परिसरातील अनेक गरजू कुटुंबांनी उत्साहात कामाला सुरुवात केली. शासनाकडून मिळणाऱ्या एक लाख २० हजार रुपयांच्या तुटपुंज्या अनुदानाची जुळवाजुळव करित, त्यांनी घराचा पाया खोदला आणि भिंती उभ्या केल्या. मात्र, घराचे बांधकाम लेंटर लेव्हलपर्यंत पोहोचताच, पुढील कामासाठी लागणाऱ्या रेतीचा प्रश्न 'आ' वासून उभा राहिला. स्लॅब टाकण्यासाठी आणि भिंतींना गिलावा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रेतीची आवश्यकता असते, पण तीच मिळेनाशी झाल्याने सर्व कामे ठप्प पडली आहेत. या परिसरातील रेतीघाटांचा शासनाने अद्याप लिलाव केलेला नाही. त्यामुळे, इथे कायदेशीररित्या रेती उपलब्धच नाही. याच गोष्टीचा फायदा रेती तस्कर उचलत आहेत. ते अवैधपणे नद्यांमधून रेतीचा उपसा करून, ती दुप्पट-तिप्पट दराने विकत आहेत. तस्करांचे हे दर घरकुल लाभार्थ्यांच्या आवाक्याबाहेरचे आहेत. गेल्या महिन्यात पंचायत समितीने 'रेती पास' देऊन लाभार्थ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला, पण तोही फसवा ठरला. पास मिळताच वाहतूकदारांनी आपले दर वाढवले, ज्यामुळे हा पर्यायही निरुपयोगी ठरला आणि प्रशासनाने पास देणे बंद केले. आज या परिसरातील गावांमध्ये अनेक घरे अर्धवट अवस्थेत उभी आहेत. या अर्धवट भिंती म्हणजे केवळ बांधकाम नसून, त्या प्रशासकीय अनास्थेचे आणि तस्करांच्या मनमानीचे प्रतीक बनल्या आहेत. स्वतःच्या घराचे स्वप्न डोळ्यादेखत अपूर्ण राहत असल्याने, लाभार्थी कुटुंबे हवालदिल झाली आहेत. त्यामुळे, प्रशासनाने आतातरी या प्रकरणात लक्ष घालून, तस्करांवर कारवाई करावी आणि घरकुल लाभार्थ्यांसाठी स्वस्त दरात रेती उपलब्ध करून द्यावी, अशी आर्त मागणी केली जात आहे.

### सव्वा लाखात घर कसे बांधायचे?

**शासनाच्या घरकुल योजनेत लाभार्थ्याला एकूण एक लाख २० हजार रुपयांचे अनुदान चार टप्प्यांत मिळते. आजच्या महागाईच्या काळात सिमेंट, विटा, गिट्टी आणि मजुरीचे दर गगनाला भिडले आहेत. या तुटपुंज्या अनुदानातून घर पूर्ण करणे, ही एक मोठी कसरत असते. त्यातच, रेतीसारखी अत्यावश्यक वस्तू चढ्या दराने विकत घ्यावी लागत असल्याने, लाभार्थ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडून पडले आहे आणि घराचे स्वप्न अपूर्ण राहत आहे.**



### 'रेती पास'चा प्रयोगही ठरला अयशस्वी

**घरकुल लाभार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन, गेल्या महिन्यात स्थानिक पंचायत समितीने त्यांना 'रेती पास' देण्याचा निर्णय घेतला होता. यामागे त्यांना स्वस्त दरात रेती उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, ही योजना सुरू होताच वाहतूकदारांनी आपले दर प्रचंड वाढवले. त्यामुळे, रेती स्वस्त मिळाली तरी वाहतुकीचा खर्च परवडणारा नव्हता. अखेर, हा प्रयोग अयशस्वी ठरल्याने पंचायत समितीने पास देणे बंद केले.**

## CAPTION 'पाऊले चालती पंढरीची वाट...



**टाकळी ई. :** 'माऊली, राम कृष्ण हरी'च्या गजरात, आषाढी वारीचा उत्साह सध्या शिगेला पोहोचला आहे. सुखी संसाराची गाठ सोडून, लाखो वारकऱ्यांची पाऊले आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीच्या वाटेवर मार्गस्थ झाली असून, संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलमय झाला आहे. पंढरीच्या ओढीने विठूनामाचा गजर करत, भक्तिरसात तल्लीन झालेले वारकरी.

(छायाचित्र : राम पवार)

## दिव्यांगांच्या हक्कासाठी लढणार

### डॉ. विष्णू उकंडे : जिल्ह्यात 'प्रेरणा दिव्यांग समिती'ची स्थापना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.२२ :** जिल्ह्यातील दिव्यांगांना सामाजिक व आर्थिक पाठबळ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'प्रेरणा दिव्यांग समिती'ची स्थापना करण्यात आली असून समितीच्या जिल्हाध्यक्षपदी घनश्याम बनसोड यांची, तर सल्लागारपदी ज्ञानेश्वर कुडवे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. विष्णू उकंडे यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या या समितीची नुकतीच कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.



जिल्ह्यातील प्रत्येक गावात समिती स्थापन करण्याचा निर्धार संस्थापक डॉ. विष्णू उकंडे यांनी व्यक्त केला. जाहीर झालेल्या नव्या कार्यकारिणीनुसार, समितीच्या जिल्हाध्यक्षपदी घनश्याम बनसोड यांची, तर सल्लागारपदी ज्ञानेश्वर कुडवे यांची निवड झाली आहे. आर्णी तालुकाध्यक्ष म्हणून चंदूसिंग जाधव जबाबदारी सांभाळणार आहेत. तसेच, शहर अध्यक्षपदी दीपक गोडवे, तालुका उपाध्यक्षपदी प्रशांत शिंदे, साहेबराव टाले व प्रशांत भांगे, तर विविध विभागप्रमुखांवर मारुती राठोड, विजय राठोड आणि सचिन राठोड यांची निवड करण्यात आली आहे. दिव्यांगांना न्याय हक्क मिळवून देणे, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणे आणि त्यांच्यासाठी रोजगार निर्माण करणे, हे समितीचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## विकसित कृषी संकल्प अभियान जिल्ह्यात संपन्न

**यवतमाळ, दि. २२ :** यवतमाळ जिल्ह्यात 'विकसित कृषी संकल्प अभियान' राबवण्यात आले. या १५ दिवसीय उपक्रमात कृषी शास्त्रज्ञांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग, आत्मा, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र व इफकोतर्फे हा उपक्रम झाला. यात नऊ तालुक्यांत फिरत्या कृषी रथांद्वारे शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. तज्ज्ञांनी माती परीक्षण, बीज प्रक्रिया, तण, कीड व्यवस्थापन आणि शासकीय योजनांची माहिती दिली. यवतमाळ, कळंब, बाभूळगाव, राळेगाव, घाटंजी, मारेगाव, वणी, केळापूर, झरी जामनी तालुक्यांत हे अभियान पार पडले.

## पुलाजवळील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

### पैनगंगा नदीवरील पुलालगतचा रस्ता खचला, बांधकाम विभागाला निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**महागाव, दि. २२ :** तालुक्यातील हिवरी गावाजवळ पैनगंगा नदीवरील पुलालगतचा रस्ता अवकाळी पावसामुळे खचला असून, तिथे मोठा खड्डा पडला आहे. यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून, या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) पक्षाच्या तालुकाध्यक्ष संध्या रणदिवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला ई-मेलद्वारे निवेदन पाठवून ही मागणी केली आहे. निवेदनानुसार, नुकत्याच वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे पुलाच्या बाजूची माती वाहून गेल्याने रस्त्याखाली मोठा खड्डा तयार झाला आहे. काळी-पुसद मार्गावरील हा रस्ता अत्यंत वर्दळीचा आहे. जड वाहनांमुळे खचलेला रस्ता आणखी खचून मोठा अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. कोणताही अनर्थ घडण्यापूर्वी प्रशासनाने या समस्येची गंभीर दखल घ्यावी आणि हा धोकादायक खड्डा त्वरित बुजवून रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित करावा, असे रणदिवे यांनी निवेदनात म्हटले आहे. या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## माविमचा वार्षिक क्रेडिट प्लॅन सादर

**यवतमाळ, दि. २२ :** महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे (माविम) वार्षिक क्रेडिट प्लॅन चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात २०२५-२६ वर्षासाठी ११० कोटी रुपयांच्या कर्ज वितरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे यांनी प्रास्ताविक करून नवीन क्रेडिट प्लॅन सादर केला, तर विभागीय सल्लागार केशव पवार यांनी सादरीकरण केले. मागील वर्षी ९३.७ कोटींचे कर्ज वितरित करून १२७ टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याची माहिती देण्यात आली. यावेळी कृषी अधीक्षक संतोष डाबरे, नाबार्डचे अतुल इंगळे, अग्रणी बँक प्रबंधक ज्ञानेश्वर टापरे यांनी योजनांची माहिती दिली. उत्कृष्ट काम करणाऱ्या बँकांना सन्मानित करण्यात आले.

## सूरज झांबरेने मिळविली एमबीबीएस पदवी

### आदिवासी तरुणाचे डॉक्टरकीचे स्वप्न साकार



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**टाकळी ई., दि.२२ :** उमरखेड तालुक्यातील दुर्गम अमडापूर येथील आदिवासी तरुण सूरज कैलास झांबरे याने मुंबईच्या जे. जे. रुग्णालयातून एमबीबीएस पदवी प्राप्त केली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने मिळविलेल्या या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सूरजने वैद्यकीय पदवी मिळवून आपल्या गावाचा नावलौकिक वाढविला आहे. त्याच्या या यशाबद्दल गावात एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमराव इंगळे, राम देवसरकर, ठाणेदार योगेश वाघमारे, डॉक्टर मस्के, डॉ. गिरी, संतोष पांडे, पोलीस पाटील अमोल दुमारे, सरपंच आणि सदस्य उपस्थित होते. त्यांनी सूरजचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आपल्या मुलाने मिळवलेले यश पाहून त्याच्या आई-वडिलांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. सूरजच्या यशामुळे परिसरातील इतर होतकरू विद्यार्थ्यांनाही मोठी प्रेरणा मिळाली आहे.

## पेरणीच्या हंगामात वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा

### ट्रान्सफॉर्मर १२ दिवसांपासून बंद, वरूड जहांगीरमधील शेतकरी हवालदिल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ कैलास कोडापे

**राळेगाव, दि. २२ :** तालुक्यातील वरूड जहांगीर येथील कृषी पंपांना वीजपुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर गेल्या १२ दिवसांपासून बंद आहे. ऐन लावणीच्या आणि पेरणीच्या हंगामातच वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांची सिंचनाची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. महावितरणच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, त्यांनी तातडीने कारवाईची मागणी केली आहे.



वरूड जहांगीर गावात कृषी पंपांसाठी तीन ट्रान्सफॉर्मर आहेत, मात्र वाढलेल्या पंपांच्या संख्येमुळे या ट्रान्सफॉर्मरवर क्षमतेपेक्षा जास्त भार येत आहे, ज्यामुळे ते वारंवार नादुरुस्त होतात. दोन-तीन महिन्यांपूर्वीच बसवण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर पुन्हा बंद पडल्याने, शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यातच, पावसानेही दडी मारल्याने, पिकांना पाणी कसे द्यायचे, हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. या समस्येबाबत झाडगाव येथील महावितरण कार्यालयातील अभियंता आणि लाईनमन यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही, केवळ वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. 'एकीकडे सरकार शेतकऱ्यांच्या सुखदुःखात सोबत असल्याचे म्हणते, पण दुसरीकडे आम्हाला साध्या वीजपुरवठ्यासाठीही झगडावे लागत आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया श्रावनसिंग वडते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सध्या संबंधित अभियंत्याची बदली झाल्याचे कारण सांगून दुरुस्तीसाठी टाळाटाळ केली जात आहे. प्रशासनाच्या या टोलवाटोलवीचा भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. त्यामुळे, तातडीने जास्त क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवावा किंवा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर देऊन ही समस्या कायमची सोडवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### अधिकाऱ्यांची बदली, शेतकऱ्यांची मात्र फरपट

**गेल्या १२ दिवसांपासून ट्रान्सफॉर्मर बंद असूनही, महावितरणकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक लाईनमनला विचारणा केली असता, त्याने वरिष्ठांना कळविले असल्याचे सांगितले. तर, कार्यालयातून संबंधित इंजिनिअरची बदली झाल्याचे कारण पुढे करून वेळकाढूपणा केला जात आहे. प्रशासनाच्या या टोलवाटोलवीमुळे आणि दुर्लक्षामुळे ऐन हंगामात शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत असून, त्यांचे आर्थिक नुकसानही होत आहे.**

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

### योग प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिके, कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर (परसोपंत), दि. २२ :** येथील दि इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेवर आधारित सामूहिक योग प्रात्यक्षिकांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



शनिवारी, (दि. २१) झालेल्या या कार्यक्रमात योग प्रशिक्षक हितेश श्रृंगारे आणि प्रशिक्षणार्थी सुहानी मुटकुरे यांनी विविध योगासनांची 'योग संगम' ही प्रात्यक्षिके सादर केली. प्राचार्य गजानन उईके यांनी आपल्या मार्गदर्शनातून योगासनांचे जीवनातील महत्व आणि फायदे विषद केले. त्यांच्यासह उपप्राचार्य प्राध्यापक किशोर राठोड, पर्यवेक्षक किरण रॉय, शिक्षण निरीक्षक प्राध्यापक अरुण नरवडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी योगाभ्यासात सक्रिय सहभाग नोंदविला. शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य कायम राखण्यासाठी योगाचे महत्व अधोरेखित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या स्तुत्य उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

## थोडक्यात

### पर्समधून दागिने लंपास

**यवतमाळ :** वर्धा ते यवतमाळ प्रवासादरम्यान एका महिलेच्या पर्समधून सोन्या-चांदीचे दागिने लंपास झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पल्लवी विवेक भोमले यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्या वर्धा येथून भावाकडे यवतमाळला परत येत होत्या. प्रवासादरम्यान अनोळखी व्यक्तीने त्यांच्या पर्समधून दोन लाख २० हजार ५०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरले. ही बाब लक्षात येताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून, अनोळखी चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

### लॅपटॉपसह मोबाईल लंपास

**यवतमाळ :** शहरातून लॅपटॉप आणि मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, एकूण ६४ हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे. केतन रमेश कंगारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना १७ जून रोजी घडली. अनोळखी चोरट्याने घरातून ५० हजार रुपये किमतीचा डेल कंपनीचा लॅपटॉप आणि १४ हजार रुपये किमतीचा वन प्लस कंपनीचा मोबाईल चोरून नेला. याप्रकरणी कंगारे यांच्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलिसांनी अनोळखी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिस चोरट्याचा शोध घेत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

# पक्षविरोधी काम करणाऱ्यांना संधी नाहीच

## खासदार प्रतिभा धानोरकर; आर्णीत काँग्रेस पक्षाची आढावा बैठक, महाविकास आघाडीचे संकेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ मनोज माघाडे

**आर्णी, दि.२२:** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, आर्णी येथे काँग्रेस पक्षाची एक महत्त्वाची आढावा बैठक शनिवारी पार पडली. या निवडणुकीत केवळ निष्ठावंत आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांनाच तिकीट दिले जाईल, तर पक्षविरोधी काम करणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी दिला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे नियोजन करण्यासंदर्भात स्थानिक माहेर मंगल कार्यालयात शनिवारी, दि. २१ जून रोजी काँग्रेस पक्षातर्फे आढावा बैठक घेण्यात आली.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे गोवा प्रभारी, ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे होते. तर मंचावर खासदार प्रतिभा धानोरकर, माजी मंत्री प्रा. वसंत पुरके, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, जिल्हा प्रफुल्ल मानकर, प्रदेश सचिव डॉ. मोहम्मद नदीम आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत जिवाचे रान करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहील, असे आश्वासन दिले. 'केवळ आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणून, जनमत असलेल्या आणि पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांचे तिकीट कापले जाणार नाही. उलट, त्याला सर्वतोपरी बळ देण्याचे काम पक्ष करेल,' असे त्या म्हणाल्या. मागील निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीतील मित्रपक्षांनी केलेल्या सहकार्याची आठवण करून देत, स्थानिक पातळीवरही महाविकास आघाडी करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना त्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले काँग्रेसचे गोवा प्रभारी, ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना पक्षबांधणी, मतदार नोंदणी आणि पक्षासाठी पोषक वातावरण निर्मिती करण्याचे आवाहन केले. माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी आपल्या प्रास्ताविकातून तालुक्यातील पक्षाची सद्य:स्थिती आणि आगामी निवडणुकीची रणनीती सांगितली. माजी मंत्री प्रा. वसंत पुरके, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर व प्रदेश सचिव मोहम्मद नदीम आदींनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

### सुनंदा बोक्से यांच्याकडे महिला तालुकाध्यक्षपदाची धुरा

या कार्यक्रमादरम्यान आर्णी तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुनंदा तुळशीराम बोक्से यांची नियुक्ती करण्यात आली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांनी 'निर्भय बनो' अभियानाच्या माध्यमातून केलेल्या कामाची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही नवीन जबाबदारी सोपवली आहे. यावेळी, माजी तालुकाध्यक्ष ज्योती अरणकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. या निवडीमुळे महिला आघाडीला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### बैठकीला प्रमुख पदाधिकाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती

या बैठकीला जितेंद्र मोघे, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष जफर खान, बाजार समितीचे सभापती अनिल आडे, माजी नगराध्यक्ष आरीज बेग, तालुकाध्यक्ष सुनील भारती, छोटू देशमुख, किशोर भगत, गणेश मोरे, बाळासाहेब शिंदे, प्रदीप वानखडे, विजय मोघे, राजू विरखडे, अमोल मांगूळकर, परसराम राठोड, अतुल देशमुख, राजू गावंडे, श्रीमती सुनंदा बोक्से, नीता ठाकरे, परसोडा येथील सरपंच प्रिया देशमुख, प्रदीप मसराम, नरेश राठोड, उमेश कोठारी, जाफर शेख, रोहिदास राठोड, जाकीर सोलंकी, वामन नाईक, बक्षु सेठ सर्वे, नूनेश्वर आडे, उमेश आचमवार, राजन भागवत, रियाज सय्यद यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवृत्त अधिकारी गोपाल आडे यांचा शिवसेनेत प्रवेश

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत बांधले शिवबंधन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२२:** राळेगाव मतदारसंघातील सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षण मंडळाचे निवृत्त अधिकारी गोपाल आडे यांनी आज, रविवारी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेशामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन आपण शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे गोपाल आडे यांनी सांगितले. त्यांच्यासोबत वाढोणाबाजार, खैरी, शेळी, खोरद आणि मोहदरी येथील अनेक सरपंच, उपसरपंच आणि कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये शरदचे सरपंच मधुकर लिल्लारे, उपसरपंच अमोल रामटेके, रामभाऊ धनस्कर, खैरी येथील सरपंच संजय पवार, प्रेम आडे, तुलसीदास वाईकर, संजय निनावे व शेळी, खोरद मोहदरी येथील कार्यकर्ते यांनी सुद्धा शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, पराग पिंगळे, राजुदास जाधव यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा नेतृत्वाच्या मार्गदर्शनात समाजकारण करण्याची इच्छा श्री. आडे यांनी यावेळी व्यक्त केली.



### धारदार चाकूसह दगडाने हल्ला

**यवतमाळ, दि. २२ :** वडगाव जंगल येथे जुन्या भांडणातून दोन जणांना मारहाण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एकाच कुटुंबातील चार जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गजानन मोतीसिंग चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, लखन राठोड, लिलाबाई राठोड, कवडू राठोड आणि विनोद राठोड यांनी जुन्या वादातून त्यांना मारहाण केली. आरोपींनी चाकूसारख्या धारदार वस्तूने गजानन यांच्या डाव्या हातावर वार करून जखमी केले. तसेच, त्यांचा पुतण्या जगदीश चव्हाण यालाही दगडाने मारहाण केली. या तक्रारीच्या आधारे वडगाव जंगल पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे.

# भरचौकात धुमाकूळ घालणाऱ्या गुंडांच्या आवळल्या मुसक्या

## ट्रॅक्टरच्या भाड्यावरून वाद; चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२२:** भाड्याने दिलेला ट्रॅक्टर परत घेतल्याच्या रागातून भरचौकात चाकूचा धाक दाखवून धुमाकूळ घालणाऱ्या दोन गावगुंडांना अटक करण्यात बाभूळगाव पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी घटनेच्या ४८ तासांच्या आत दोन्ही संशयित आरोपींना त्यांच्या घरातून जेरबंद केले.



याप्रकरणी एजाज अली यांनी तक्रार दिली होती. त्यांनी वैभव उर्फ जहरीला जांभूळकर आणि विशाल उर्फ पच्चीस रायबल यांना भाड्याने दिलेला ट्रॅक्टर परत घेतला होता. याचाच राग मनात धरून दोन्ही आरोपींनी १८ जून रोजी सकाळी एजाज यांच्या शिवछत्रपती चौकातील घरावर चाल केली. त्यांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवत कार आणि घराच्या खिडकीच्या काचा फोडल्या. एजाज यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या पत्नीने प्रसंगावधान राखून त्यांना घरात ओढल्याने ते बचावले. या तक्रारीवरून पोलिस निरीक्षक लहुजी तावरे यांच्या मार्गदर्शनात जमादार गणेश शिंदे, विजय लोखंडे, नीलेश भुसे, दिनेश अहिरे यांच्या पथकाने २० जून रोजी दोघांनाही अटक केली.

# मराठा सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**महागाव, दि.२२:** शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून, मराठा सेवा संघातर्फे महागावात गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला. नुकत्याच झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मानचिन्ह आणि 'जिजाऊ चरित्र' पुस्तक देऊन गौरव करण्यात आला.




येथील मातोश्री विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सुनंदा दिलीपराव कोपरकर होत्या, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश कदम उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपाध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे, शिवसेना तालुकाप्रमुख राजू राठोड, सभापती प्रमोद भरवाडे, प्रमोद जाधव, नगरसेवक नारायण शिरशिंदे आणि पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष संजय कोपरकर यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी, तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या गुणवंतांच्या यादीतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा 'जिजाऊ चरित्र' पुस्तक, सन्मानपत्र आणि शिवधर्म दिनदर्शिका देऊन गौरव करण्यात आला. यानंतर, तालुक्यातील प्रत्येक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक सुरेश कदम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉ. संदीप शिंदे यांनी संचालन केले. अमोल जगताप यांनी आभार मानले.

सोहळ्याच्या यशस्वितेसाठी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष उदय नरवाडे, तालुका सचिव पंकज देशमुख, जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अमोल जगताप, मराठा सेवा संघाचे सतीश ठाकरे, विठ्ठल वाघमारे, स्वप्नील नरवाडे, किशोर सोळंके, चतुर्वेद अडकिने, सूरज धोंगडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष आशीष गावंडे तसेच शिक्षक विजय कदम व रवी भांगे यांनी प्रयत्न केले.
















